# अंतरीचे उमाळे

: लेखक :

आचार्य दादा धर्माधिकारी

वर्षप्रतिपदा
शके १८७५

मूल्य दीड रुपया

प्रकाशक :
नंदादीप प्रकाशन
६०५ नारायण पेठ,
पुणे २.

प्रथम आवृत्ति

मुद्रक :
हरि महादेव गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार, पुणे २.

# पत्र–परिचय

'अंतरींचे उमाळे' या नांवाखालीं नागपूरचे प्रख्यात सर्वोदयी आचार्य दादा धर्माधिकारी यांनीं आपल्या एका धर्मकन्येला लिहिलेलीं पत्रें प्रकाशित करण्यांत येत आहेत. या निमित्तानें दादांविषयीं आणि त्यांच्या जीवन कार्याविषयीं थोडेंफार लिहिण्याची मला मिळत असलेली संधि मी मोठ्या आनंदानें स्वीकारीत आहें.

आतांपर्यंत दादांच्या पत्रांचे दोन संग्रह प्रसिद्ध झालेच आहेत. 'आपल्या गणराज्याची घडण' या पुण्याच्या सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेनें प्रकाशित केलेल्या ग्रंथांत दादांचीं एका विशिष्ट कालखंडांतील राजकीय पत्रें संग्रहित करण्यांत आलेलीं आहेत. श्री. श्रीपाद जोशी यांनीं संपादिलेल्या 'स्नेहाचे झरे' नामक पत्रसंग्रहांत दादांचीं कांहीं खासगी पत्रें प्रसिद्ध करण्यांत आलेलीं आहेत. या संग्रहाला दादांनीं जें निवेदन जोडिलें आहे त्यामध्यें अगदीं बालपणापासून आपणाला पत्रें लिहिण्याचा छंद कसा लागला याचें फार छान वर्णन त्यांनीं दिलें आहे. प्रारंभींचें त्यांचें पत्रलेखन बहुतेक इंग्रजींत व क्वचित् हिंदींत झालेलें आहे. अलीकडचें त्यांचें पत्रलेखन बहुतांशीं मराठींतच असतें. मराठी ही त्यांची जन्मभाषा नव्हे. हिंदी हीच त्यांची जन्मभाषा आहे. तथापि मराठीचा पद्धतशीर व्यासंग करून त्यांनीं मराठीवर असामान्य प्रभुत्व मिळविलें आहे. असहकारितेच्या प्रारंभींच ते गांधीजींच्या चळवळींत दाखल झाले आणि नागपूरच्या टिळक राष्ट्रीय पाठशाळेंत राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य करण्यांत त्यांनीं एक तपाचा काळ घालविला. नंतर श्री. जमनालालजी बजाज यांच्या आग्रहावरून ते वर्ध्याला आले. गांधी सेवा संघाच्या 'सर्वोदय' नामक हिंदी मासिकाचे ते प्रथमपासून एक संपादक म्हणून काम करीत होते. आजहि श्री. विनोबाजींच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या हिन्दी 'सर्वोदय' मासिकाचे ते कार्यकारी संपादक आहेत. धर्माधिकारी घराणें हें पिढीजात संस्कृत

शास्त्रज्ञांचें घराणें आहे. मीमांसा आणि धर्मशास्त्र यांची चर्चा दादांनीं आपल्या घरीं बाळपणापासून ऐकलेली आहे. सामाजिक विचार सनातनी वळणाचे असले तरी धर्माधिकारी कुटुंबांत जिवंत ईश्वरनिष्ठा, उच्च संस्कारी जीवन आणि विद्याप्रियता या गोष्टी विपुल प्रमाणांत असल्यामुळें दादांना स्वाभाविकच उच्च वारसा लाभला. संस्कृताबरोबरच इंग्रजी विद्येचाहि दादांनीं दीर्घकाल व्यासंग केलेला आहे. दादांची उपजत रसिकवृत्ति त्यांच्या विद्वत्तेनें आणि पैतृक संस्कारांमुळें अभिजात प्रकारची बनलेली आहे. त्यांचा सार्वजनिक कार्यांतील बराच मोठा काल तरुण विद्यार्थ्यांच्या संगतींत गेलेला आहे. त्यामुळें त्यांनीं स्वतःच्या जीवनांतहि जरेचा प्रवेश होऊं दिला नाहीं. त्यांनीं आपलें मन सदैव तरुण राखलें आहे. गांधींच्या जीवन-दृष्टीचा दादांच्या जीवनावर विशेष परिणाम झालेला आहे; तथापि त्यांच्या जीवनांत वा विचारांत सांप्रदायिकता निर्माण झालेली नाहीं. आपलें स्वतःचें व्यक्तिमत्व निश्चितपणें ओळखून त्याचा अखंड विकास करण्याच्या साधनेंत ते सदैव रममाण झालेले असतात. त्यांच्या या व्यक्तिमत्वाचें स्वरूप समजून घेण्यासारखें आहे. 'मी सर्वसामान्य कुटुंबवत्सल, लेकुरवाळा, संसार-करू माणूस. कुटुंबांत स्नेहामुळेंच गोडवा व समाधान नांदतें. याअनुभवामुळें मी स्नेह जोडण्याच्या व राखण्याचा ब्रीदाचा अंगीकार केला.' (पृ. ३२) दादांच्या या उद्‌गारांत त्यांच्या व्यक्तिमत्वाचें एक तत्त्व व्यक्त झालें आहे. 'स्नेहाचे झरे' यांतील एका पत्रांत ते लिहितात, 'मी फक्त विचार करूं शकतों व विचार प्रदान करूं शकतों. नेतृत्व माझ्या ठिकाणीं नाहीं.' (पृ. ४६) माझ्या दृष्टीनें दादांच्या व्यक्तिमत्वाचें हें दुसरें घटकतत्त्व मानतां येईल. निरपेक्ष स्नेह आणि जीवनविषयक सर्वांगीण विचार या दोन घटकांनीं दादांचें व्यक्तिमत्व घडविलें आहे. त्यांचें स्वतःचें जीवन-तत्त्वज्ञानहि अशाच प्रकारचें बनलेलें आहे. त्यांच्या जीवनांत आणि त्यांच्या विचारांत मुळीं देखील विरोध आढळत नाहीं. जीवनांतून विचार निर्माण झाला म्हणजे तो सत्यपूर्ण बनतो. पुन्हां तो विचार स्वतःच्याच जीवनांत व्यक्त होतो तेव्हां व्यक्तीच्या जीवनालाहि स्थिर निष्ठा व परिपक्वता प्राप्त

दादांना जे ओळखतात त्यांना दादांच्या जीवनांत अशा प्रकारची निष्ठा व परिपक्वता सहज आढळून येते. दादांनीं आपलें एक स्वतंत्र

अध्यात्मदर्शनच बनविलें आहे. ‘ ज्या आनंदांत निरपेक्ष स्नेहाखेरीज दुसरा कांहींहि प्रेरक हेतु नाहीं तो आनंद जीवनाचें अंतिम मूल्य आहे.’ (पृ. ६५) असें ते मानतात. लौकिक अर्थाचें नेतृत्व दादांमध्यें नाहीं. एका अर्थानें ही फार चांगली गोष्ट आहे असें मी म्हणेन. कारण नेतृत्व म्हणजे एक प्रकारचा अहंकाराचा विलास. त्यांत इतरांना, व्यक्तींना आणि संस्थांनाहि केवळ साधन म्हणून वापरण्याची प्रवृत्ति प्रमुख असते. असलें नेतृत्व भौतिक दृष्ट्या नवीं मूल्यें निर्माण करण्याच्या दृष्टीनें यशस्वी होऊं शकत नाहीं. विज्ञानाचें सामर्थ्य विशाळलें असल्यामुळें आजच्या जगांत नेतृत्व ही एक मोठी भयकारक शक्ति बनली आहे. भौतिक वस्तूंप्रमाणेंच मानवी व्यक्तीदेखील वापरल्या जाण्याच्या शक्ती व संघटना सतत वाढत आहेत. यांतून मानवाचे आर्थिक प्रश्न कदाचित् सोडवितां येतील, परंतु त्याचें मानवतेचें मूल्य संपूर्णपणें नष्ट झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आर्थिक विपत्तींतून बाहेर पडण्यासाठीं एवढी मोठी किंमत मानवाला द्यावी लागणार असेल तर ती एक भीषण नियति समजावी लागेल. मानवाच्या नैतिक मोठेपणावर श्रद्धा असलेल्या कोणाहि माणसाला ही नियति अपरिहार्य वाटणें शक्य नाहीं. दादांनाहि ती तशी वाटत नाहीं. ‘ ईश्वर ही आजच्या जगाची राजकीय आवश्यकता आहे ’ ( पृ. २९ ) या विरोधाभासात्मक वचनांत दादांनीं आपली श्रद्धा व्यक्त केली आहे. दादांचा ईश्वर म्हणजे मानवाच्या हृदयांत सदैव स्फुरणारें मांगल्य. ‘ निरपेक्ष व निर्विकार प्रेमावांचून ’ या ईश्वरप्राप्तीचें ‘ दुसरें साधन नाहीं. ’ (पृ.३० ) ‘ मानवाच्या रोजच्या व्यवहारांत भगवंत पुनः गुप्तरूपानें येऊन बसला, मानवाला त्याच्या साक्षित्वाचें नित्य भान राहिलें, तरच आपलें सामाजिक जीवन प्रतिष्ठित व प्राणवान् होईल; एरवीं नाहीं. लौकिक आसक्ति व काम ( वासना ) याहून श्रेष्ठ प्रतीच्या प्रेमाची आज गरज आहे. ’ ( पृ.३० ) या शब्दांत दादांनीं आपल्या ईश्वराचें स्पष्टीकरण केलें आहे.

अहंकारी नेतृत्व सामाजिक जीवनाचा अंतीं विनाश करणारें असलें तरी सामाजिक समस्या सोडविण्याचें चिंतन करणाऱ्या प्रतिभाशाली विचारकांची समाजाला नेहमींच गरज असते. त्यासाठीं निरपेक्ष प्रेम एवढी एकच गोष्ट सत्यशोधनाला पुरी पडत नाहीं. सामाजिक जीवनाशीं

उत्कटतेनें समरस होण्याची आणखी एक शक्ति आवश्यक असते. निरपेक्ष मानवप्रेम आणि अखिल मानवजीवनाशीं प्रत्यक्ष समरस बनण्याची पात्रता या दोन्ही शक्तींनीं सुसज्ज असलेला पुरुषच जीवनांत नवीन नवीन सत्यांचा साक्षात्कार घेऊं शकतो. अशा पुरुषांच्या साक्षात्कारांतून जीवनाला अभिनव विचार प्राप्त होतात. महात्मा गांधी हे या कोटींतील पुरुष होते. आजच्या समाजांत विनोबाजींनीं कांहीं अंशीं असें कार्य चालविलें आहे. दादा या कोटींताल पुरुष नव्हेत; आणि दादांना त्यांची चांगली जाणीवहि आहे. गांधीजींच्या द्वारां मिळालेली जीवनदृष्टि आपल्या मर्यादा सांभाळून त्यांनीं आपल्या वैशिष्ट्यानें पचविली आहे. ते आपणाला नवविचार-निर्माते मानीत नाहींत, पण नवविचाराचे ते स्वतः वाहक बनूं इच्छितात. त्यासाठीं त्यांनीं आपली भरपूर तयारी केलेली आहे. आणि त्या बाबतींत त्यांना पुष्कळशीं सिद्धिहि लाभलेली आहे. 'अंतरींच्या उमाळ्यां'त जागोजाग त्यांनीं आपल्या व्याख्यानासंबंधीं फार मनमोकळे उद्‌गार काढले आहेत. सध्यां तरी कित्येक वर्षें दादांचें जीवनकार्य म्हणजे लेखन आणि भाषण हेंच झालें आहे. भाषणासाठीं त्यांना सतत प्रवासहि करावा लागतो. प्रवासाच्या गमती, निसर्ग सौंदर्याचें समीक्षण आणि आपल्या भाषणाची विचिकित्सा या गोष्टींनींच त्यांचीं पुढील सारीं पत्रें सजलेलीं आहेत. दादा आपल्या अनेक व्याख्यानांना 'रटाळ' ही पदवी देऊं शकतात, आणि आपल्या कित्येक व्याख्यानांवर ते स्वतःच बेहद्द खूष झाल्याचेंहि सांगूं शकतात. अगदीं नवख्या वाचकाला कदाचित् याचें रहस्य समजणार नाहीं; पण दादांच्या व्यक्तिमत्वाचें स्वरूप लक्षांत घेऊन हें सारें वाचलें म्हणजे त्यांत कांहींच अवघड वाटणार नाहीं. कठोर बुद्धिवादानें आपलें जीवन तपासून पाहतां येणें ही एक मोठी शक्ति आहे. ती शक्ति ज्याला निर्भयपणें चालवितां येईल त्याला आत्मवंचनेचें भय उरत नाहीं. दादां-जवळ ही शक्ति फार मोठ्या प्रमाणावर आढळून येते. जीवनविषयक विचार समाजाला अतिशय परिणामकारक रीतीनें समजावून द्यावे एवढीच त्यांची जीवनांतील आकांक्षा आहे. ती जेव्हां जेव्हां सफल झाल्याचा त्यांना अनुभव येतो त्यावेळीं साहजिकच त्यांचे समाधानाचे उद्गार निघतात. त्यांत आत्मस्तुति नसते.

हीं पत्रें दादांनीं आपल्या एका धर्मकन्येला लिहिलीं आहेत. ती कन्या ईश्वरनिष्ठेच्या असामान्य वातावरणांत आणि अनुभवांत वाढत आलेली आहे. आधुनिक विद्येचे सर्वश्रेष्ठ संस्कारहि तिनें मिळविले आहेत. पाश्चात्य देशांचा प्रवासहि तिचा झालेला आहे. भजन आणि भाषण या तिच्या दोन अमोघ शक्ती आहेत. तिला राजकारणाची गोडी नाहीं; तथापि समाजाचें आणि विशेषतः स्त्रियांचें उद्बोधन करावें अशी तिला तळमळ आहे. अशा एका मुलीनें दादांचा धर्मपिता म्हणून आश्रय करावा ही गोष्ट देखील दादांचें वैशिष्ट्य व्यक्त करणारी आहे. स्त्री-जीवनासंबंधीं दादांची एक विशिष्ट विचारसरणी आहे. स्त्रीमध्यें संस्कृतीला सन्मार्गावर नेण्याचे सर्व सद्गुण सामावले आहेत अशी गांधीजींप्रमाणें दादांचीहि श्रद्धा आहे. पण स्त्रीच्या या शक्तीचा समाजाला उपयोग व्हावयाचा असेल, तर स्त्री स्वतः पूर्ण स्वतंत्र झाली पाहिजे, तिला आपल्या 'मिशन'ची पूर्ण जाणीव झाली पाहिजे असें त्यांचें मत आहे. पुरुषांच्या दास्यांतून आणि नेतृत्वांतूनहि स्त्रीनें आपली सुटका करून घेण्याची पात्रता निर्माण केल्याखेरीज स्त्रीच्या अंगीं असलेलें हें सामर्थ्य प्रकट होणार नाहीं असें दादा मानतात. या त्यांच्या धर्मकन्येवरील त्यांचें प्रेम कितीहि निरपेक्ष असलें तरी ही धर्मकन्या अशा प्रकारच्या कार्याला विशेष पात्र आहे अशी दादांची समजूत असल्यामुळें या आपल्या धर्मकन्येच्या हातून स्त्रीविमोचनाचें कार्य घडावें अशी अपेक्षा ते राखतात. ही त्यांची अपेक्षा प्रत्यक्षांत किती यशस्वी होईल हें भविष्यकाळच सांगेल. माझा जो थोडा परिचय झाला आहे त्यावरून दादांची ही अपेक्षा अगदींच निराधार आहे असें मला वाटत नाहीं.

आपल्याकडे वाङ्मयांत खाजगी पत्रांचे संग्रह ही गोष्ट बरीचशी नवीनच आहे. त्यांतून पुरुषांनीं स्त्रियांना लिहिलेलीं अथवा स्त्रियांनीं पुरुषांना लिहिलेलीं अशीं पत्रें विरळाच. या दृष्टीनें मराठी वाङ्मयांत एक नवें दालन निर्माण करणारें हें पत्रवाङ्मय सर्वांना स्वागतार्ह वाटेल असा मला भरंवसा आहे.

१२ टिळकरोड,
पुणें २.
२६ जानेवारी १९५३.

—स. ज. भागवत

# आचार्य दादा धर्माधिकारी

## यांचीं प्रकाशित पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ( १ ) | क्रान्तिनिष्ठा | ( लेखसंग्रह ) |
| ( २ ) | पाकिस्तानी प्रवृत्तीचा प्रतिकार | ,, |
| ( ३ ) | आपल्या गणराज्याची घडण | ( पत्रसंग्रह ) |
| ( ४ ) | स्नेहाचे झरे | ,, |

## सहनौभुनक्तु : १

पोरी,

आज रात्रीं विमानानें नागपूरला जाणार होतों. पण नेहमींप्रमाणें बेत उद्यांपर्यंत तहकूब करावा लागला. माझ्या बाबतींत संकल्प व योगायोग यांची सतत चढाओढ चालते. अनेकदां संकल्पावर योगायोगाची सरशी होते. त्यांच्या खेळाकडे कौतुकानें पहात रहावें, दुसरें काय?

हिंदु कोडाचें पहिलें वाचन आज संपणार होतें. पण आतां तें पुन्हां सोमवारीं चालणार. उत्तरेकडील लोक एकंदरींत अधिक जीर्णमतवादी आहेत याचा अनुभव आणखी एकदां आला. विचाराचेंहि त्यांना जरा वावडेंच दिसतें. गिरीधारीजींनीं आपल्या तुफानी व तल्लख स्वभावाला अनुसरून विरोधाची रणधुमाळी केली. एवढा कांगावा करण्यासारखें त्या बिलांत त्यांच्या दृष्टीनें मला तरी कांहीं दिसत नाहीं. अज्ञ व भावनावश जनतेंत इतका गैरसमज पसरविण्यांत कांहीं पुण्यकार्य नाहीं केलें. पण या साऱ्या मतभेदांत त्यांचा स्नेह अधिकच प्रदीप्त झाला. माझ्या अंतःकरणांत तितकेंच उत्कट प्रतिप्रेम प्रज्वलित झालें. गिरिधारीजी लाख माणूस आहे. त्यांच्या स्नेहांत सारें कांहीं विरघळून जातें.

श्रीपादचें पत्र आलें. या पाळीला भावनाविवश होऊन पत्र लिहिलें आहे त्यानें. म्हणतो, " तुमचें पत्र वाचीत असतां तुमच्या सान्निध्याचा

अनुभव होत असतो. एका परीनें तें चांगलें आहे खरें. पण त्यामुळें जी एक अस्वस्थता व कालवाकालव होते तिच्यायोगें त्या आनंदावर उदासीनतेची छाया पसरते. अशा प्रकारचा हा विचित्र अनुभव फक्त तुमच्याच बाबतींत होत आहे आणि त्याला तुमचा स्वभावच कारण आहे. पूर्वी घर सोडून शाळेसाठीं बाहेर जातांना मनांत जी कालवाकालव होई तशाच तऱ्हेची अस्वस्थता गेल्या दोन तीन खेपेस तुमचा निरोप घेतांना झाली होती. इतक्या दिवसांच्या अनुभवानंतर मला असें वाटूं लागलें होतें कीं माझ्या अंतःकरणांतील 'भावुकते'चा झरा आटून गेला आहे पण तो पूर्वीपेक्षां जोरानें वाहूं लागेल कीं काय असें वाटूं लागलें आहे. हें जें होत आहे तें बरें कीं वाईट याचा निर्णय अद्यापि करूं शकलों नाहीं. पण एकूण माझ्या स्वभावाच्या विरुद्ध हें सर्व असावें असें वाटतें."

किती मनःपूर्वक लिहिलें आहे हें. त्याच्या भावनेचा पावन झरा पुन्हां जोमानें वाहूं लागला तर त्यांत वावगें आहे का ग ? माझ्या विमललाच या प्रश्नाचें खरे उत्तर माहित आहे.

बेंगलूरचे छोटूभाई देसाई यांचें पत्र आले. छोटूभाईची पत्नी सरला तुझ्या व बबीच्याच वयाची आहे. माझ्या स्नेहायत परिवारांत या जोडप्याचें स्थानहि फार महत्त्वाचें आहे. असा परिवार वाढत गेला म्हणजे 'अवघाचि संसार सुखाचा होतो !'

गिरिधारीजींमुळें येथें करमतें. काल दुपारीं त्यांच्या बरोबर नं. २ हार्डीज ॲव्हेन्यूमध्यें जेवायला गेलों होतों. आज दुपारीं 'लक्ष्मी' त जाऊन आलों. काल रात्रीं बिंदूकडे गेलों होतों. आज मदन पंक्तीला होता. एकूण प्रभूनें 'सहनौभुनक्तु' चें वैभव भाग्यांत लिहून ठेवलें आहे. जे एकटा जेवतो तो चोरून खातो, नाहीं ?

उद्यां ग्रँडट्रंकनें जातों कीं रात्रीच्या विमानानें जातों कीं मुळीं जातच नाहीं तें माझ्या संकल्पाच्या खोड्या करण्यांत मौज मानणारी नियति जाणें ? राजकारणाची गति पुरुषस्य भाग्यम् व स्त्रियश्चरित्रम्पेक्षां अधिक गहन आहे. आज कन्नमवार आले म्हणून थांबलों, उद्यां आणखी कोणी

येईल कदाचित.

पत्र लांबलें. पण त्याला माझा इलाज आहे का बेटा ? आतां तूं विश्रांति घे.

कळावे अनेक आशीर्वाद

१३९, कॉंस्टिटयूशन हाऊस तुझा
दि. १४-१२-४९ दादा

---

# मी काय साधुसंत आहे : २

बेटा,

काल आगगाडींतून एक सविस्तर पत्र लिहिलेंच आहे. काल रात्रीं एकला भागलपूरला पोंचलों. कॉंग्रेसचीं माणसें स्टेशनवर आलींच होतीं. एक वाजून गेलेला होता. पोटाला 'सक्तीची व फाजील' विश्रान्ति मिळाली. चांगली अद्दल घडली. रजा नको असलेले अनेक सरकारी नोकर माझ्याकडे येतात, त्यांच्या मनःस्थितीची कल्पना आली.

रात्रीं १-३० नंतर झोंपलों. पहांटे ५ ला उठलों. सकाळीं चहाबरोबर रसगुल्ले मिळाले. ते घशाखालीं उतरण्याचेंच नाकारूं लागले ! कां ? सांग पाहूं. सकाळीं सहाला घाटावर आलों. भागलपुरांतील जमीनदारांचे ते टोलेजंग वाडे–नव्हे हवेल्या–सकाळच्या मंद प्रकाशांत मोठ्याच ऐटदार दिसत होत्या. काय एकेका जमीनदारांचे वाडे आहेत. मंजिलें आहेत, हवेल्या आहेत !

स्टीमलॉंच उभी होती. पण आम्हीं होडीनेंच गंगा पार केली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळें लाटा उसळत होत्या. गंमत वाटली. तुमची आठवण झाली. प्रवासासारख्या स्थितींत रहायाचेंच नाहीं असा बेबीचा निर्धार आहे. तुझ्या छातींत जी धडकी भरली ती निघतच नाहीं, लीलाला अजून

अनुभव नाहीं. त्यामुळें माझा नाइलाज आहे. इकडे जीप गाड्यांचें प्रस्थ फार. कारण, खडकांचा अभाव. एका जीप गाडींतून दोन तास धूळ फांकत, वाळू खात येथें आलों. तरीपण जीप स्वतंत्र वाहन असल्यामुळें व घोड्यासारखें चैतन्यवान वाहन असल्यामुळें मला बैराग्याप्रमाणें धूळ माखणें व तपस्व्या-प्रमाणें वाळू फांकणेंहि परवडतें. 'वाहन' आपल्या कह्यांत पाहिजे. आपण 'वाहनाधीन' होऊं इच्छित नाहीं. जीप गाडी माणसाला गाफिल होऊं देत नाहीं. तोल सांभाळून सावध रहायला लावते. त्यामुळें तो मद्याप्रमाणें बेशुद्ध व गैरसावध रहात नाहीं.

मदरौनी हें गांव भागलपूर व पूर्णिया या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर कोसी नदीच्या तीरावर आहे. मदरौनी व सहोडा या दोन गांवाच्या मध्यें परिषदेची छावणी आहे. जवळच दोन मैलांवर कोसी व देवापगागंगा यांचा संगम आहे. सहरसा जिल्ह्यांतील लोकांप्रमाणें येथील लोक कोसी नदीला ' पापापगा ' म्हणत नाहींत. ती त्यांची समृद्धायिनी ' कल्पलता ' आहे.

मी येथें आल्यापासून एक मोठाच असह्य प्रसंग माझ्यावर गुदरलेला आहे. येथील बायांनीं माझें दर्शन घेण्याचा निर्धार केला असून आपापलीं बालकें व अर्भकें माझ्या पायांवर घालण्याचा क्रम चालविला आहे. जो तो ' गोड लागेन ' ( गोड पाय ) म्हणतो. माझी मात्र अगदीं गाळण उडत आहे. हा-जन संपर्क आपल्याला मुळींच सहन होण्याजोगा नाहीं. कोठें जीव लपवूं असें झालें आहे.

' माझिये जातीचें मज भेटो कोणी ' ही संतोक्ति एका बाबतींत मात्र खरी ठरली आहे. तोंडाचें बोळकें झालेला एक प्रौढ गृहस्थ माझ्या इतकाच सुपारीखाऊ आहे. पण त्याचें वैशिष्ट्य असें कीं तो एक लहा-नशी ' अडकित्ती ' उलटी धरून तिनें सुपारी किसून काढतो भरभर ! आहे कीं नाहीं करामत ! तिचा संबंध पुगी फलाशीं असल्यामुळें तिला सांस्कृतिक दृष्टीनेंहि महत्त्व आहे.

हा प्रदेश चांगलाच सुपीक व वृक्ष-वनस्पतींनीं नटलेला असा आहे.

तरीपण येथें ' एरंडोऽपि द्रुमायते ' ची मौज आहे. एरंडाचे खूप मळे आहेत. बांबूचीं ' उपवनें ' आहेत. ' शीशम ' चीं आडवीं-तिडवीं, वांकलेलीं झाडें आहेत. कित्येक पाणदींत या झाडाचे ' कमानी रस्ते ' (ॲव्हेन्यू) बनलेले आहेत. लीची आहे, आंबा आहे, बांबू आहे, वड आहे, पिंपळ आहे ! वृक्ष-वैभव भरपूर आहे. येथें मी एकटाच एका जमीनदाराच्या बंगल्यांत आहे. मला कोणी शौचाचा तांब्या हातांत नेऊं देत नाहीं, घासूं देत नाहीं, माझे जोडे, खडावा, आवश्यक त्या कोनांत माझ्यापुढें आणून ठेवण्यांत येतात. नुसता छळवाद मांडला आहे. मी काय साधुसंत आहे, का संताड्या वा जोगडा आहे ? तुम्ही सारे दुरून गंमत पहातां !

अगदीं विषम प्रसंगींहि विनोद वृत्ति कायम ठेवण्याच्या संवयीमुळेंच मी जगूं शकतों आहे. एरव्हीं खाटल्यावर जायबंदी झालों असतों. किंवा सरणावर तरी गेलों असतों. पण तूं आजारी असतांना मी गंमत करतों याचें तुला वैषम्य वाटेल. म्हणून आता लांब तोंड करून गंभीरपणानें विचारतों. दुखण्याची सरशी होत आहे कीं तुझी ? दुखण्याला म्हणावें आतां मिजास चालणार नाहीं. चौदावें रत्न दाखविण्यांत येईल ! तुझी बातमी मला आतां नागपूरलाच मिळेल. ता. २० पर्यंत मी तेथें पोंचेन.

प्रभा गेली ? गजानन ? माझा दोस्त खूप शिंगराप्रमाणें उड्या मारीत असेल. मला त्याची तीं ' मर्कट विक्रीडितें ' दिसतात. त्याचा गालगुच्चा घे.

ती. स्व. बापू व सौ. अक्का यांस आदरपूर्वक सा. न.

कळावें हा आशीर्वाद

मदरौनी ( बिहार ) तुझा
ता. १६-४-५० दादा

# बोलवित्या धन्याचा कृपाप्रसाद : ३

मुली,

ता. १६ चें पत्र पोंचेलच. ता. १६ ला सायंकाळीं भागलपूर जिल्हा राजनैतिक संमेलनाला सुमारें ५ ला सुरवात झाली. बिहार प्रांतिक काँग्रेसचे चिटणीस वैद्यनाथबाबू चौधरी अध्यक्ष होते. मी उद्‌घाटन केलें. भाषण जमलें नाहीं. तेथें जमलेले कार्यकर्ते बिहार सरकारचे एक मंत्री श्री. कयूम अनसारी, वैद्यनाथ बाबू या सर्व मंडळींना व जनतेला आवडलें. पण वारा इतका सोसाट्याचा होता कीं शेवटपर्यन्त भाषणाला रंग चढूं शकला नाहीं. मांडणी सुलभ होती व मुद्दे चांगले होते इतकेंच.

दिवसाच्या व रात्रींच्या हवामानांत मदरौनी येथेंहि फार अन्तर आहे. दिवसा उकडत नसलें तरी उन्ह चांगलें कडक पडतें. रात्रीं मात्र अगदीं थंडी असते. उन्हाळा कांहीं भासत नाहीं. ब्लँकेट पांघरावें लागतें.

काल सकाळीं ८-३० ला झेंडावंदन झालें आणि नंतर ९ ते ११-१५ पर्यन्त कार्यकर्त्यांच्या सभेंत भाषण केलें. हें भाषण मात्र सुश्राव्य आणि मननीय असें झालें. बोलवित्या धन्याच्या कृपाप्रसादाची साक्ष पटली. माझी विचारसंपदा इतकी मोठी आहे याचें माझें मलाच कौतुक वाटलें. भाषणाची शैली, भाषा, प्रतिपादन सारेंच कांहीं अप्रतिम साधलें. दाखले, दृष्टान्त, उदाहरणें यांचेंहि वैभव उत्कृष्ट होतें. कांहीं दाखले व दृष्टान्त अगदीं नवीन होते. शब्दब्रह्माच्या अनन्त स्वरुपाचा व अनन्त शक्तीचा पुन्हां साक्षात्कार झाला.

नंतर ११-३० ते २ पर्यन्तचा वेळ गंगा-कोसी संगमावर जाऊन 'संगम-स्नान' करण्यांत गेला. या संगमापर्यन्तचा रस्ता इतका दिव्य आहे कीं 'जीप' गाडीलाहि अगदीं 'रज्जुनृत्या' प्रमाणें सर्कस करावी लागली. आमचा गाडीवान मात्र मोठा दिलदार व धाडसी. त्यानें रस्त्याच्या दुर्गमतेसमोर हार मानण्याचें नाकारलें. आपलें सर्व कसब पणास लावलें. जीपनें स्वारीच्या घोड्याइतकी चपलता दाखविली. वाळूंतून चालतांना तिनें

उंटाची शक्ती दाखविली. आणि वेगाच्या व चपलतेच्या बाबतींत मात घोड्याशीं स्पर्धा केली. बसण्याची जागा हत्तीच्या अंबारीइतकी आरामशीर होती. म्हणजे एकाच वाहनांत हत्ती, उंट व घोडा यांच्या स्वारीचें संयुक्त श्रेय मिळालें. संगमावर पोचलों तेव्हां आमचीं अंतःकरणें जर कोणी तपासलीं असतीं तर त्यांत कोलंबस, कॅप्टन स्कॉट, डेव्हिड लिव्हिंगस्टन इत्यादि प्रदेश संशोधकांच्या अभिमानाची प्रतिच्छाया त्यांना दिसली असती. त्यांत पुन्हां काल सोमवती अमावास्येचें महापर्व होतें. महाकुंभाचें पर्व होतें. आम्ही बापूंच्या भस्मविसर्जनाच्या क्षेत्रावर गंगाकोसींच्या संगमावर कुंभस्नान केलें. प्रदेश-संशोधकाच्या भूषणभावनेंत धार्मिकाची भाविकता मिसळली. उन्हहि अगदीं 'चिलाचिलाती हुई धूप' होतें. म्हणून गंगा-कोसींचें तें शीतल जल मोठें सुखकारक वाटत होतें. एकंदर ही स्नान-यात्रा मोठी धाडसाची व उल्हास-दायक झाली. तिच्यांत कुंभस्नानाचें पावित्र्य होतें आणि स्नानविलासी माणसाच्या स्नानांतील 'क्रीडानन्द'हि होता.

गंगा-यमुनांच्या संगमाच्या दृश्यांत व गंगा-कोसी संगमाच्या दृश्यांत एक महत्वाचें साम्य आहे. दोन्ही नद्यांच्या पाण्यांचा निरनिराळा रंग संगमरेषेवरहि दिसतो. पण हें साम्य येथेंच संपतें. प्रयागला गंगेचें पाणी करड्या रंगाचें असून यमुनेचें निळें आहे. तेथें यमुना खोल व संथ आहे. गंगा ओघवती व उथळ आहे. येथें कोसीचें पाणी करडें व उथळ आहे आणि गंगा शान्त-गंभीर असून तिचें पाणी किंचित हरितवर्ण आहे. पण काय गंमत आहे पहा! प्रयागच्या गंगेला लोक खेळकर, लीलापटु इ. विशेषणांनीं गौरवितात तर येथें मात्र बिचाऱ्या कोसीला थिल्लर, चंचल, अनित्य, प्रवाहवती इत्यादि अनेक प्रकारचीं दूषणें लावतात. मोठ्यांचे दोषहि गुणरूप ठरतात आणि लहानांचीं भूषणेंहि मातिमोल ठरतात. 'नेपाळेश्वर भाललग्न चिखला कस्तूरिका मानिती!'

आम्ही सोमवतीचें कुंभस्नान संगमावर करून पुण्यसंपादनाची, आत्मसमाधानाची व आत्मगौरवाची भावना अनुभवीत परत आलों. सायंकाळीं पुन्हां परिषद. रात्रीं ८-३० ची गाडी गांठायची होती. ७-३० ला परिषद संपविणें जरुरीचें होतें. लोकांना माझ्या भाषणाची उत्कंठा

लागलेली होती. मी ६-१० ते ७-१० पर्यन्त भाषण केलें. मांडणी नवीन होती. भाषण सोपें, रसाळ व ओजस्वी झालें. घड्याळानें तें संपवायला— नव्हे थांबवायला लावलें. लोकांना राग आला. माझाहि विरस झाला. एकदाचें भाषण बन्द केलें.

बिहारच्या सर्वच भागांतून पुन्हां आमंत्रणें येऊं लागलीं. बिहारच्या लोकांच्या कृपेमुळें धन्यता वाटली. हत्तीवर बसून स्टेशनवर जायला निघालों. अमावास्येच्या काळोख्या रात्रीं काळ्या हत्तीवर बसून चाललों. हत्ती डोलत व निशब्द गतीनें चालत असल्यामुळें अगदीं नीरव अन्धकार होता. ८-३० ला आगगाडींत बसलों. आगगाडी अगदीं जीपगाडीवजाच होती. खिडक्यांना कपाटें नाहींत किंवा कांचा नाहींत. फक्त तिसरा वर्ग. जेमतेम बसून कटारियापासून काठागोलापर्यन्त एक तासांत आलों. तेथून पुन्हां उघड्या पण सुन्दर ट्रकवजा मोटार वॅगनमध्यें बसून ११-३० ला पूर्णियाला पोंचलों.

प्रवास शारीरिक दृष्टीनें श्रमाचा असला तरी त्रासाचा किंवा कष्टाचा वाटला नाहीं. हा सर्व विविध अनुभव तुलाहि मिळाला तर केवढें शिक्षण मिळेल ! जीवनाला विशेष गोडी व टवटवी येईल ! त्यामुळें क्षणोक्षणीं तुझी आठवण येते !

पूर्णिया जिल्हा पूर्वबंगालच्या सीमेवर आहे. येथून दार्जिलींग लांब नाहीं. सिलीगुडी फक्त १०० मैलांवर आहे. येथील हवा पावसाळी आहे. गवत हिरवें असून सकाळीं दंव पडतें. हाहि कोसीचाच भाग. पण त्या मानानें थोडा निराळा. नवगालियामध्यें 'मक्का' फार होतो. अवघ्या बिहारला पुरतो. या भागांत निरनिराळीं पिकें होतात. उडीद दोन्ही भागांत पिकतें.

आज येथें कार्यकर्ते, विद्यार्थी व सार्वजनिक अशा तीन सभा होतील. रात्रीं ८ ला गाडी गांठायची आहे. उद्यां सकाळीं १०-४५ ला पाटणा. ११-४५ चें विमान गांठून कलकत्त्याला जाईन. तूं मात्र विस्तरनशीन रहा !

कमाल आहे तुझी ! डॉक्टर काय म्हणतात? तुझी मनोदेवता काय बोलते?

ती. स्व. बापू व सौ. आक्का यांस सा. न. मित्राला स्नेहयुक्त स्मरण.

कळावें हा आशिर्वाद.

पूर्णिया तुझा

१८-४-५० दादा

---

# असमानांतील फेरफटका : ४

चि. मुलीला अनेक उत्तम आशीर्वाद,

काल पूर्णियावरून एक पत्र लिहिलेंच आहे. सबंध दिवस पूर्णिया आश्रमांत विश्रामांत गेला. पण पूर्णियाचें हवापाणी विश्रान्तीला मुळींच अनुकूल नाहीं. माणसाची तरतरी नाहींशी होते. एक प्रकारचा अनुत्साह वाटतो. त्यामुळें दुपारीं कार्यकर्त्यांच्या सभेंतील भाषण मोटेंच बोजड व रुक्ष झालें. श्रोत्यांना तें क्लिष्ट वाटलें असेल, मला कंटाळवाणें वाटलें. किंचित नवीन प्रतिपादन करण्याचा हेतु होता. प्रतिपादन तर नवीन होतें, पण रसाळ आणि रुचकर नव्हतें. कार्यकर्त्यांना अर्थातच तें मोठें 'विद्वत्तापूर्ण' वाटलें!

सायंकाळीं सार्वजनिक भाषण झालें. मी कंटाळलों होतों. तरी पण दुपारच्यापेक्षां भाषण कमी रुक्ष झालें. श्रोत्यांना वाटत होतें मी आणखी निदान पाऊण तास तरी बोलावें, पण माझेंच मन अधिक बोलायला तयार होईना. माझें वक्तृत्व हें असें 'लहरी' असल्यामुळेंच मी 'हुक्मी' किंवा कलावान् वक्ता नाहीं असें मी म्हणत असतों. 'बोलवित्या धन्याची' कृपा असली तरच माझें भाषण साधतें, एरव्हीं नाहीं.

पूर्णियाच्या हवापाण्यामुळें पोटाला विश्रान्ति हवी होती. पण आश्रमवासी यजमानांनीं पाहुण्याला वाटेल तितकें कमी जेवण्याचें स्वातंत्र्य ठेवलें

असलें तरी न जेवण्याची मुभा मात्र ठेवली नव्हती. म्हणून दोन्ही वेळां जेवावें लागलेंच. माझ्या भाषणानंतर सुमारें पावणे दोन तास सेवादलाच्या मुलांमुलींचे कलापूर्ण शारीरिक शक्तीचे, व्यायामाचे व कौशल्याचे प्रयोग झाले. त्यानंतर जेवण. सुमारें १० ला रात्रीं पुन्हां 'जीप'नें निघून ११-१५ला काटागोला स्टेशनवर आलों आणि रात्रीं १२ च्या आगगाडीनें प्रांतिक सेवादलाचे प्रमुख मदनमोहनसिंह ( मदनजी ) यांच्याबरोबर रवाना झालों.

आज सकाळीं ८-१७ ला सोनपूरला येऊन पोंचलों. सोनपूरजवळच हाजीपूरला गंगा-गंडक यांचा संगम आहे. आगगाडींतूनहि स्पष्ट दिसतो. या ठिकाणीं गंडकीला नारायणी असें नांव देण्यांत आलें आहे. सोनपुरला हरिहरनाथाचें मंदीर आहे. रामानें जनकपुरला जातांना हें स्थापिलें होतें म्हणतात. सोनपुरला कार्तिक पूर्णिमेच्या दिवशीं गुरांचा जगांत सर्वांत मोठा बाजार भरतो. हत्ती, उंट इ. सर्वच जनावरांचा क्रय-विक्रय होतो. सोनपूर स्टेशनचा प्लॅटफॉर्म जगांत सर्वांत मोठा आहे असें सांगतात. लगनदेवसिंह नांवाच्या ठेकेदारानें आम्हांला सोनपुरला चहा, टोस्ट वगैरेचा 'ब्रेकफास्ट' दिला. काल दुपारीं चहा प्यालों नव्हतों याची मला त्यावेळीं आठवण झाली.

सोनपुरला गाडी बदलून आम्ही फलेजाघाट स्टेशनवर सुमारें ९-३० ला पोंचलों. महादेवपूर स्टेशनप्रमाणें हेंहि स्टेशन गवताच्या खोपटाचें आहे. फलेजाघाटावर 'स्टीमर' उभेंच होतें. त्यांत अर्धा तास अधीरतेनें वाट बघत गंगामाईची शोभा पहात बसलों. शेवटीं १०-१० च्या सुमारास स्टीमर निघालें आणि १०-४० ला आम्ही दीघा घाटावर उतरलों. बिहार प्रांतिक कॉंग्रेसची 'जीप' तयारच होती. तडक विमानतळावर गेलों. तेथें दिल्लीच्या विमानांतून उतरलेले श्री. बाळासा. गुणे (स्वामी कुवलयानंद) यांची योगायोगानें गांठ पडली. पुष्कळ दिवसांनीं भेट झाली.

अवध-तिरहुतची गोगलगायीच्या गतीनें चालणारी आगगाडी आणि तिच्याशीं स्पर्धा करणारी 'स्टीमर' या वाहनानंतर विमानांत बसलों. विमान ११-४९ ला निघालें आणि १-३० ला डमडम विमानतळावर

पोंचलें. भर दुपारची वेळ होती. उन्हामुळें सर्वत्र एक प्रकारचें विरविरीत धुकें पसरलें होतें. प्रकाश अतिशय ऊग्र व प्रखर असला म्हणजे अति प्रकाशामुळेंच माणसाच्या दर्शनांत व्यत्यय येतो. नित्य प्रसिद्धीच्या लख-लखाटांत किंवा लौकेषणेच्या झगझगीत उजेडांत रहाणाराला वस्तूचें यथातथ्य आकलन होत नाहीं तें याचमुळें. पाटणा ते कलकत्ता एकंदरींत देखावा रुक्षच आहे. नद्या, शहरें, वनश्री कशाचीच शोभा नाहीं. उजवीकडे क्षीणजल असा दामोदर नद मात्र सारखा बरोबर प्रवास करतांना दिसतो. बिहारमध्यें या पाळीला तीन दिवसच राहिलों. या तीन दिवसांत बिहार प्रांतिक कॉंग्रेसचे चिटणीस श्री. वैद्यनाथ बाबू (चौधरी) यांचा सहवास लाभला. दुर्लभ लाभ.

कलकत्त्याला तात्या परळीकर विमानतळावर होतेच. ता. १५ ला ते मला आगगाडींत भेटले होते. त्याचवेळीं त्यांच्याकडे उतरावें असें ठरलें होतें. हे परळीकर म्हणजे आपल्या महिलाश्रमाच्या कमूताई लेले यांचे सख्खे बंधू आणि इंदु म्हणजे ताराबाई मश्रूवालांची अभिन्न सोबतीण सुशीला हिची सख्खी बहीण. इंदूनें हें लग्न आपल्या आईच्या व इतर वडील माणसांच्या मनाविरुद्ध केलें. कमूताई व द्वारकानाथ लेले यांचा विवाह जसा मिश्र विवाह आहे तसा इन्दूचा विवाहहि मिश्र विवाह आहे. कमूताई प्रभु आहेत आणि इन्दु ब्राह्मण आहे. द्वारकानाथ ब्राह्मण आहेत, तर तात्या परळीकर प्रभु आहेत. इन्दु त्यावेळीं वर्ध्यालाच शिकत होती. तिच्या शरीराप्रमाणेंच मनहि ऐसपैस व भरदार आहे. तिच्या लग्नाला मी प्रोत्साहन दिलें. तिच्या घरीं पहिल्यानेंच गेलों. संसार नीटनेटका पण ‘ तंग ’ नाहीं.

या मिश्र विवाहांत एक गोष्ट माझ्या दृष्टीनें विशेष समाधानाची आहे. कमूताई व तात्या या दोघांनींहि मांस व मत्स्य अजिबात वर्ज्य केलें असून त्या बाबतींत तीं दोघें द्वारकानाथ किंवा इन्दु यांच्यापेक्षांहि कडक आहेत. मला मांसाहारी माणसांबद्दल अनादर किंवा अस्नेह नाहीं. कित्येक मांसाहारी माझे जिवलग मित्र आहेत. पण मांसाहार निवृत्त माणसांत व मांसाहारी माणसांत मी फरक करीत नसलों तरी एकंदरींत मांसनिवृत्ति हें मी सांस्कृतिक प्रगतीचें लक्षण मानतों. शिकारीनंतर शेती, हा सांस्कृतिक

उन्नतीचा ऐतिहासिक क्रम आहे. इन्दु फार दिवसांनीं भेटली होती तशी पठाणिस्तानची नागरिक आहे. नर्मदा पोद्दार ( वर्ध्याला आपण ज्या श्रीराम पोद्दारांकडे उतरलों होतों त्यांची बहीण ) हिचें घरहि कलकत्त्यालाच आहे. ती सुप्रसिद्ध लक्षाधीश प्रभुदयाल हिम्मतसिंगका यांची सून आहे. माझ्या मुलींपैकीं आहे. महिलाश्रमाच्या संस्थापिका शान्ताबाई रानीवाला यांची भाची सुशील ही नर्मदेची सून आहे. नर्मदा माझ्या मुलींपैकीं आहे. त्याचप्रमाणें कलकत्त्याचे प्रसिद्ध जवाहिरांचे व्यापारी ठाकुरलालभाई मेहता यांचें कुटुंब अगदीं घरच्यासारखें आहे. त्यांची मुलें व मुली यांचा अर्थातच माझ्याशीं फार संबंध आहे. कलकत्त्याला मी त्यांच्याचकडे उतरत असे. इन्दु-नर्मदा यांचीं लग्नें होऊन आठआठ, दहादहा वर्षे झालीं. तरी त्यांच्या घरीं प्रथमच गेलों. त्याचप्रमाणें ठाकुरलालभाईच्या नवीन घरांतहि पहिल्यांदाच गेलों. त्यांच्या इतकाच आनंद मलाहि झाला.

कलकत्त्याला सुमारें नऊ वर्षांनंतर गेलों. पण तें शहर जसें होतें तसें आहे. वाढलें भलतेंच आहे एवढें खरें. बाकी भयंकर प्रक्षुब्ध वातावरण आहे. सगळे एकमेकांवर नाराज आहेत, सगळे मिळून सरकारवर नाराज आहेत. इतकें भयंकर संकट कोसळल्यानंतर लोकांनीं रागावूंहि नये असें कोण म्हणेल? रागावण्याचा त्यांचा हक्क मान्यच केला पाहिजे. फक्त क्रोधाचें पर्यवसान ‘संमोहांत’ होऊं नये याची काळजी घ्यावी. कलकत्त्याला गेलों म्हणजे ‘वनस्पति बागेंत’ जात असतों. या पाळीला मात्र गेलों नाहीं. बेलूड व दक्षिणेश्वरहि चुकलें. नमाकडे जेवावें कीं इन्दूकडे असा मोठा गंभीरवाद सुरू झाला आणि त्याचे परिणामहि गंभीर स्वरुपाचे होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं तेव्हां नमानेंच माझ्या पंक्तीला इन्दूकडे जेवायला यावें अशी तोड निघून हा ‘संकट प्रसंग’ ( Crisis ) टळला !

२०-४-५०

पहांटे ५ ला नमाचे यजमान मोटार घेऊन हजर झाले. इन्दूनें तेवढ्या पहांटे घाईघाईनें चहा केलाच. काल मला चहा मिळाला नाहीं

याची तिला चुटपुट लागून राहिली होती. नमा, तिचे यजमान व तात्या मला डमडम विमानतळावर पोंचवायला आले आणि ६-१५ ला पुन्हां आमचा गगनविहार सुरू झाला.

काल दुपारच्या चंड प्रकाशांत सारी सृष्टि ढाक्क्याच्या पारदर्शक मलमलीचें अवगुंठन घेतल्यासारखी दिसत होती. आज मात्र खालीं शुभ्र ढगांची बिछाईत होती आणि वर निळ्या आकाशाचा चांदवा होता. आदिवासी लोक 'फर'च्या रंगसारख्या कापडामध्यें कांचेचे तुकडे गुंफून मोठ्या सुंदर कलाकृति काढतात हें तूं पाहिलें असशील. ही ढगांची पांढरी शुभ्र बिछाईत त्यासारखी दिसत होती. मधूनमधून भगदाडें असत तेथून खालचें दृश्य बघतांना आपण पाण्याच्या तळाशीं असणाऱ्या जल-देवतांची सृष्टि बघत आहोंत असा भास होत असे. नारळी-पोफळींचीं कुंपणें असलेलीं तीं मळेवजा घरें आणि त्यांच्यामागें तीं चिमुकलीं 'पुकुरें' मोठें बहारीचें दृश्य दिसत असे. नंतर ते ढग विरळ व तुरळक होत चालले तेव्हां खालचें दृश्य रुपेरी जरीचीं फुलें काढलेल्या बिछाईती-सारखें दिसूं लागलें.

हे ढग लवकरच सूर्य प्रकाशानें प्रकाशित झाले. वस्तुस्थितीवर आशेचे 'अपिधान' असावें आणि खालीं आशेचेंच 'उपस्मरण' असावें असें आशानिष्ठ माणसाचें मन असतें. वर, खालीं, आजूबाजूला सूर्य प्रकाशानें प्रकाशित झालेले हे रुपेरी ढग पाहून मला आशानिष्ठ माण-साच्या मनाची आठवण झाली. आज सूर्योदयाच्या वेळीं भूमातेवर आकाशाचें प्रावरण होतें. निराशावादी माणसाच्या दृष्टीची गति प्रतिबद्ध करणारें किंवा स्वप्नवादी माणसाच्या दृष्टि आड सृष्टि झांकणारें तें धुकें नव्हतें, भूलोकाला स्वर्लोकाशीं जोडणारें व्यवहारनिष्ठ आदर्शवादाचें तें पारदर्शक आच्छादन होतें. मोठीच मौज होती !

सुमारें अर्ध्या तासानें ढग वितळले. खालचा बर्फाचा समुद्र विरघ-ळला. 'मेदिनीपूर' दिसूं लागलें. ज्याला मिदनापूर म्हणतात तें हेंच. या 'मेदिनीपूर' ला आम्हीं शिकत होतों. १९०६-७ सालच्या चळवळींतील

हुतात्मा खुदीराम बसु यांचें घर आम्हीं मोठ्या भक्तिभावानें लोकांना दाखवीत असूं. गदाधर चक्रवर्ती ( रामकृष्ण परमहंस ) मेदिनीपूर जिल्ह्यांतले ! सरकार त्या मेदिनीपुरला hot bed of sedition म्हणत असे. लहानपणच्या कितीतरी आठवणींची गर्दी झाली. मालकिणीचें पहिलें पत्र मला मेदिनीपुरलाच आलें होतें. तिची आठवण झाली ! मी पृथ्वीपर्यटन करतों, अस्मानांत सहल करतों, पण ती बिचारी त्या निर्दय भिंताडामध्यें कैद आहे. मी मुलूखभर स्वैरपणें हिंडतों, आणि ती मात्र बंदिवासांत आहे ! तिची आठवण पदोपदीं येते. ती आठवण देखील माझ्या जीवनांतील बहुमोल संपत्ति आहे.

कलकत्ता तें नागपुरचें दृश्य पाटणा तें कलकत्ता या दृष्यापेक्षां पुष्कळच चांगलें आहे. उंच डोंगर आहेत, पठारें आहेत, नद्या आहेत, कालवे आहेत, दऱ्या आहेत आणि जंगलेंहि आहेत. सकाळच्या स्वच्छ प्रकाशांत घाटावरील नागमोडी वळणाचे रस्ते, नद्यांचीं वळणें, कांहीं नद्यांचे उगम, सारें कांहीं स्पष्ट दिसतें. ज्या डोंगरांचीं शिखरें वर जाऊन पहातां आलीं नसतीं, त्या शिखरांचा वरचा भाग पहायला मिळतो. मुंबईला जातांना विमानांतून कसारा घाटाच्या शिखरांचें वरचें दृष्य पहातांना माणसाचें हृदय आत्मगौरवाच्या भावनेनें फुलून येतें.

छोटा नागपूर, उडीसा, छत्तीसगड, भंडारा, रामटेक या भागांतील पर्वतश्रेणी एकाच वेळीं दिसतात. शुभ्र ढगांमुळें कित्येक डोंगर समुद्रांत पोहत असल्यासारखे भासतात आणि लहान डोंगर तर लस्सीच्या कटोऱ्यांत तरंगणाऱ्या बर्फाच्या तुकड्यासारखे दिसतात. उन्हामुळें सगळया सृष्टिवर मच्छरदाणीचें आवरण असल्याचा भास होतो. लहानपणीं आमची आजी अगदीं तलम पांढरा पारदर्शक मुकटा वाळायला लावत असे. त्यांतून खालच्या सर्व वस्तु दिसायच्या. त्याची मला आठवण झाली. कांहीं पठारें आणि मैदानें अगदीं रुक्ष आहेत. हिरवळीचें किंवा झाडांझुडपांचें नांव देखील नाहीं. नद्यांना देखील पाण्याचें वावडें आहे.

मी मोटार, आगगाडी, नाँव, विमान या निरनिराळ्या वाहनांतून

नेहमींच प्रवास करतों. तरीपण मला खिडकीजवळ बसून प्रदेश बघावासाच वाटतो. कालची सृष्टि आज नसते, मागल्या क्षणाची या क्षणीं नसते. ती प्रतिक्षणीं नवीन होते. त्यामुळें तिच्या रूपांत निरंतर नवीनता दिसते. तुला नाहीं तसें वाटत ?

अशा रीतीनें चार तासपर्यंत जमीन व अस्मान याच्यांतील भेद व अन्तर विसरून दोन्हींच्या नित्य नूतन सौन्दर्याचा आनंद अनुभवीत १०-१५ ला नागपुरला पोंचलों.

आल्याबरोबर सरस्वतीची चवकशी केली. सोनार ताबडतोब आलेच. तुझीं दोन पत्रें मिळालीं . भागलपुरचें माल मिळालें नाहीं. त्यांना आज पत्र पाठविलें. लीलाचेंहि पुण्याहून पत्र आलें. ती तुमच्यांत मिसळूं लागली म्हणते, ' तुम्ही एक अक्षरहि न बोललां तरी तुमच्याजवळ राहिल्यानेंच किती आनंद व शिक्षण मिळतें याची तुम्हांला कल्पना नाहीं, हा आरोप खरा आहे का ग ? तूं नाहींस ना करणार असला अगडबंब आरोप ?

आज तुकाराम जयन्त्युत्सवांत भाषण करीन. उद्यांच्या ग्रँडट्रंकनें किंवा परवां विमानानें हैदराबादला जाईन. बेबी बरोबर येईल. आली तर तारा टेंभुर्णीकरहि येईल. ता. २७ ला भिकूलालांकडील लग्नापुरता येऊन पुन्हां परत जाईन. तूं रायपुरला अवश्य जा. तिकडे दहाबारा दिवस रहा. नंतर तुझी पंचमढीला व्यवस्था करतों. मंडल्याला जाण्याकडे विशेष कल असेल तर अर्थातच माझी हरकत असण्याचें कारण नाहीं. तुझें शरीर व मन स्वस्थ जेथें राहील तेथें व्यवस्था करीन. शरीरहि स्वस्थ राहिलें पाहिजे असा माझा कटाक्ष आहे. रोगाची मिजास चालूं देऊं नये त्याचप्रमाणें त्याचा अम्मलहि चालूं देऊं नये. पथ्य-पाणी, औषधोपचार व नियामितपणा यांत अन्तर पडूं देऊं नये. तुझें शरीर निरोगी, कान्तिमान व कार्यक्षम रहावें अशीच माझी इच्छा असणें स्वाभाविक नाहीं का ? हें रक्त पडूं देणें, पोटांत मुरडूं देणें, दुखूं देणें, हें मांडलें आहेस काय तूं ? हें सारें बन्द कर कसें ? एरव्हीं रोग तुला फजीत केल्यावांचून रहाणार नाहीं. तूं एकदां खडखडीत बरी झालीस म्हणजे कृत्यकृत्य होईन. मला आणखी कांहीं नको.

कितीहि कामांत असलों, गर्दीत असलों, अगदीं चारचौघांत बोलत बसलों असलों तरी तुला पत्र लिहिल्यावांचून कधींच रहात नाहीं मीं. मला चैनच कोठें पडतें. तूं आमचें दुर्लभ कन्यारत्न आहेस ना ?

तुझ्या मैत्रिणीच्या कामाच्या बाबतींत तुझ्या वृत्तीची कल्पना मला आहे. प्रयत्न सोडलेला नाहीं मी. पाहूं या काय होतें तें. तूं ' जिवाचा खकाणा ' करून घेऊं नकोस, मायबाई !

बबन-चंदूची परीक्षा सुरूं आहे. अभ्यासाला जारीनें आरंभ झालेला आहे. पुस्तकांची ' कम्बख्ती ' आली आहे. तूं बबनची वाट कांहीं बघूं नकोस. हें भलतेंच परावलंबन माझ्यापासून शिकूं नकोस. तें माझें मलाच लखलाभ होऊं दे.

सरस्वती बहुतेक उद्यां घरीं जाईल. माझी प्रकृति मधूनमधून ' रंग-ढंग ' करते. अलिकडे ' संपवाद ' व अडवणुकीचें धोरण सर्वत्र बोकाळूं लागलें आहे. त्याचा संसर्ग माझ्या प्रकृतीलाहि लागूं पहात आहे. मी एकादे दिवशीं तिला lock-out च करीन म्हणतों. माझा आजारहि आतां जुनाट व मुर्दाड झालेला आहे. फारशी धायकूत करीत नाहीं.

गजाभाऊ तुझ्याजवळ आहे ही समाधानाची गोष्ट आहे. मोठा स्नेहनिष्ठ गडी आहे गबरू ! दोस्त काय म्हणतो. मस्त आहे ना ?

ती. स्व. व सौ. अक्का यांस आदरपूर्वक सा. न. पत्रें रोज पाठवीत वल. चुकूं नकोस.

ता. क.—तुझ्या घरासमोर श्री. भाऊसा. देशमुख, रेंट कंट्रोलर रहतात ना ? त्यांना माझा सप्रेम न. सांग.

कळावें हें आशीर्वाद,

कलकत्ता
दि. १९-४-५०

तुझा
दादा

# प्रेमाचे वांटेकरी : ५

बेटा,

काल तुला पत्र पाठविलेंच आहे. तुझ्या पत्राची वाट पाहिली, पण व्यर्थ. भिकुलालांना तूं धाडलेलें कार्ड गजाभाऊकडून लिहवून घेतलेलें दिसतें. त्यामुळें तुझी प्रकृति विशेष बिघडली तर नसेलना, अशी शंका माझ्या मनाला आल्यावांचून राहिली नाहीं. आतां रोज तुझ्या पत्राची वाट बघत राहीनच.

ठरल्याप्रमाणें काल संध्याकाळीं बेबीसह ग्रँडट्रंकनें निघून आज सकाळीं ८ ला येथें पोंचलों. हरिद्वारच्या कुंभमेळ्याचा परिणाम आम्हा-लाहि भोगावा लागला. पहिल्या वर्गाचीं तिकिटें काढावीं लागलीं त्यापेक्षां विमान परवडलें असतें. पण चांद्याहून बरोबर येण्याविषयीं तारा टेंभुर्णीकरला तार केली होती. म्हणून मुद्दाम आगगाडीनें आलों. पण शेवटीं तारीटली आली नाहीं ती नाहींच. माशी कोठें शिंकली, देव जाणे ! तुम्हां मुलींचीं मनें भलतीच नाजूक ! आणि त्यांत पुन्हां अनंत नागमोडी वळणाचीं !

लीला म्हणते, ' तुमच्या सहवासांत मला किती शिकतां येतें त्याची तुम्हांला कांहीं कल्पनाच देतां येणें शक्य नाहीं. तुम्ही एक शब्दहि बोलत नाहीं खरें, पण तुमच्या सान्निध्यांत मी आहे ही जाणीव व तें सान्निध्यच किती सुखाचें आहे ? '

आतां, हें ती माझ्याजवळ बोलली असती तर मीं तिला बिहारला नसतों का घेऊन गेलों. बापाजवळहि हट्ट धरणें तुमच्या मानी स्वभावाला मानवत नाहीं का ? अशा कशा ग तुम्ही आंतल्या गांठीच्या ? तुम्ही माझ्याजवळ हट्ट धरण्यांत माझा गौरवच नाहीं तर माझ्या जीवनांतील देवदुर्लभ आनंदहि आहे.

येथें दामोदर आहे, मीरा आहे, बेबी आहे, हरिश्चंद्र आहे. ही सारी मंडळी मला सिकंदराबादलाच घ्यायला आली होती. दामोदरनें तुझी चवकशी केली. त्यानें तुला पत्र पाठविलें तें तुला पोंचलें ना ?

ज्ञान येथें नव्हती. आतां मुंबईहून आली. तुझ्याप्रमाणेंच ती मोठी ' लीडर ' आहे. पण ती राजकारणांतहि उडी घेण्यास कमी करीत नाहीं. हैदराबादच्या सर्वच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळींत तिचा सक्रिय व प्रमुख भाग असायचाच. धंदेवाईक ' लीडर ' नाहीं. पण हौशी आहे. ' बेबी ' मीरा आणि ज्ञानकुमारी यांच्या जोडीला तूंहि असतीस तर ! आनंदांत व लाभांतहि किती भर पडली असती ? निर्विकार व अकृत्रिम प्रेमांत हें वैशिष्ट्य असतें. त्याला मत्सराचा कधीं स्पर्श देखील होत नाहीं. त्यांत जितके वांटेकरी होतील तितकीच त्याची खोली व आनंद यांची वाढ होते.

येथें ता. २७ पर्यंत आहे. ता. २७ ला विमानानें निघून नागपुरला पोंचेन आणि तेथून मोटारनें अकोल्याला येईन. तेथून पहांटे मेलनें पुन्हां परत येईन. ता २८ ला विमानानें येथें पोंचेन. तूं ता. २५ लाच रायपुरला गेलेली असशील. तूं आपल्या कार्यक्रमांत फरक करण्याचें कारण नाहीं. मी ती. स्व. बापू व सौ. अक्का यांना नमस्कार करायला जाईन.

काल स्टेशनवर सौ. धाबे भेटल्या होत्या. त्यांना तुझा ता. २५ ला सबंध दिवस स्टेशनावर थांबण्याचा विचार सांगितला. त्यांना आनंद झाला. तूं त्यांना लिहिणार असशीलच ?

दामोदर अगदीं कामांत गर्क आहे. दिवसांत चोविसच तास असतात याचेंच त्याला दुःख आहे. इतरांकरितां अनिच्छेनें राबणारे मजूर म्हणतात कामाचे तास कमी करा, दामोदरची तक्रार अशी आहे कीं कामाला तासच पुरत नाहींत. एक म्हणतो ' कालोजगद्भक्षकः ' दामोदर म्हणतो कर्मयोगाची अशी करामत आहे कीं कार्य हेंच सारा वेळ खाऊन जातें. ' विद्युच्चलंजीवितम् ' हें जरी खरें असलें तरी जेथें विद्युत असेल तेथें प्रकाशहि असतो आणि क्रियाशक्तीहि असते आणि म्हणूनच वेगहि असतो. म्हणून जीविताच्या चलनशीलतेबद्दल आनंदच मानला पाहिजे.

ज्ञान, मीरा, हरिश्चंद सर्वांनाच शिबिराचे वेध लागले आहेत. घर हें दप्तर झालें आहे. खाण्यापिण्याकडे फारसें लक्षहि नाहीं आणि लक्ष द्यायला

फुरसतहि नाहीं. हें माझ्या पथ्यावर आहे. कारण अनशन हें पथ्य मला फारसें रुचत नसलें तरी मानवतें फार. पण इतक्या गर्दींतहि चहाबरोबर रगड न्याहारी मिळाली आणि जेवणहि चुकण्याचा संभव नाहीं.

तूं विचारलेल्या प्रश्नाचें सविस्तर उत्तर तुझ्या किंवा लिलाच्या पत्रांत लवकरच लिहीन. लीलाला लिहिलें तरी तुझ्या उपयोगी पडेलच. तेथलि महिला समाजाच्या कामांत तूं लक्ष घालायला मुळींच हरकत नाहीं. हें कार्य खेड्यापर्यंत पोंचविण्याची शक्ति तुझ्या अंगीं विशेष आहे.

बेटा आपल्या प्रकृतीची आबाळ होऊं देऊं नकोस. लोककार्यकर्त्यांचें शरीर हेंच भांडवल. तीच त्याची संपत्ति. ती सुरक्षित ठेवून तिची उपयुक्तता वाढविली पाहिजे.

ती. स्व. बापू व सौ. अक्का यांस आदरपूर्वक सा. न. वि. गजाभाऊला आ. दोस्ताला स्नेहपूर्वक स्मरण.

कळावें हे आशीर्वाद

हैदराबाद (दक्षिण) तुझा

दि २२-४-५० दादा

---

## हा संगम मोठा मातबर आहे : ६

मायबाई,

तूं माझी आई होण्याचें कबूल केलें आहे. माझें पितृत्व त्यांतील ' उणीवा व दोषांसकट तूं पोटांत घातलें आहेस ना ? तुझें कन्यात्व माझ्या पितृत्वांत समाविष्ट झालें आहे त्याचप्रमाणें. म्हणून तुला आतां माझा हट्ट पुरवावा लागेल. आणि आज्ञाहि मानावी लागेल. ' नकटं व्हावं पण धाकटं होऊं नये ' तुझ्या प्रकृतीची सर्व कच्ची हकीकत मला रोज तुझ्याच तोंडून कळली पाहिजे. मी रोज तुझ्या पत्राची वाट पाहीन.

आज पहांटे प्रातर्विधी व अंघोळ आटपून येथें शिबिरांत आलों. सकाळीं ७ ला प्रार्थना झाली. नंतर कताई, त्यानंतर प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष दिगंबरराज बिन्दु यांच्या हस्तें झेंडावन्दन आणि त्यांचें लहानसें भाषण. नंतर दामोदरनें आपलें प्रास्ताविक भाषण वाचून दाखविलें. त्यानंतर मी उद्घाटनाचें भाषण केलें. खूप रंग भरला. रसवन्ती प्रसन्न होती. वाग्देवीच्या कृपाप्रसादानें आख्यायिका, दृष्टान्त, उदाहरणें, युक्तिवाद व निरुपण अगदीं भरजरीचें व कलाकुसरीचें सगंग तयार करण्यास उपयोगी पडले. बोलविल्या धन्यानें बुद्धींत नवीन नवीन उन्मेषाचें आविष्करण केलें. सभेंत सन्तोषाचे व धन्यतेचे उद्‌गार निघूं लागले. सरोजिनींची पद्मजा हुरळून गेली. दहा वर्षांपूर्वी ती अशीच हुरळून गेली होती! पण व्यक्तींची स्मृति अत्यल्प असते! मीरा म्हणाली, ‘कमाल झाली. तुमच्या वांचून हें शिबिर सुनं वाटेल! ज्ञान म्हणाली, ‘तुमच्या डोक्यांत हें टिकतें कसें? तें गळत कसें नाहीं?’ या मुली होत्या म्हणून मोकळेपणानें बोलल्या. इतर प्रतिष्ठितांनीं सभ्य व मर्यादित शब्दांत अभिनंदन केलें. तुला जर खरें शिक्षण घ्यायचें असेल तर हें सारें तूं ऐकायला हवें. याच्या शतांशहि तूं ऐकलेलें नाहींस—अर्थात माझ्या तोंडून! दुसरीकडे तूं अधिक आणि विशेषहि ऐकलें असशील कदाचित.

शिबिर संगमावर आहे. संगम भिकार व गचाळ आहे. नागपुरांतील धनतोलीवरील नागनदीच्या संगमापेक्षां कमी घाणेरडा. अंघोळीला स्वच्छ पाणी नाहीं. पिण्याचें पाणी लांबून आणवावें लागतें. पण बापूंच्या भस्म विसर्जनाचें हें क्षेत्र आहे. त्यामुळें तें पवित्र आहे. शिबीर घनदाट व सुन्दर आमराईत आहे. रस्त्याच्या पलीकडे इतिहासप्रसिद्ध गोळकोंडा किल्ला आहे. मला व बेबीला स्वतंत्र तंबू देण्यांत आला आहे. तूं मात्र बसलीस एकीकडे जाऊन. माझी प्रार्थना उणी पडते. भक्तीचें अमोघ सामर्थ्य तिच्यांत प्रकट होत नाहीं.

शिबिरांत निरनिराळ्या गटांची व मतांचीं माणसें आलीं आहेत. द्रव्य, सामग्री व श्रम सर्वच प्रकारचें सहाय्य स्वयंस्फूर्तीनें मिळालें आहे.

दामोदरची स्नेहयुक्त निष्ठा व अविरत उद्योग यांस हरिश्चंद्रांच्या व डॉ. चन्नार रेड्डींच्या पराक्रमाची व प्रतिष्ठेची जोड मिळालेली आहे. ता संगम भिकार असला तरी हा संगम मोठा मातबर आहे.

रोज सकाळीं दोन तास व रात्रीं दोन तास असा रोज चार तास वाग्यज्ञाचा 'सप्ताह' करायचा आहे. इतकं विचारैश्वर्य कोठून आणूं ? पण आतां ती विवंचनाहि बोलवित्याच्या पायीं अर्पण करून त्याच्या कृपेची वाट पाहाण्याखेरीच गत्यंतर नाहीं.

तूं परवा पहांटे कदाचित रायपुरला जाशील. जाण्यापूर्वी मला कळविशीलच. कार्डावर दोन ओळी लिहिल्यास तरी पुरे. दिल्लीला नं. ७ फिरोजशहा रोडवर असतांना फोनवरून सकाळीं व संध्याकाळीं नुसतेंच 'मी विमल' म्हणत होतीस ना ? तेवढ्या शब्दांतहि संजीवन शक्ति आहे. मजकूर दुसऱ्यांकडून लिहवून घे. फक्त 'विमल' हीं तीन अक्षरें तुझीं स्वदस्तूरचीं असलीं म्हणजे झालें.

रायपूरला गेली नाहींस तर ता. २७ ला मी भेटायला येईन. त्या भेटीनें मला संजीवन मिळेल ! तुला विरक्तीची बाधा झाली असेल. मला मात्र निर्विकारी स्नेहांतूनच जीवनरस मिळतो. त्यामुळें येथून सुटका झाल्याबरोबर रानांतून परतणाऱ्या माऊलीच्या गतीनें मी तुला भेटायला येणार !

ति. स्व. बापू व सौ. अक्का यांच्या चित्ताला व्यथा होतील असें कांहीं करूं नकोस. ऋषि व देव यांचें ऋण संभाळून पितरांचेंहि ऋण संभाळलें पाहिजे. माझें मात्र तुझ्यावर ऋण नसल्यामुळें माझी मर्जी संभाळणें व जुलूमहि सहन करणें हें तुझ्या वात्सल्ययोगाचें महत्त्वाचें कलम आहे. समजलीस !

ती. स्व. बापू व सौ. अक्का यांस आदरपूर्वक सा. न. चि. गजाभाऊला आ. दोस्ताला प्रेमपूर्वक आठवण.

कळावें, हे आशिर्वाद.

तुझा

दादा

ता. क.–मीरा, दामोदर, ज्ञान, हरिश्चंद्र या जोड्यांचा तुला संयुक्त न. हरिश्चंद्र म्हणतो, ' कुंतीनें भगवंताजवळ ' विपदः सन्तु नः शश्वतः ' आम्हांला नेहमीं विपदा असोत असा वर मागितला. आपल्याला तो न मागतांच निरन्तर विपत्ति देतो. केवढा कृपाळू आहे तो ! ' याला म्हणावें रगदार मन. माझ्या चित्तानें ठाव सोडला होता. तें पुन्हां स्वस्थ झालें.

कळावें हें आ.

सर्वोदय शिबिर, संगम, तुझा
हैदराबाद ( दक्षिण ) दादा
दि. २३-४-५०

---

# मी गुन्हा कबूल केला : ७

चि. मुली,

पुण्याच्या स्टेशनांत गाडी शिरतांच श्रीपादनें पहिला प्रश्न केला विमलताई कोठें आहे ? ती येणार अशी खात्री होती. मी तिचें कोल्हापूरचें तिकीट काढूनच ठेवणार होतों. पण तुमच्या तारेंत 'सीट' असा एकवचनी प्रयोग होता म्हणून एकच तिकीट काढलें. तिला तरी आणायची होती ! ही पहिली सलामी.

कोल्हापूर स्टेशनांत प्रवेश करतांच नाना, भाऊ, प्रि. गोकाक इ. मंडळींनीं भालजीबाबांचा परिचय करून दिला. ते मोटार घेऊन मुद्दाम आले होते. तूं येशीलच या खात्रीमुळें. ते खट्टू झाले. तुला न आणल्या-बद्दल त्यांचे डोळे, त्यांची चर्या त्यांचें सारें अस्तित्व वक्तृत्वपूर्ण मूकतेनें माझी निर्भत्सना करीत होतें. लीलाताईचा चेहरा कसा होईल यांचें त्यांनीं कलात्मक वर्णन करून माझी मनोव्यथा वाढविली ! परुळेकर, मामा क्षीर-सागर, नाना, भाऊ, दीक्षित गुरुजी सर्वांनीं मला ठपका दिला. तुलाहि दिला. म्हणाले, ' विमलाताई आमच्या झालेल्या आहेत. त्यांनीं तुम्हाला बरोबर आणायला हवें होतें ! भय्याकाका, कमलकाकू, तुझी वाट बघत असल्यामुळें त्यांचाहि विरस झाला. मी गुन्हा कबूल केला.

दुपारीं भालजीबाबा, लीलाताई, भय्या, कमल, नाना, नानांच्या बहीण—मथुरेच्या प्रा. धारवाडकरांच्या आई—ही सारी मंडळी मिळून पन्हाळ्याला गेलों. विमलाताई पन्हाळ्याला जायचें नांव निघतांच नाचूं लागत. या तटावर तुरुतुरु हिंडत, येथें टुण्टुण् उड्या मारीत, येथें जेवीत ! एक ना दोन ! बाबा व लीलाताई यांनीं पावलोपावलीं व क्षणाक्षणाला तुझें कौतुक सांगावें ! माझें हृदय भरून येई. तुझ्यामुळेंच मी त्यांना हवासा वाटूं लागलों. दोघांनींहि म्हटलें ' विमलाताईमुळें तुम्ही आधींच आमचे झालां होतां ! ' एका ठिकाणीं निसरड्यावर पाय घसरला. लीलाताई मला उचलायला धांवल्या. त्यांची मुद्रा किती कावरीबावरी झाली होती म्हणून सांगूं ? त्यांत भालजी त्यांची टिंगल करूं लागले. चहाच्या वेळीं गप्पा झाल्या. नानांनीं प्रश्न केले. चर्चा ऐकून भालजी म्हणाले, इतकें सोपें असंदिग्ध व बिनचूक विवेचन आजच ऐकलें. यांनीं व विमलाबाईनीं येथें येऊन राहिलेंच पाहिजे. त्यांनीं माझ्याजवळून तसें वचनहि घेतलें. चर्चेनें नानाहि बेहद्द खूष झाला !

१५।८ ला लीलाताईकडे जेवायला गेलों. ताई म्हणत होत्या, दादांना अमुक आवडतें इ. सुरूं झालें. तुला जशी खिचडी करून घालत तशी जातीनें मला करून घातली. भरवून देण्याचेंच बाकी ठेवलें. पंधरा मिनिटांच्या विश्रांतीकरितां स्वतः लीलाताईनीं अंथरूण करून दिलें ! भालजी बाबा दिवसभर बरोबर होते. म्हणाले, मी कोणाबरोबर रहात नाहीं. पण तुमचा सहवास हवासा वाटला. तुला बरोबर आणण्याच्या वचनाची कितीदां तरी आठवण करून दिली.

भाऊसा० ( वि. स. ) खांडेकर भेटले. अलोट सौजन्य व सहृदयता. अप्पा फडके ( ना. सी. ) गांवीं नव्हते. खांडेकरांचा पहिलाच परिचय. पण फार आपुलकी दाखविली.

रात्रीं लीलाताईनीं शिदोरी पाठविली. खिचडी व भाज्या. भालजी बाबांनीं आणून दिली. भालजी बाबा उमदा व दिलदार गडी ! लीलाताई मोठ्याच ममताळू व आतिथ्यकुशल !

पुण्याला महाजन भाऊ, कवि बोरकर व श्रीपाद यांच्याकडे जाऊन आलों. श्रीपादची पत्नी माणिक हिनें स्वतः तयार केलेला एक गळपट्टा व एक उशीचा अभ्रा दिला. प्रवासासाठीं इडलीची शिदोरी दिली. दरेकानें 'विमलताईना घेऊन पुन्हां या' म्हणून वारंवार बजावलें. मी अगदीं कानकोंडा झालों. पोरी, पण तूं तरी कसली मिसकिल नि खोडसाळ! तूं कां आली नाहींस हट्ट करून? तो तुझा हक्क नव्हे? तें तुझें कर्तव्य नव्हे? बाळू म्हणाला होता विमाताई येतील हें मी धरून चाललों होतों. सामानावांचूनच तुला स्टेशनावरून घेऊन जाण्याचा बेत मी मोठ्या कष्टानें रहित केला.

आज आल्याबरोबर येणार होतों पण तुमच्या आईला रवाना करण्याच्या उद्योगाला लागलों. तिच्याविषयींच्या विचारांनीं काहूर माजविलें आहे. तूं केव्हां येतेस? तुमची आई दुपारीं १ चे सुमारास रवाना झाली.

कळावें हे आशिर्वाद

धन्तोली, नागपूर तुझा
तारीख १७-८-१९५० दादा

---

# संगरिया ते अबोहर : ८

बेटा,

कालचा रविवार होता. त्यामुळें पत्र लिहिलें नाहीं. आज पहाटे ६ ला मोटारनें संगारियाहून निघालों. थंडी खूप होती आणि वाराहि सोसाट्याचा होता. मोटारला फक्त कॅनव्हसचें 'हूड' होतें. येथील लोकांच्या दृष्टीनें मात्र ती 'बन्द मोटार' होती. बुरखेवाल्या कुलस्त्रीप्रमाणें सर्वांग व सारा चेहरा अवगुंठनानें झांकून चाळीस मैल प्रवास केला. समुद्राच्या वाळवंटांतून प्रवास करवल्याप्रमाणें आमची मोटार अक्षरशः चाळीस पंचेचाळीस मैल वाळू तुडवीत आली.

संगरियाला दोन दिवस होतों. काल इंदुराहून काशीनाथजी आले. आल्याबरोबर त्यांनीं पहिला प्रश्न विचारला ' विमलाताई नाहीं आल्या ? ' दोन दिवसांत तीन भाषणें केलीं. काल सकाळीं महिला आश्रमाच्या उद्घाटनाच्या वेळीं केलेलें भाषण ऐकून सारे लोक जीर्णमतवादीहि हरळून गेले, कारण ते बिचारे संस्कृतिवादी–शास्त्री–पंडित नव्हते ! नाहीं म्हणायला एक शास्त्री श्री. विद्याधरशास्त्री हेहि फार प्रसन्न झाले. गंगानगरच्या सनातन धर्मसभेच्या चिटणिसांनीं तर मला आग्रहाचें आमंत्रण दिलें. संगरियाच्या आसपासच्या भागांतील पं. ठाकुरदास भार्गव यांचे व डॉ. गोपीचंद भार्गव यांचे सोबती, जुने कसलेले वृद्ध नेते × यांनीं म्हटलें ' मी जन्मांत असलें विवेचन ऐकलें नाहीं. ' माझा प्रवास सफल झाला.

संगरियाचा प्रवास एकंदरींत आरामाचा झाला. पाण्याच्या दुर्भिक्षामुळें भांडीं वाळूनेंच घासून फडक्यानें साफ केलेलीं मिळत. अर्थात थोडी तरी वाळू पोटांत जातच असे. पण दोन्ही सांजा, पोळ्या, वरण, भाजी खाऊनहि अपचन मात्र झालें नाहीं. उलट, कडक भूक लागत असे. तूं येथें आलीस तर जडीवांचून आणि कुठल्याहि उपचारावांचून खडखडीत बरी होशील.

संगरियाच्या विद्यापीठाचा व्याप आणि विस्तार पाहिला म्हणजे सकृद्दर्शनी मोठें कौतुक वाटतें. जेथें जमिनींत अतिशय खोल खणल्यावरहि इतकें खारें पाणी लागतें कीं झाडेंहि करपून जातात. तेथें स्वामींनीं एक सुबकशी वाटिका लावली आहे. माणसाला ज्ञान किंवा चारित्र्य यांपेक्षां चमत्कारांचें जास्त महत्त्व वाटतें हेंच खरें. म्हणूनच ज्ञान, सदाचार किंवा भक्ति यांपेक्षां योगसिद्धीनें माणूस अधिक दिपून जातो. तत्त्वज्ञानापेक्षां किंवा गुणविकासापेक्षां विज्ञानाच्या चमत्कारांची जगाला विशेष कदर वाटते. संगरियाला इमारती, स्वच्छता, बाह्य देखावा फार चांगला आहे. स्वामींच्या अखंड सेवावृत्तीचा व पुरुषार्थाचा तो परिणाम आहे. पण स्वामींच्या कर्तृत्वाला, अविरत उद्योगाला व अद्‌भुत पुरुषार्थाला विचार वैभवाची व कल्पकतेची जोड मात्र मिळाली नाहीं. त्यामुळें इतर अनेक संस्थांप्रमाणेंच संगरिया विद्यापीठाचें अंतरंग आकर्षक वाटत नाहीं.

संगरियापर्यन्त आलोंच होतों म्हणूनच बिकानेरला जाऊन येण्याचा विचार मनांत आला. पण एकतर तेगरामजींचा अबोहरला चलण्याविषयींचा आग्रह होता आणि दुसरें बोलावल्यावांचून किंवा इतर कोणी बरोबर असल्यावांचून कोठेंहि जाण्याची सामान्य अप्रवृत्ति म्हणून अबोहरलाच आलों. साहित्य सदनांत मुक्काम आहे.

रात्रीं ९ : अबोहरला पुरेसें पाणी मिळालें. कपडे धुवायला अगदीं उदंड पाणी मिळालें. कपडे धुवून टाकले. गांवांत चक्कर केली. अबोहर एका वसाहतसारखें रेखीव आहे. रस्ते व बोळ अगदीं सरळ रेषेंत आंखलेले. बिकानेर व पंजाब यांच्या सरहद्दीजवळ असल्यामुळें पंजाबी व मारवाडी यांची संमिश्र वस्ती आहे. पण गांवाचे दोन भागच पडलेले आहेत.

अबोहरला जुनी स्नेही मंडळी भेटली. सायंकाळीं ४–५० ते ६ पर्यन्त भाषण केलें. ६–१५ च्या गाडीनें निघालों आणि आतां पंजाब मेलची ११ पर्यन्त वाट बघत आहे.

अबोहरला मथुरेचे हरनारायणसिंह भेटले. मथुरेला येण्याचा मनस्वी आग्रह केला. ता. ९–१२ ला किसान परिषद आहे. कच्चा रुकार दिला. पण मथुरेला तुझ्यावांचून कसें बरें जायचें ? त्यांनीं तुला आणण्याचा आग्रह केला आहे.

मी जुन्नर, औरंगाबाद व बीड उरकून ता. १–१२ किंवा २–१२ ला वर्ध्याला येतों. तोपर्यंत तूंहि तेथें येशील असें धरून चालतों. जमेल तितके दिवस वर्ध्याला राहीन.

---

## साम्यवाद नकोसा वाटत नाहीं : ९

पंजाब मेल ता. २१-११-५०

रात्रीं ११-२६ ला भटिंड्याहून निघालों. काशीनाथजीहि संगरियाहून आलेले होते. दिल्लीपर्यन्त त्यांची सोबत लाभली. इंटर क्लासमध्यें दोघांनाहि पुरेशी जागा मिळाली. आज पहांटे ६-१० ला दिल्लीला पोंचलों. ८-४० ला

गाडीपुढें जाणार होतो. काशिनाथजी, फ्रॉंटियर मेलमध्यें गेले. त्याचवेळीं दादा पाटील मला घेऊन गेले. त्याच्या घरीं चहा घेऊन अंघोळ केली. द्वादशी सोडायला दादांनीं भक्कम शिदोरी देऊन ठेवली.

त्या घाईतहि गिरिधारी भय्यांचा शोध करण्याची उर्मि आवरेना. स्टेशनवर येतांना मुद्दाम हार्डिंज ॲव्हेन्यू नं. २ मध्यें डोकावून पाहिलें. भय्या करोल बागेंत भाभींकडे रहातात म्हणून समजलें. वाटलें त्यांच्या भेटीकरतां थांबावेंच पण त्यांचा निश्चित पत्ता ज्या ड्रायव्हरला माहीत आहे तो नव्हता आणि भय्या दिल्लीलाच आहेत कीं नाहीं तेंहि कोणी सांगू शकलें नाहीं. संतोषच्या भेटीकरितां तरी थांबावेसें वाटलें. पण शेवटीं मनांतली इच्छा तशीच आवरून निघालों ! आयत्या वेळीं पंजाब मेलनें पुढें जाण्याची लहरच अधिक बलवान ठरली. त्या दिवशीं सन्तोषचें घर शोधायला करोल बागेंत अर्धा तास सारख्या घिरट्या घातल्या. दादा वारलिंगे व दादा पाटील यांस गिरिधारीजींचा तपास करण्यास सांगून निघालों खरा पण मन अगदीं अस्वस्थ आहे. दिवसभर थांबून शोध करायला हवें होतें असेंच राहून राहून वाटतें. आतां गाडी पुढें पुढें जात आहे. मी मात्र स्वतःला दोष देत देत गाडीबरोबर जात आहे. माझ्या स्वभावांतील 'अनिर्णय' असा आयत्या वेळीं दावा साधतो. 'प्रसंगानंतर शहाणपण' माझ्या प्रवृत्तींतील एक लकेर आहे. 'पश्चादबुद्धि' विद्वत्तेचें लक्षण आहे म्हणतात. पण या विद्वल्लक्षणामुळें मी गिरिधारी भय्या व सन्तोष यांच्या दुर्लभ भेटीला मुकलों. या गुन्ह्याबद्दल मी स्वतःला लवकर क्षमा करूं शकणार नाहीं. गिरिधारीजींचा स्नेह माझ्या जीवनाचा एक अनमोल निधि आहे. तो तुझ्यामुळें लाभला म्हणून त्याच्या अनमोलतेंत भर पडली आहे ! पण स्वतःच्या करंटेपणाबद्दल आतां संतापून काय उपयोग ? वेळ निघून गेली.

माझ्या भाषणांनीं शिष्ट, विशिष्ट व सामान्य सर्वांनाच समाधान होतें. विश्लेषण व विवेचन त्यांना बिनतोड वाटतें. पण देशाची परिस्थिति पाहून माझें चित्त माल अस्वस्थ आहे. बुद्धीचा निश्चय म्हणून होत नाहीं. अमेरिकेवर विश्वास बसत नाहीं. रशियाविषयीं तिरस्कार वाटत नाहीं. युद्धांतून अलिप्त रहावें हेंच योग्य वाटतें. पण कोणाला सामील व्हावेंच लागलें तर

रशियाच बरा असाच मनाचा कल आहे. पण निर्णय करण्याइतकी माहितीहि नाहीं आणि अंदाजहि नाहीं. म्हणून चित्त मोठें व्याकुळ व बेचैन आहे. काल अबोहरला खाजगी चर्चेत मीं हें प्रांजलपणें सांगितलें. त्या प्रांजळपणामुळेंच लोकांना पुष्कळ समाधान वाटलें. ते म्हणाले ‘ इतका प्रामाणिकपणा बुद्धिमान लोकांनीं दाखविला तरी आमचा त्यांच्यावर विश्वास बसेल. ’ साम्यवाद अनिष्ट वाटतो पण अगदीं नकोसा वाटत नाहीं. दांभिक उदारमतवाद व मायावी लोकसत्तावाद यांची मात्र शिसारी वाटते. साम्यवादापेक्षां सरस व श्रेयस्कर तत्वज्ञान आपल्याजवळ आहे याबद्दल मनाची खात्री आहे म्हणून बुद्धि अव्यग्र आहे.

विपत्ति इतकी सार्वत्रिक य भयंकर आहे कीं कोणालाच आत्मविश्वास वाटत नाहीं, स्वतःवरला विश्वास उडाला कीं दुसऱ्यांवर विश्वास असणें शक्य होत नाहीं. याहून भयंकर राष्ट्रीय आपत्ति कुठली असूं शकेल !

---

# तूं ईश्वरनिष्ठेचा प्रचार कर : १०

बेतूल : १२-११-५०

आज पहांटे येथें पोंचलों. तुझे व भय्याजी पांढरी पांडे यांचें अशीं दोन कार्डें मिळालीं. उद्यां काटोलला भय्याजींच्या कामाकरितां उतरायचें नाहीं. दिल्लीलाच दिवसभर राहिलों असतों तर ? पण माझें करंटेपण आडवें आलें. गिरिधारीजींचा सहवास लाभला नाहीं. दैवानें दिलेलें कर्मानें घालविलें.

आतां जेवून मूळतापीला प. पू. भाऊसाहेबांच्या भेटीलाच जाईन. उद्यां सकाळीं नागपूर. दादा पाटलांनीं पत्रें आल्याची फक्त बातमीच दिली. पत्रें दिलीं नाहींत. त्यामुळें तुझें पत्र मिळालें नाहीं.

बाल हनुमान संघ हैदराबाद यास नकाराची तार आज केली. बीडचा कार्यक्रम आटपून ता. १ नंतर वर्ध्याला येतों. ठरल्याप्रमाणें तेथें सर्वोदयाच्या कामाकरितां राहूं. अर्थातच तुला मानवलें, जमलें आणि आवडलें तर एरव्ही माझें मी करीनच.

मूळतापी : २२-११-५०. दुपारीं १२-३५ ला लॉरीनें निघून सुमारें २ ला येथें आलों. प. पू. भाऊसाहेबांना आज वैकुंठ चतुर्दशीचा उपवास व व्रत आहे. त्यांच्याशीं थोडें बोलणें झालें. सायंकाळीं देशमुखांकडे पुन्हां चर्चा झाली. मोठी उद्‌बोधक चर्चा झाली. पूर्वी जी माझी बौद्धिक निष्ठा होती ती आतां प्रत्ययांत परिणत होत आहे. प. पू. भाऊसाहेब म्हणाले, ' तूं ईश्वरनिष्ठेचा प्रचार कर. त्यावांचून तरणोपाय नाहीं. शब्द माझ्या हृदयाला जाऊन भिडले. भगवानाच्या अधिष्ठानावांचून गत्यन्तर नाहीं. ईश्वर ही आजच्या जगाची राजकीय आवश्यकता आहे ही माझ्या मनाची खात्री केव्हांच झालेली आहे. ज्या राष्ट्राजवळ बाहुबल नाहीं, तपोबल नाहीं, विज्ञानबल नाहीं त्याचें ' राम ' हेंच एक मात्र बल आहे. तो देश जर का रामाला अन्तरला तर मग त्याला थाराच नाहीं !

आज सर्वत्र संहार शक्तीचा बोलबाला आहे. दरेकाला दुसऱ्याच्या संहारक शक्तीची धास्ती वाटते, म्हणून सगळेच गप्प आहेत. पण स्तब्धता निराळी, शांतता निराळी. प्रलयाच्या शक्तीचें रूपांतर संजीवनी विद्येंत करण्याची अनुपम कला ज्या शिवशंकरामध्यें आहे त्याच्या सामर्थ्याचें आवाहन यावेळीं केलें पाहिजे. शिवाची विभूति जितकी भव्य तितकीच लोभनीय आहे. त्याची करुणा इतकी अमर्याद आणि अमूप आहे कीं तिच्यामुळें विषालाहि संजीवन शक्ती येते. विषाचें औषध झालें म्हणजे त्यांत अमृताचे गुण येतात. अखिल भूगोलाच्या करुणेनें कळवळणाऱ्या शिवानेंच स्मशान हें आपलें जीवनक्षेत्र बनवावें. स्मशानच लीलाभूमि झाली म्हणजे मृत्यूचें भयच उरत नाहीं. चिताभस्माची 'विभूति' होते. भोग-विलासवादी असुरांचा वांकडेपणा नाहीसा करणारा हा शंकरच नाहीं का? साऱ्या असुरांनीं त्याचीच आराधना केली. असुरांचाहि देव बनवण्याची हिम्मत एकट्या शंकरांतच नाहीं कां बाळ ? आज जगांत दाही दिशांना व्यापून टाकणाऱ्या संहारशक्तीचा प्रतिकारहि शिवाची विभूतिच करील असें नाहीं का तुला वाटत बेटा ?

स्मशानांतहि जीवनाची ज्योत चेतविण्याला द्वेष, ईर्षा आणि असूया यांच्या ऐवजीं स्नेहाची पेरणी करणें हाच एकमात्र उपाय आहे असा मला

उत्तरोत्तर प्रत्यय येत आहे. जो देव श्रियाळाला कुष्ठरोगांत दिसला, दामाजीला विठू महारांत दिसला, विष्णुगुप्ताला चांडाळांत दिसला, प्रल्हादाला खांबांत दिसला तो मला सामान्य माणसांत दिसणार नाहीं का ग ? माझ्या चित्ताला हा ध्यास लागला आहे. निरपेक्ष व निर्विकारी प्रेमावांचून दुसरें साधन नाहीं. भजन, कीर्तन, भगवंताचें गुणनिरूपण ऐकलें कीं हृदय प्रेम निर्भर होतें. माणसामाणसांतील निरपेक्ष प्रेमाचें तोच एकमात्र अधिष्ठान आहे. ' रामहि केवळ प्रेम पियारा ' ! बेटा माझ्या या धडपडीशीं तूं समरस होणार आहेस ना ? तो वैकुंठीचा देव आतां धांवत यावा असा धांवा करण्याची, करुणा भाकण्याची वेळ आतां आली आहे. योगी जनांचें योग सामर्थ्य, तपस्व्यांचें तपोबल आतां प्रतिसृष्टिवादांत वेंचलें जाऊं नये, मनीषि लोकांची संकल्पशक्ती 'कल्पतरुवादांत' खर्ची पडूं नये म्हणून आज 'आधिक भूगोल कृपया ' जीवनांतील ' विष ' प्राशन करून त्याला जीवनदायी तत्वांचें रूप देणाऱ्या शिवाच्या सामर्थ्याची आराधना करणें अगत्याचें आहे. मानवाच्या रोजच्या व्यवहारांत भगवंत पुन्हां गुप्त रूपानें येऊन बसला, मानवाला त्याच्या साक्षित्वाचें नित्य भान राहिलें, तरच आपलें सामाजिक जीवन प्रतिष्ठित व प्राणवान होईल, एरव्हीं नाहीं. लौकिक आसक्ति व काम याहून श्रेष्ठ प्रतीच्या प्रेमाची आज गरज आहे.

यश व वैभव पचविण्यास संयम पुरेसा ठरतो. पण अपयश व विपत्ति माणसाची निष्ठा कसोटीला लावतात. आज आमची ईश्वरनिष्ठेची व मानव निष्ठेची कसोटी आहे.

नागपूर :–सकाळीं १०-३० ला येथें पोंचलों. दिल्लीला तूं पाठविलेलें पत्र येथें आलें होतें. भालजी बाबा व माई यांच्याविषयीं वाचून चित्त खिन्न झालें. त्या माणसांबद्दल मला देखील विलक्षण आत्मीयता वाटते. त्यांना तारच करणार आहें मी.

तूं परवां परत येशील. माझी व तुझी गांठ कदाचित पडेल, कदाचित पडणारहि नाहीं. मी तुला ता. १८ ला एक पत्र संगरियाहून धाडलें. तें येथेंच असेल, हें पत्रहि येथेंच मिळेल. जुन्नर व बीड येथील कार्यक्रमाकरितां

उद्यां किंवा फार तर परवां जावेंच लागणार. बिहार व आसाम, मध्यभारत व राजस्थान आणि पंजाब या प्रांतांचीं निमंत्रणें, तारा व पत्रें येत आहेत. माझ्या निष्ठेची परीक्षा होत आहे. तूं काय करणार आहेस ? तूं म्हणतेस ' पुढें जशी ईश्वरी योजना असेल तसें होईल ' ' ईश्वरनिष्ठा व दैवावर हवाला या दोन अगदीं भिन्न व क्वचित विरोधी वृत्ती आहेत ' ईश्वरी योजनेला ' मानवी प्रवृत्तीचें व प्रयत्नांचें मूळ असावें लागतें. ती ' प्रवृत्ति तुला ठरवितां यावी हाच माझ्या स्नेहाचा उपयोग आहे. पण शेवटीं जसा तुझा प्रत्यय असेल तसेंच तूं कर. माझा स्नेह निरपेक्ष तर आहेच पण म्हणून तो एकतर्फीहि राहूं शकेल.

तुला उद्देशून एक पत्र सांगितलें तें अपुरेंच राहिले. त्याचा कांहीं भाग आणखी लिहून या सोबत पाठवीत आहे.

२५-११-५०

वरखेडला जाणारें कोणी भेटेल म्हणून परवां भाई सान्यांकडे जाऊन आलों. कोणी भेटलें नाहीं. भाई भेटले. काल लक्ष्मीनारायण येऊन गेला. ता. १ किंवा २ पासून वर्ध्याला येतों म्हणून त्याला सांगितलें. तूं येणार आहेस असेंहि सुचवून ठेवलें. अर्थात हें तुझ्या योजनेंत बसत असलें तरच.

आज जुन्नरला जात आहे. तेथून बीड. बीडचा पत्ता रतनलाल कोटेचा, चिटणीस, जिल्हा कॉंग्रेस कमिटी, बीड (हैदराबाद दक्षिण) बीडला ता. ३० पर्यंत आहे.

अन्न, धान्य व पाणी या तिन्ही प्रश्नांनीं चित्त प्रक्षुब्ध झालेलें आहे. राजकीय परिस्थितीवर निश्चित उपाययोजना व धोरण मला सुचलें. पण त्या विचारांचें लोण माझ्याबरोबर पोंचविणारें समनिष्ठावान माणूस नको का ? माझी ' आत्मजा ' च ती भूमिका पार पाडूं शकेल. ही आशा चुकीची कोण म्हणेल ?

' भारती ' करितां जवाहरलालवर एक ' गहिरा ' लेख लिहिला आहे. ' फक्कड साधला ' असेंच सर्वांना वाटतें. तुला बघतां आला नाहीं.

पत्रें उत्तराकरितां जमल्यास ठेवून जाईन. कार्ड, पाकिटें परत कशाला केलीस तीं ?

दहा रुपये उगीचच ठेवून जात आहे. अर्थातच रक्कम फारच लहान आहे. पण माझ्या बेताची आहे. चि. प्रभाताई, रत्नाबाई, वेणू, आनंदराव यांस आशिर्वाद.

कळावें हे आ.

साहित्यसदन, अबोहर तुझा
ता. २०-११-५० दादा

---

## तो माणूस नव्हता, तो देव होता : ११

बेटा,

एक सहप्रवासी गुरुजींबद्दल बोलूं लागले. माझ्या तोंडून सहज उद्‌गार निघाले, " गुरुजींचें हृदय फारच थोर होतें. ते स्वतःच्या दुःखानें दुःखी कधींच झाले नाहींत. दुसऱ्यांच्या वेदना त्यांना असह्य झाल्या. त्या वेदनांमुळें जीवनदेखील भाररूप. तो गृहस्थ म्हणाला " मग तो माणूस नव्हता, तो देव होता " मला येशूविषयीं वाक्य आठवलें. ' इतरांना त्यानें वाचविलें. स्वतःला मात्र तो वांचवूं शकला नाहीं. इतरांना वाचविण्याच्या प्रयत्नांत स्वतःचें जीवित वेचलें. मी ही स्नेहदृष्टीचीच प्रतिक्रिया मानतों.

माझ्याजवळ जशी ही भव्य भावना विभूति नाहीं तशीच आध्यात्मिक शक्ति किंवा लौकिक पराक्रमाचें वैभवहि नाहीं. मी सर्वसामान्य, कुटुंबवत्सल, लेंकुरवाळा संसारकरू माणूस. कुटुंबांत स्नेहामुळेंच गोडवा व समाधान नांदतें. या अनुभवामुळें मी स्नेह जोडण्याच्या व राखण्याच्या ब्रीदाचा अंगीकार केला. धाकट्या व लहान माणसांच्या स्नेहाचें देखील जगाचीं मातापितरें 'पार्वती परमेश्वर' यांचा प्रसाद म्हणूनच मी मोठ्या नम्रतेनें व कृतज्ञतेनें ग्रहण करतों. त्यामुळेंच माझ्या मनाला एक विशिष्ट वळण लागलें.

बुद्धियुक्त प्रयत्नामुळें व अभ्यासामुळें मला लोकांना दिपविण्यापेक्षां किंवा न्यायनिष्ठुरतेनें त्यांचें कौतूक संपादन करण्यापेक्षां त्यांचा स्नेह अधिक मोलाचा वाटूं लागला. म्हणून माझ्या मनावर होणाऱ्या प्रतिक्रियांचें स्वरूप निराळें असतें. पण त्याचमुळें प्रचंड विभूतिमत्व ज्यांनीं पाहिलें आहे त्या तुम्हांला मी अगदीं खुजा व क्षुद्र वाटलों तर नवल नाहीं.

त्याचमुळें मी शैरीरप्रवृत्तीचाहि बाऊ करीत नाहीं. चारित्र्य व चित्त मलिन असतांनाहि त्यांचें शुद्धिकरण करीत करीत सेवाकार्य करीत जातों. त्याचप्रमाणें शारीरिक अस्वास्थ्यहि सहन करीत करीत काम करीत जातों. त्यायोगें शारीरिकता थोडी कमी होते. त्याच्याकडे सारखें लक्ष लागत नाहीं. शरीरांत यत्किंचितहि बिघाड किंवा विकार न खपणें हें शुद्धतेच्या व आरोग्याच्या आग्रहाचें लक्षण आहे. मनांतहि लेशमात्र मलीनता न खपणें हें मानसिक शुद्धीचें लक्षण आहे, पण मनःशुद्धीचा व शरीरशुद्धीचा इतका आग्रह माझ्यासारख्या अल्पशक्तीच्या माणसाला परवडत नाहीं. म्हणून शारीरिक व्याधीकडे सतत लक्ष न देतां काम करीत रहातों. आजारहि मला निर्ढावलेला व कोडगा समजून बेताचाच त्रास देतो. मानसिक दोषांचेंहि स्नेहानें निवारण करण्याचा प्रयत्न करतों. अर्थात माझें हें सारें शास्त्र माझ्या बेताचें आहे. चित्त व शरीर कार्यक्षम राहिलें म्हणजे समाधान मानतों. तीं अधिक कार्यक्षम व्हावीत असा प्रयत्न करीत रहातों.

‘ दादा हें असें तुमच्यासारखें रोगट शरीर घेऊन मला नाहीं जगणें आवडत ’ तूं म्हणत असत्येस. शारीरिक व मानसिक आरोग्याचेंच वळण ज्यांना लागलेलें आहे त्यांची वृत्ति अशीच हवी. मी तिची कदर करतों. पण रोगट शरीर व रोगट मन याचा त्याग करायचेंच मी ठरविलें तर मला जगण्याची सोयच रहाणार नाहीं. म्हणून तुझें म्हणणें मी तुझ्याकरितां खरें मानतों.

आज अगदीं ३–३० पर्यंत तुझी चवकशी केली. सकाळीं वऱ्हाड-पाड्यांजवळ तुझ्याकरितां पत्र दिलें त्याच वेळीं त्यांना तुझा शोध करून मला कळविण्याविषयीं सांगून ठेवलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं मला फोन केला. तूं आली असतीस तर तुला भेटून नंतर स्टेशनवर आलों असतों.

काल रात्रीं गम्मतच झाली. मी ना. दुर्गाशंकर मेहतांकडे गेलों असतां डॉ. खानखोजे घरीं आले, ते माझा तपास करण्याकरितां अमर मुद्रणालयांत गेले.

बडनेऱ्याला लीला येईल असें वाटत होतें. तिनें तसें मला कळविलें होतें. पण ती आली नाहीं. अकोल्याला अकर्ते भेटूं इच्छीत होते. त्यांचीं दोन तळमळीचीं पत्रें आलींत. पण माझी गाडी चालू झाल्यावर आम्ही एकमेकांना दिसलों!

२६–११

पुण्याची गाडी : सकाळीं ८ ला कल्याणला पोंचलों. ८–२० ला पुण्याकडे निघालों. कर्जतला वडेवाल्याच्या दुकानावर 'झुंबड' सुरू झाली. दोन तीन इसमांनीं सगळे वडे विकत घेवून टाकले. वडेवाल्याला पसे मिळाले पण खाणारांना जिन्नस माल मिळूं शकला नाहीं. अशावेळीं 'वांटपा'ची फारच गरज वाटते.

कर्जत ते लोणावळें–खंडाळ्यांतून नवीन रस्ता होत आहे. गाडी हळूं हळूं चालली. जुना रस्ता व नवीन रस्ता यांची मौज पहातां आली. खंडाळ्याची जी मौज ऑगस्टमध्यें होती, ती अर्थातच यावेळीं नव्हती. निवडणूक संपल्यानंतरच्या राजकारणी लोकांच्या उत्साहाप्रमाणें पावसाळा धबधबे पार अदृश्य झाले होते. आवेश, उत्साह व अवसान यांना ओहोटी लागते. पण स्नेहाला ओहोटी नाहीं लागत. तो ओसरत नाहीं. जीवनांतील तें स्थिर तत्त्व आहे.

पुणें : दुपारीं १२ : येथें नुकताच पोंचलों. तुझा आवडता भाऊ श्रीपाद व भाचा चि. भाई हे स्टेशनवर आले होते. श्रीपादच्या घरूनच हें लिहीत आहे. चि. भाईला एक चिमुकली बहीण आहे. तिचें नांव ममता. गोड नांव आहे नाहीं!

आणखी एक तासानें जुन्नरच्या वाटेला लागेन. उद्यां नगरमार्गें बीड करतां रवाना.

श्रीपादनें पहिला प्रश्न तुझ्या विषयीं केला. माझें कायम ठशाचें उत्तर तयारच असतें. सोनु, तूं आतां लवकर तयार हो कशी. वैद्यनाथबाबू प्रमाणेंच बिहारच्या इतर मंडळीचे तगादे सारखे सुरू आहेत.

गंपूकाकांची माया येथेंच आहे. पण ती भेटूं शकली नाहीं. बाहेर कोठेंतरी गेली होती.

श्रीपाद मजेंत आहे. त्याचा भाई ज्याला त्याला जेवायला बोलावतो. कोणी जेवायला आलें कीं नाचायला लागतो. भटुर्गीच कीं नाहीं शेवटीं! श्रीपादकडे अनेक तरूण साहित्यिक भेटले. चि. प्रभा, रत्ना आणि आनंदराव व मनोहर यांस आ.

अनगूळच्या बाबतींत लोकांचा आग्रह चालूं आहे. एक महिना वाट पाहून काय तें ठरविन. तूं, मालकीण, भय्याकाका सर्वांचाच विचार करूं.

कळावें हे आ.

नागपूर मेल तुझा
२५–११–५० दादा

ता. क.– श्रीपादला बघतांच पुन्हा दिल्ली आठवली. पोरी, दिल्ली हें आपलें 'वात्सल्यतीर्थ' आहे. श्रीपाद माझ्याजवळ होताच. तूं येऊन मिळालीस. श्रीपाद म्हणाला होता 'दादा ही कन्या तुम्हाला देण्यांत ईश्वरी संकेत दिसतो. तुमच्या कमाईत व पुण्याईत नवीन भर पडणार असल्याचें हें चिन्ह आहे. श्रीपाद माझा पुत्र. त्याचें हें 'स्वस्तिवाचन' आहे. मी श्रद्धापूर्वक त्याची अंमलबजावणी केली. भगवंताचा संकेत खोटा कसा ठरेल!

दादा

# अनुभवांचें व अवलोकनाचें निवेदन : १२

मायबाइ,

पुण्याहून तुला पत्र पाठविलें. त्याला जुन्नरहून पुस्ती जोडली. ता. २६ ला दुपारीं नानासाहेब गुप्ते, दंडवते व श्रीपाद यांच्याबरोबर नानासा. च्या गाडीनें २ ला पुण्याहून निघून सुमारें ४ ला जुन्नरला पोचलों. सायंकाळीं ५-४० ते ७ महाराष्ट्र युवक कॉंग्रेसच्या प्रांतिक शिबिराचें उद्‌घाटन केलें. भाषण अफाट, शास्त्रीय व किंचित पारिभाषिक पद्धतीचें झालें. जुन्नर येथलि सारींच बौद्धिकें शास्त्रीय स्वरूपाचीं आणि किंचित आध्यात्मिक परिभाषेनें परिपूर्ण अशीं झालीं. कुठल्यावेळीं कशी भाषा व पद्धति उतरेल तें माझ्याहि हातचें नसतें. उद्‌घाटनानंतर श्रीपाद पुण्याला नानासाहेबांबरोबरच परत गेला.

ता. २६ ला जरा दगदगलों व कंटाळलों होतों. पण त्यांनीं जाहीर सभा ठरविली होती. रात्रीं १२ वा. तशी सूचना करण्यांत आली होती. पण अखेरपर्यंत बोलावणें कांहीं आलें नाहीं. त्यांनीं मला त्रास न देण्याचें ठरवलें. पण मला तसें कळविण्याची मात्र काळजी एकानेंहि घेतली नाहीं. झोपहि झाली नाहीं आणि कामहि केल्याचें समाधान पदरांत पडलें नाहीं. जुन्नरच्या अेका बाजूला शिवनेरी किल्ला डोंगरावर आहे आणि दुसऱ्या बाजूला लेण्याद्रि आहे. या लेण्याद्रिमध्यें लेणीं आहेत आणि गणपतीचें कोरीव देऊळ आहे. सुमारें तीनशें पायऱ्या आहेत.

आम्हीं सर्वांनीं शिवनेरीवर जाऊन येण्याचें ठरविलें. ता. २७ ला सकाळीं ९ ते दुपारीं २ पर्यंतचा वेळ त्यांत घालविला, नव्हे, सत्कारणी लावला. शिवनेरीवर सृष्टिसौंदर्याचा अभाव अगदीं लक्षांत येण्याइतका आहे. कांहीं करवंदीच्या जाळ्या, एकटें दुकटें निवडुंगाचें झुडप आणि मोटेच्या आकारासारखीं पिवळीं फुलें खेरीज करून वनश्रीचें नांवहि नाहीं. डोंगराच्या कुशींत लेणीवजा खोल्या आहेत. पहिल्या माथ्याची चढण चढल्यानंतर दुसऱ्या माथ्यावर शिवाईचें देऊळ आहे. त्यांतील जुन्या

मूर्तीसारखीच नवीन मूर्ति हुबेहूब करवून घेतली आहे. वर पाण्याचीं टाकीं मुबलक आहेत. महाराष्ट्रांत डोंगरांवर भरपूर पाणी मिळतें. त्यामुळें खूप गवत आहे. वर डोंगराच्या टोंकावर कृष्णाकांठचीं मिरज, सांगलीकडील खिल्लारीं गुरें दिसलीं. गवत कापायला आणि भारे करायला ठाकर लोकहि आलेले होते.

या शिवनेरीवर महाराष्ट्राचा उदयसूर्य उदयाला आला. श्रीशिवरायांच्या जन्माची जागा जशी पूर्वीं होती तशीच पुन्हां बांधून घेतली आहे. त्या ठिकाणीं बसून मी १०-२० ते ११-२० एक बौद्धिक घेतलें. नंतर मंडळींनीं एका मशिदीसमोर मुरमुरे वाटाणे खाल्ले. गंगा-यमुना नांवाचीं दोन टाकीं फारच चांगलीं आहेत. चांगलीं लांबरुंद व खोल आहेत. कपारींत असून कोरलेलीं आहेत. पाणी स्वच्छ व मधुर. ठाकर लोक तेथें नाचणीच्या व नागलीच्या भाकरी आणि वांग्याची भाजी करीत होते. त्यांच्या भाकरीची चव पाहिली. नंतर वर गेलों. तेथें दर्गे व इदगाह आहे. एक डोंगर खालीं उतरून एका वडाखालीं १२-२५ ते १-५० दुसरें बौद्धिक घेतलें. २-२० ला खालीं आलों, जेवलों, पत्रें लिहिलीं. ४-४० ते ५-५० पुन्हां बौद्धिक. सारीं बौद्धिकें घेतांना पारिभाषिक भाषेंत शास्त्रीय पद्धतीनें प" सुबोध व सुस्पष्ट विवेचन केलें. युवकांच्या स्वतंत्र संस्थेची स्वतंत्र गरज नाहीं हेंहि अर्थात सांगितलेंच. सायंकाळीं ६-४० तें ७-५० जाहीर भाषण केलें. आणि रात्रीं ८–३५ ला ठेल्यानें निघून रात्रीं १-३० ला नगरला आलों. समोरच्या सीटवर होतों म्हणून अगदीं हवाबंद कमरा होता. पण अवघडून बसावें लागलें. अंग बरेंच अवघडलें. ताबडतोब बीडला येतां यावें म्हणून फिरोदिया व काका गरुडांकडे बीडच्या माणसाचा तपास केला. तो सांपडला नाहीं. तेव्हां नाइलाजास्तव काका गरुडांकडे हाडें टाकलीं. रात्रीचे २-१५ वाजले होते.

जुन्नरपासून तीन मैलांवर शिरवळी गांवीं राष्ट्रसेवादलाचीं मुलें रस्ता तयार करण्याचें उपयुक्त विधायक कार्य करीत आहेत. तेथें जाऊन येण्याबद्दल भाऊ रानड्यांची चिठी आली होती. माझी फार इच्छा होती. आणि श्रीपादांचाहि आग्रह होता. पण सवड झाली नाहीं. खेद वाटला.

नगरचे काका गरूड हे नगरचे एक प्रमुख पुढारीच नसून माझा भाचा प्रा. मनु जकाते याचे चुलत सासरेहि आहेत. रावसा. अच्युतराव यांच्यापैकीं नगरला कोणीच नव्हतें. ता. २८ ला सकाळीं स्वामी सहजानंदाची भेट झाली. त्यांनीं नगरला परत येतांना व्याख्यान देण्याचा मनस्वी आग्रह केला.

बीडहून आण्णासा. तेलप आले होते, त्यांनीं एक स्टेशन वॅगन केली. नगर जिल्हा-कॉंग्रेसची ही गाडी लॉरी व टूररचें "कांप्रोमाईझ" आहे. २८ ला सकाळीं ९ ला निघालों. फ्रीप्रेसमध्यें नागपूरच्या धान्य परिस्थिती बद्दल प्रक्षोभकारक मजकूर वाचला. चित्तानें ठाव सोडला. जिवाची लाही झाली. मनु, त्या तळतळाटाचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं. तूं मला ओळखत्येस, वाटलें तडक नागपूरला परत यावें.

रस्त्यात सुमारें अर्ध्यावर सांकत सातौडा नांवाचा गांव लागला. हैदराबादच्या Police Action ला येथूनच आरंभ झाला होता. येथून सुमारें एक मैलावर एक दरी आहे. तेथें एक अक्षय पण उंचावरून पडणारा धबधबा आहे. खालीं एक स्वच्छ पाण्याचा खोल खळगा आहे. कांहीं अंतरावर एक लहानसा धबधबा व खळगा आणखी आहे. जवळच देऊळ आहे. अशा ठिकाणीं शिवाचें देऊळ कसें नसेल? पण त्यांत राम, गणपति व शनीहि आहेत. म्हणून या गांवाला रामेश्वर सातौडाहि म्हणतात. तेलप व मी ११-५० ला खालीं उतरायला लागलों आणि सारें बघून १२-१२ ला वर आलों. कांहीं पायऱ्या फारच ऊंच व अवघड आहेत. सातौड्याला एक पोरगा पिकलेला आंबा खातांना दिसला. या वेळीं आंबे आहेत म्हणे!

काल दुपारीं दडिला बीडला आलों. अंघोळ वगैरे आटोपून ३-४० ते ५-५० उद्घाटनाचें भाषण केलें. बहारीचें साधलें, भरीव, भरदार व रसाळ! सायंकाळीं ६-४० ते ७-५० जाहीर भाषण केलें. ता. २७ ला दुपारीं जेवलों होतों. त्यानंतर काल रात्रीं ९ ला जेवलों. ९-३० ला रात्रीं प्रार्थना होती. १० ला बौद्धिक ठरलें होतें पण लोक दमले होते म्हणून तें रद्द करण्यांत आलें.

हें शिबीर क्लबाच्या आधुनिक पद्धतीच्या सुंदर इमारतींत व तिच्या प्रशस्त पटांगणांत आहे. मला एक नवीन तंबू रहायला दिला आहे. मी एकटाच आहे. मंडळी बेताची, त्यांची पातळीहि बेताची. सध्या'काँग्रेसच्या संयोजनांना फारसें प्रतिमोदन नाहीं !

आज सकाळीं ९-१५ ते ११-१५ जें बौद्धिक घेतलें तें विचार, विवेचन व मांडणी सर्वच दृष्टीनें अद्‌भुत, रम्य व उदात्त असेंच झालें. जितकें सोपें तितकेंच भव्य, जितकें मनोरंजक तितकेंच खोल, जितकें नवीन तितकेंच स्फूर्तिदायक ! मी स्वतःच दिपून गेलों ! श्रोते म्हणाले, "कोणी लिहून किंवा सांठवून घेणारें नसल्यामुळें अमूल्य शब्द हवेंत विरून जातात." मी म्हणालों, " माझी लाडकी लेक आहे. ती असती तर तिनें सारें टिपून व सांठवून घेतलें असतें, पण मी करंटा ! म्हणून ती आजारी आहे ! "

मनु, तूं नाचली असतीस ! माझ्या कुशींत शिरली असतीस ! तो आनंद माझ्या नशीबीं नाहीं ! हीं बौद्धिकें तुला ऐकायला हवींत. तुझ्या मेंदूत व हृदयांत रुजून तीं फांकतील, फुलतील, फळतील !

हें प्रवासवर्णन नव्हे. माझ्या अनुभवाचें व अवलोकनांचें निवेदन आहे हें. तूं फक्त माझी मुलगी नाहींस, माझ्या वात्सल्याला समानधर्माचा आधार आहे. तूं माझा " समानधर्म " सोबती होण्याचा संकल्प केलेला आहेस ना ? म्हणून तुला हें निवेदन करीत असतों. पोरी, हीं बौद्धिकें म्हणजे माझ्या विचारशक्तीचे अचाट चमत्कार तर आहेतच पण त्यांत माझी उदात्त निष्ठा व सचोटीहि व्यक्त होते! मी जें बोलतों त्याची प्रचीति मला येत असते.

३०-११

काल दुपारीं ३ ते ५ पुन्हां बौद्धिक. सकाळच्या बौद्धिकापेक्षांहि सरस, विचारप्रवर्तक, रसपूर्ण आणि नाविन्ययुक्त. भाषा खुशखुशीत व ठसठशीत. मांडणी ओजस्वी व विनोदयुक्त. सायंकाळीं ७-३० ते ८-३० ज़ाहीर भाषण. रात्रीं ९ ते ११ पुन्हां चर्चा. इतका वेळ बोलत राहिलों तरी श्रोते कंटाळले नाहींत. मीच घड्याळाकडे पाहून त्यांची कींव केली.

आज सकाळीं ९ ते ११-३० पुन्हां बौद्धिक घेतलें. बीडच्या मुक्कामांत बौद्धिकें एकापेक्षां एक सरस व्हावींत असा योगायोग होता. दुपारचें जेवण बीडचे एक अत्यंत निरलस, निराभिमानी व कळकळीचें कार्यकर्ते रामलिंग स्वामी यांच्याकडे घेतलें. दुपारीं २-१० ते ३-४० शेवटलें बौद्धिक घेतलें. पैठण, नांदेड व अष्टी येथील फार अगत्याचीं निमंत्रणें आलीं, त्यांना नागपूरला लिहिण्याविषयीं सांगितलें. रतनलाल कोटेच्यांनीं पत्रव्यवहाराकरितां त्यांना तुझा पत्ता दिला.

१-१२ नागपूर एक्सप्रेस

काल सायंकाळीं ४ ला जीपनें बीडहून निघून सुमारें ८० मैलांचा प्रवास करून औरंगाबादला आलों. गुलाबचंदजी नागोरी यांच्याकडे चहा घेऊन ९-३० ला गाडीनें निघालों. १५-३५ ला मनमाड. मनमाडहून पहांटे ४-३५ ला निघालों.

" आपण या भागांत ठिकाठिकाणीं गेलें पाहिजे तरच कार्यकर्त्यांच्या मनांतील गोंधळ कमी होतील. " येथील सुबुद्ध, तरूण कार्यकर्ते म्हणाले. बिकानेर पंजाबांतील कार्यकर्ते म्हणाले, " आपको तो जिल्हेजिल्हेमें घुमना चाहिये " तें सारें खरें. पण अन्नप्रश्नाची भीषणता मला अगदीं गांगरून सोडीत आहे ! अशा वेळीं ईश्वरावांचून दुसरा आधार नाहीं. माझ्या ईश्वरनिष्ठेला बळकटी आणणें, मनु, हें तुझेंच काम नाहीं का ?

आजारांत जेव्हां तुला निराशा वाटूं लागली तेव्हां तूं अगदीं तळतळून म्हणत होतीस, " दादा तुमचे विचार आत्मसात करून ते सर्वत्र पसरविण्याचें माझें स्वप्न विरत आहे ! " पण आतां तूं निश्चित बरी होणार असें तुलाच वाटत आहे. मग आतां नवीन उमेद वाटूं लागली कि नाहीं ? " आतां किंवा केव्हांच नाहीं " अशी वेळ आली आहे आज. ती. स्व. मामांची चिमुकली बाबी, मंडाल्याच्या सुरेंद्रलाल ह्यांची इवलीशी गोड मुलगी, अशा निरागस, चुणचुणीत व तरतरीत मुली पाहिल्या म्हणजे मला हटकून तुझी आठवण येते. कारण तुझ्या ठिकाणीं जी बालवृत्ति आहे तीच माझ्या चित्ताची खरी पकड घेते. या बालवृत्तीबरोबरच तुझ्या बुद्धींत स्थैर्य

आणि निश्चितता यावी एवढीच इच्छा आहे. तुटलेल्या बावडीप्रमाणें तिच्या भराऱ्या राहूं नयेत. आज तुझी भेट होईल अशी आशा आहे. उद्यां वर्ध्याला जाण्याचा विचार. नागपूरची परिस्थिति पाहिल्यानंतर पुढला बेत ठरवीन.

या आठ दहा दिवसांत तूं स्वतःच्या प्रकृतीबद्दल कांहींच लिहिलें नाहींस ? मला काळजी वाटूं नये का ? पत्र नाहीं, तार नाहीं, गुणाची आहेस का तूं बोल ?

कळावें हे आशीर्वाद

बीड (हैदराबाद)
२९-११-५०

तुझा
दादा

---

# आतां त्यांच्या तोंडून देव वदवितो : १३

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद. परवा सकाळीं मनमाडहून तुला एक पत्र धाडलें तें पोचलेंच असेल. तापानें एव्हांना तुझा पिच्छा सोडला असेल अशी आशा आहे. निरनिराळ्या दुखण्यानीं तुझें शरीर म्हणजे आपलें हक्काचें 'सर्किट हाऊस'च बनविण्याचा घाट घातलेला दिसतो. मी माझ्या मुलीच्या बाबतींत त्यांचे हे मनसुबे खास पार पडूं देणार नाहीं. तूं पडलीस स्नेहशील, आतिथ्यशील मुलगी ! त्यामुळें एकदां तुझा संपर्क आला कीं त्याचें पर्यवसान स्थिर स्नेहसंबंधांत होतें. पण आजारांच्या बाबतींत तूं हें आतिथ्य सोडलें पाहिजेस.

परवां संध्याकाळीं घोडनदीला पोंचलों. लक्ष्मीनारायण सारखा तुझ्याविषयीं बोलत होता. म्हणाला, आम्ही तिच्या रहाण्याची तिच्या मनासारखी व 'इतमामा'सारखी सोय करूं शकत नाहीं हें आम्हांला शोभत नाहीं त्याच्या म्हणण्याचें मी अनुमोदन केलें. घोडनदीला दामोदर, मीरा यांची भेट झाली. कुणाची चौकशी केली त्यांनीं ?

परवा रात्रीं घोडनदीला एक जाहीर भाषण झालें. रटाळ ! यथातथाच. रात्रीं ११–४५ पर्यंत सभा चालली. श्री. दादासा. पंडित ( अकोला ) यांचे कनिष्ठ बंधु सदाशिवराव होते.

काल दुपारीं श्रीपाद आला. दामोदरनें तार केली होती. भेटल्याबरोबर आधीं तुझी चवकशी केली ! श्रीपादांचा आणि माझा संवाद ऐकून आणि श्रीपादांची तुझ्या विषयींची आत्मीयता पाहून प्रो. बंग विचारूं लागले ' दादा हें इतकें वैभवशाली पितृहृदय तुम्ही केव्हांपासून विकसित केलेंत ? ' मी म्हटलें ती माझ्या मुलीमुलांनीं दिलेली देणगी आहे. खरे ना हें !

सायंकाळीं गोरज मुहूर्तावर केशर व सुखदेव यांचें लग्न झालें. मी आशीर्वादाचें भाषण केलें. रामटेकच्या भाषणापेक्षां अधिक वक्तृत्वपूर्ण, रोचक व परिणामकारक झालें. भाषा व मांडणी चांगली साधली. विशेषकरून आबालवृद्ध स्त्रियांना फार आवडलें. पुरुषांनींहि फार स्तुती केली.

काल रात्रीं ११–४५ ला श्रीपाद, प्रा. बंग, बाबाजी मोघे व रतनलाल यांच्याबरोबर मोटारनें निघून १ ला पुण्याला आलों. माझा मुक्काम अर्थातच तुझ्या भाऊरायाकडे आहे. तुझ्या वैनी–माणिक, भाई आणि ५ महिन्यांची चिमुकली ' ममता ' सर्वच मंडळी मजेंत आहेत. ' ममतेला ' भाई ' ताई 'च म्हणतो.

भाऊ महाजनांना भेटून आलों. बारा वाजले होते. त्यामुळें घरीं चलण्याच्या त्यांच्या आग्रहाला मान देतां आला नाहीं. त्यांनीं तुझा पत्ता लिहून घेतला. माझ्या स्नेह्यांपैकीं अण्णा सहस्रबुद्धे, वैद्य बोरकर, कवि बोरकर, प्रा. दत्रडधाव, धनंजयराज गाडगीळ, कोणालाच भेटूं शकलों नाहीं. नाहीं म्हणायला इंटर नॅशनल बुक सर्व्हिसमध्यें जाऊन आलों. पण कांहीं ' फुटकळ ' पुस्तकांखेरीज कांहीं मिळालें नाहीं.

श्री. नानासा. गुप्त्यांनीं ३० जानेवारीला न आल्याबद्दल माझ तक्रार केली. वास्तविक ३० तारीख पुण्यासाठींच राखून ठेवली होती. पण निव्वळ समजुतीच्या घोटाळ्यामुळें तो कार्यक्रम पार पडूं शकला नाहीं.

कालच्या भाषणाची जेव्हां लोक वाखाणणी करूं लागले, तेव्हां दामोदर म्हणाला ‘ दादा नाहीं बोलत, आतां त्यांच्या तोंडून देव वदवितो ’ फार मोठी गोष्ट बोलला तो. या देशाच्या मातीची आकांक्षा जर माझ्या शब्दांत व्यक्त झाली तर खरोखर मी धन्य होईन. दामोदरचे उद्‌गार आशीर्वादात्मक ठरोत! मातींत दडलेल्या आकांक्षेशीं समरस होण्याचें सामर्थ्य ज्या दिवशीं बुद्धींत येईल तो भाग्याचा दिवस.

आगगाडी : २–४५ ला पुण्याहून निघालों. ५–१५ च्या सुमारास कल्याणला आलों. ६–२० ला नागपूर मेलनें रवाना झालों. नाशिकच कडेपुरकर भेटले. हल्लीं श्री. भय्याजी कार्यद्यांबरोबर भोसला लष्करी शाळेंत राहतात. भय्याजींची परिस्थिति व मनस्थिति अस्थिर असल्याचें सांगतात. मला नाशिकला उतरण्याचा आग्रह करीत आहेत. पण भय्याजींनीं बोलाविल्या वाचून कसें जायचें!

तूं मोझरीला केव्हां जाणार आहेस? तुला व्यायला केव्हां पाठवूं! पुढल्या प्रवासांत तुला यावयाचें आहे ना? नाशिक, पुणें, कोल्हापूर, कोंकण महाबळेश्वर, हैदराबाद सगळ्याच ठिकाणचीं आमंत्रणें आहेत. लोकांनीं कृपेची वृष्टी केली तरी आपण आपल्या मगदुराप्रमाणेंच घेऊं शकतों. प्रभाताई गेली? आणि वेणु कशी आहे? रामची प्रकृती ठीक आहे ना?

मी उद्यां सकाळीं नागपूरला पोचेन. श्री. लक्ष्मीनारायण दादा व त्यांच्या पत्नी यांस सा. न. इतरांस आ.

कळावें हे आ.

६०५ नारायण, पुणें २ — तुझा

ता. २२–२–१९५१ — दादा

# बुद्धि द्यावी आणि बुद्धि घ्यावी : १४

चि. विमलला अनेक आशीर्वाद,

परवां नागपूर सोडण्यापूर्वी तुला एक पत्र पाठविलें तें पोंचलेंच असेल. काल सुमारें ११–३० ला चलथान स्टेशनवर उतरलों. माझ्याकरितां आलेल्या खास मोटारनें सुमारें १२ ला दुपारीं येथें आलों.

प्रवासांत त्रास मुळींच झाला नाहीं. इंटरमध्यें जागा भरपूर मिळाली. भुसावळपासून तर जवळ जवळ एकटाच होतों. इतकी मुबलक जागा होती. नंदुरबारला दिवस निघाला. तरी सुमारें ९ पर्यंत डब्यांत गर्दी झाली नाहीं नंदुरबारपासूनच जंगल व डोंगर सुरू झाले. जिकडे पहावें तिकडे तुळया, वासे आणि ठोकळे यांचे ढीग रचलेले दिसत होते. कुऱ्हाडीनें नुसता उच्छाद मांडला होता. परशुरामानें आपल्या परशूनें पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा घाट घातला. आज तोच परशु पृथ्वी निष्पादप करण्याचा घाट घालीत आहे. पळसाच्या फुलांनीं या रुक्ष प्रदेशालाहि लाली आणली होती. त्यामुळ प्रवास कंटाळवाणा कांहीं झाला नाहीं.

कठोर हा गांव तापीतीरीं आहे. पांच सहा हजारांचाच गांव. आहे. पण संपन्न आहे. तापीच्या पैलतीरावरील खोलवड हा गांव तर दोन अडीच हजार वस्तीचाच आहे. पण तो बोहरी व्यापारांचा गांव आहे. त्यामुळें मोठा टुमदार व सुबक आहे. जणूं कांहीं मुंबईचाच एक तुकडा तापीतीरीं आणून ठेवून दिला कुणी! सुरत, नवसारी, बारडोली या तालुक्यांतील पुष्कळच लाक 'वणजे' करितां आफ्रिकेंत गेलेले आहेत. त्यांची हीं 'विलायत' आहे. म्हणून येथील घरें उबदार व झोंकदार आहेत. पत्रे व सीमेंट यांचा सढळ हातानें उपयोग बांधकामांत झालेला आहे. त्यामुळें गांवांना एक प्रकारची 'रौनक' (शोभा) आलेली दिसते.

मी मूळ तापीचा. तापीच्या माहेरचें मायेचें माणूस मी. म्हणूल काल संध्याकाळीं तापविरच फिरायला गेलों आणि आज अंघोळहि करून आलों.

तापी व नर्मदा यांच्यावर माझी मोठी ममता आहे. त्यामुळें मला सहजच गंगा–यमुनांची आठवण होते. तापी कांहींशीं यमुनेच्या वळणावर आहे. तिची वाळू व माती यमुनेच्या लाडक्या कृष्णाच्या वर्णाची आहे. पण यमुनेची वाळू काळी असून गुळगुळीत व बारीक आहे. तशी तापीची नाहीं. ती खरखरीत व जाडीभरडी आहे. नर्मदेची गंगेच्या वाळूसारखी करड्या रंगाची आहे. तापी यमुने इतकीच असुन्दर आहे. नर्मदा त्या मानानें मोठी देखणी आहे. अगदीं पांगारकरी भाषेत सांगावयाचें झालें तर नर्मदा मोरोपंताच्या कवितेसारखी आहे तर तापी वामन पंडितांच्या कवितेसारखी आहे.

पण रूपानें साधीसुधी असली तरी तापी जीवनरसानें मात्र संपन्न आहे, तिच्या खोऱ्यांतील जोंधळा, वांगी व इतर जिन्नस मोठे चवदार असतात. तापीतीरीचें दुधदुभतें तर नामांकितच आहे, आणि सुरती कापूस सर्वत्र वाखाणला जातो. जीवनाला गोडी देण्याची शक्ति तिच्या पाण्यांत आहे.

परदेशांत व्यापार करणारांचें हें 'वतन' पाहून तामिळनाडांतील चेट्टिनाडाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

काल दुपारीं २–३० ते ४ एक बौद्धिक घेतलें. रात्रीं पुन्हां ८–३० ते ९–३० बौद्धिक झालें. चांगला रंग भरला. बारीक बारीक पिंजत गेलों. पण त्यांत सुलभताहि खूप आणली. आज पहांटे ५–३० ते ६ कताई मंडळांत भाषण केलें. ८ ते १० पुन्हां बौद्धिक, दुपारीं २ ते ३–३० बौद्धिक. ४–३० ला येथून नऊ मैलांवरील उमेळ नांवाच्या मध्यवर्ती गांवीं जाहीर भाषण आहे. वास्तविक मी आज सायंकाळीं जाणार होतों. पण कांहीं मंडळींनीं गळ घातल्यामुळें या जाहीर भाषणाकरितां थांबलों. सकाळचें बौद्धिक बहारीचें झालें. उद्यां सकाळीं येथून निघेन, दुपारीं १२ ला दोंडाइची स्टेशनवर उतरून ५० मैल मोटारनें नेरला जाईन. तेथें भाषण करून पुन्हां ५० मैल मोटारनें चाळीसगांवला जाईन. पहांटेच्या गाडीनें निघून ता. ४ ला

दुपारीं हरदा. ता. ५ ला सायंकाळीं नागपूर. तेथें ता. ७ पर्यंत तुझी वाट पाहीन.

दि. ३–३–५१

काल दुपारीं २ ते ३–५० पुन्हां बौद्धिक घेतलें. सांप्रदायवाद, जातिवाद व प्रांतवाद यांची सोपपत्तिक मीमांसा केली. नंतर कठोरपासून ९ मैलांवर असलेल्या उमेळ गांवीं जाहीर सभेला गेलों. मोहनलाल गौतम मुख्य पाहुणे होते. माझें भाषण ४–४५ ते ५–२० पर्यंत झालें.

कठोरला रात्रीं परत आलों. नवसारी, कराडी व अहमदाबाद येथें जीं सर्वोदय केंद्रें चालत आहेत तेथील जबाबदार कार्यकर्त्यांनीं तेथें चलण्याची गळ घातली. एप्रिलमध्यें येईन म्हणून कबूल केलें. अर्थात त्यांत तुझा समावेश केलाच आहे. इकडे नैष्टिक कार्यकर्ते विषेश आहेत.

खोलवड व कठोर हीं गांवें बघून गौतमजींना नवल वाटलें. इतकीं डौलदार खेडीं, ते म्हणाले, मीं कांहीं पाहिलीं नाहींत. कठोरच्या तापीतिरिच्या मातींत जादू आहे. समुद्राच्या पाण्याच्या प्रतिक्रियेमुळें तिच्यांत विशिष्ट रासायनिक गुण येतो. म्हणून येथील पाण्यामुळें पूर्वी येथें काळा व लाल रंग अप्रतिम होत असे. वांगीं तर फारच रुचकर लोण्यासारखी मऊ! आपल्याकडे तळेगांव जवळील वर्धा किनारीं वसलेल्या चिसतूरचीं वांगीं प्रसिद्ध आहेत. नर्मदा किनारीं ब्रम्हाणीचीं वांगीं प्रसिद्ध आहेत. कृष्णा किनारीं कऱ्हाडचीं आणि दक्षिणेकडे उडपी नजीकचीं जोंधळा व वांगीं त्या त्या भागांतील कांहीं खास ठिकाणांचीं प्रसिद्ध आहेत.

या भागांत पातीदार लोकांची संख्या विशेष आहे. स्त्रियांचा पेहराव विशिष्ट प्रकारचा आहे साडीला कासोटा असतो आणि ती बहुधा गुढग्यापर्यंतच असते. कामकरी पोषाक आहे हा.

आज पहांटे ६ ला कठोर येथील हरिजन छात्रालयाला भेट देऊन आलों. नंतर १० मैल मोटारनें चलथाणा स्टेशनवर आलों आणि आतां दोंडाइचें स्टेशनच्या वाटेवर आहे. बारडोलीच्या मंडळींनीं मनस्वी आग्रह

केला. पण आज महाराष्ट्र यूथ काँग्रेसच्या शिबिराकरितां नेरला जायचें कबूल केलें आहे. म्हणून पुढें निघालों आहे.

दि. ४–३–५१

काल शेवटीं दोंडायचें पर्यंत कांहीं गेलों नाहीं. यूथ काँग्रेसचे राउळ हे नंदुरबारलाच आले. तेथेंच उतरलों. दुपारीं १–३० वा. डॉ भटांकडे चहा घेऊन निघालों. ता २–३० झाले. मोटारनें ४–३० ला नेरला पोंचलों. सबंध ४३ मैलांचा रस्ता नुसता डोंगरांचा होता. पण वनश्रीचें नांव नाहीं. रुक्ष, रखरखीत दगड आणि खडक ! पण डोंगर कसे असले तरी 'साजरे'च दिसतात.

४–३० ला पोचल्यावर अंघाळ केली. जेवण बाद केलें. शाळेची कवायत पाहिली. नंतर ६ ते ७–१५ बौद्धिक. पोरी बौद्धिक मात्र अपूर्व आणि अप्रतिम झालें. नवीनच विचार, नवीनच मांडणी, नवीन स्फूर्ति, भाषेची करामतहि नवीन. आपटे गुरुजी कितीतरी वर्षांनीं योगायोगानेंच भेटले. ते आणि त्यांच्या पत्नी राधाबाई यांच्याकडे मी येवल्याला वर्षांतून तीन दिवस अगदीं माहेरचें सुख अनुभवित असें. बौद्धिक ऐकून गुरुजींचा रोमरोम नाचूं लागला. म्हणाले हें खाद्य पुण्याला कोणी कांहो देत नाहीं ! हें कोठेंच मिळत नाहीं. एक एक वाक्य मोलाचें आहे.

बौद्धिकानंतर सार्वजनिक भाषण झालें. रात्रींचे ९ वाजले. पुन्हां मोटारनें १८ मैलांचा प्रवास करून धुळ्याला आलों. तडक सभेंत ! एक तास भाषण जोरदार झालें !

घोडनदीला दामोदर म्हणाला होता, 'दादा आतां तुमच्या तोंडून देव बोलतो असा भास होतो !' माझे मुली, भगवंताचा संकेत व या भूमीची आकांक्षा खरोखरच माझ्या हृदयांत आर्विर्भूत होऊन माझ्या तोंडून प्रकट होईल का? निदान तिच्याशीं समरस होण्याचा प्रयत्न मीं कां करूं नये? विचार पाहिजे. विचारासारखें पवित्र कांहीं नाहीं. विचारा सारखें सामर्थ्य कशांत नाहीं. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मिह विद्यते!'

'बुद्धिर्यस्य बलंतस्य' माझी परंश्रद्धा बुद्धीवरच आहे. म्हणून बुध्दि द्यावी आणि बुध्दि घ्यावी हें मीं ठरविलें आहे.

धुळ्याची सभा सुमारें ११-१५ ला रात्रीं संपली. नंतर पळशीकरांकडे गेलों. तेथें आमची इंदू (चुलत बहीण) व तिचे यजमान यांस भेटलों. आणि पुन्हां ३५ मैल मोटारचा प्रवास करून चाळीसगांव स्टेशन गांठलें. वेटिंग-रूममध्यें झोंपलों.

मित्रांनीं व लोकांनीं कृपेचा इतका भडिमार केला कीं एकाद्या प्रचण्ड धबधब्याच्या धारेंत सांपडल्याप्रमाणें गुदमरण्याची पाळी होती. पण मी स्नेहजीवी असल्यामुळें टिकलों. अन्नाची भूक देखील कांहीं वेळपर्यंत स्नेहानें भागते हा अनुभव आला.

चाळीगांवाहून रात्रीं २-३० ला कलकत्ता मेल होती. पण मग झोंपण्याचाच इरादा केला. सकाळीं ५-५७ ला अमृतसर एक्सप्रेसनें निघालों आणि आतां हरद्याच्या वाटेवर आहे. आज रात्रीं किंवा उद्यां सकाळीं हरद्याहून निघून उद्यां सायंकाळपर्यंत नागपूर. तेथें तुझी वाट.

काय असेल त असो, या पाळीला नागपूरहून निघतांना घर सोडणें जड वाटलें. लल्ला, बाळू, चंदू, मालकीण या सर्वांचीच आठवण येत होती. तुमची वेडी आइ ही इतकी ऐश्वर्यशालिनी स्त्री आहे कीं ती मला माझी सोबतीण अजूनहि वाटते. बेटा, माझ्या स्नेहवृत्तीची गंगोत्री माझ कुटुंबच आहे. म्हणून कुटुंबवत्सलता व समाजप्रेम यांत माझ्या मनांत विरोध कधींच उत्पन्न होऊं शकला नाहीं. आणि त्याचमुळें माझे सहयोगी माझे कुटुंबीय बनले.

हें लिहीत असतांनाच हरदा आलें. तुझें ता. २८ चें पत्र नागपूरहून येथें पाठविण्यांत आल तें मीं वाचल. किती गोड गोड पत्र लिहित्येस तूं. हृदय नाचूं लागलें. माझ्या ठिकाणीं तुला जी शक्ति आढळली ती मला तुम्ही माझ्या अपत्यांनीं दिलेली आहे. बेटा, तुम्हीं मला काय दिलेंत याचें तुम्हांला भान देखील नाहीं.

हरद्याला मालती परुळकर म्हणून एक मुलगी भेटली. स्वतंत्र बाण्याची बी. ए. च्या वर्गांत असलेली, अजून विशींच्या आंतली आणि कामवासनेचा स्पर्श न झालेली अठरा वर्षांची आहे. आकांक्षा उच्च, भावना उदात्त, वृत्ति बाणेदार, पण विचार अपरिपक्व. तूं माझीं जीं पत्रें 'साधने'मध्यें दिलींस त्यांचा तिच्या मनावर फार परिणाम झाला आहे. तुझ्याविषयीं कुतूहल व कौतुक आहे तिला. विचारींत होती.

सकाळीं चंपाभाईच्या कन्यापाठशाळेंत जाऊन आलों. पांचसात मिनिटें भाषण केलें. कुमुदताई लोकरे मुख्य अध्यापक आहेत. त्यांचे यजमान माझे स्नेही आहेत. कुमुदताईचाहि परिचय जुनाच आहे. पण काल दुपारचा व रात्रीं ११–३० पर्यंतचा सारा वेळ निरनिराळ्या लोकांशीं चर्चेंत गेला. त्यामुळें लोकऱ्यांशीं बोलायला वेळच मिळाला नव्हता.

सकाळीं ८–५२ च्या गाडीनें निघून इटारसीला आलों. आतां ग्रँड ट्रंकमध्यें आहे. जमलें तर बैतुलला थांबेन. नाहींतर सरळ नागपूर.

मने (१३२) ता. २८ च्या पत्रानें मात्र विलक्षण आनंद व नवीन उत्साह दिला मला. तुझें व दामोदरचें पत्र एकाच वेळीं आलें हा नुसता योगायोगच असला तरी केवढी गोडी होती त्या योगायोगांतहि ! तुमच्या पत्रांमुळें त्या योगायोगालाहि मधुपर्काची गोडी आली. दामोदरच्या निर्व्याज स्नेहांत तुझ्या वैराग्य समृद्ध स्नेहाची भर पडल्यामुळें माझें सामर्थ्य वाढलें. मालती परुळकर या अपरिचित मुलीलाहि माझ्याविषयीं आत्मीयता वाटली. तिच्या वृत्तीला व जीवनाला पावित्र्ययुक्त गोडी यावी असा पित्याच्या वत्सलतेनें मी आशीर्वाद देऊं शकलों.

ऊफाडे गुरुजींनींहि तीं 'साधनें'तील पत्रें वाचलीं. त्यांना फार आवडलीं. बेटा, निरपेक्ष व निर्मळ स्नेहाची ही दौलत मला अशीच लाभत जाईल ना ?

सुमारें १–३० ला दुपारीं बैतुलला बल्लाकाकांच्या आग्रहामुळें उतरलों. पू. आईनें जेवूं घातलें. ती. स्व. बाबासा० व माई यांस भेटलों. बाररूममध्यें लोकांशीं व अधिकाऱ्यांशीं अनौपचारिक चर्चा केली आणि

३–३० च्या बसनें निघून मूलतापीला आलों. येथेंहि आल्यापासून चर्चाच चर्चा. चर्चेत खालील गोष्टींचा प्रत्यय आला.

( १ ) बुद्धिवाद्यांचा विश्वास बुद्धीपेक्षां शक्तीवर अधिक आहे. ते शक्तिपूजक आहेत. जेथें जेथें सत्ता, साधनसंपन्नता किंवा अनुयायांचें वैभव असेल तिकडे लोक वळतात. त्यांचा विश्वास शक्तीवर बसतो. क्रांतीच्या जुनाट चाकोरींतून ते बाहेर पडूं शकत नाहींत.

( २ ) नेत्यानें शक्ति वापरावी पण अक्कल मात्र या अनुयायांपासून घ्यावी असें त्यांस वाटतें.

( ३ ) आतां दिव्य दृष्टि व कर्तृत्व यांचा संगम जेथें असेल त्याचेंच नेतृत्व यशस्वी होईल, निव्वळ कर्तृत्व उपयोगाचें नाहीं. याची जाणीव बुध्दिवाद्यांनाहि नाहीं. कारण त्यांचा बुध्दिवादच मुळीं दुबळा आहे.

( ४ ) ज्यांच्यापाशीं केवळ कर्तृत्व आहे ते लोकक्षोभ किंवा प्रतिकाराची चळवळ उभारूं शकतील अथवा सत्ता काबीज करूं शकतील. पण राजकीय उपायांनीं आतां समस्या सुटणें अशक्य आहे.

मूळतापीला आल्याबरोबर चिखलीला प. पू. भाऊसा० च्या भेटीला जाऊन आलों. रात्रीं ११–३० च्या गाडीनें पुढें नागपुरला जाईन.

पहाटे ३ ला उठून पवनारला गेलों. पहांटेच्या प्रार्थनेनंतर पू. विनोबा पहांटे ४–१५ ला हैदराबाद येथें होणाऱ्या सर्वोदय संमेलनाकरितां पायीं प्रवासाला निघणार होते. प्रार्थनेनंतर त्या महापुरुषाबरोबर पायीं वर्ध्याला आलों. यात्रेचें सारेंच पुण्य मी त्यांना बरा लाभूं देईन. त्यांना निरोप देण्याचा समारंभ श्रीलक्ष्मीनारायण मंदिरांत झाला. विनोबांचें थोडेंसें भाषण झालें. विनोबांबरोबर दामोदर, मदालसा, दत्तोबा, महादेवीताई इ० सात माणसें आहेत. दामोदर सद्गदित होऊन म्हणाला या तुकडींत माझी ताई असती तर? मला काय वाटलें असेल बरें !

दि. १०–३–५१

मोझरीहून काल आलेल्या गृहस्थांनीं तुझी चिठ्ठी आज सकाळीं दिली. विठ्ठलरावांपाशीं तुझ्याकरितां एक चिठ्ठी परवां दिलीच होती.

तुझ्या इच्छेप्रमाणें आज हें पत्रच पाठवून देतों. सवडीप्रमाणें वाच. सोनू, माझ्या जिवाची होरपळ देवावांचून कोण जाणूं शकेल? पण तुला वर्धा, हैदराबाद, कोल्हापूर इ० सर्व ठिकाणीं नेईन एवढें मात्र खरें. थारेपालट व खाटल्यांची पालटच कां होईना? माझ्या कोशांत 'पराजय' हा शब्द नाहीं. मनू, तुझ्या निष्ठेची जोड तुझ्या पामर पित्याच्या मनोरथांना मिळेलना? होय ना? 'सोनू' 'मनू' हे शब्द मीं फक्त लल्लाला व तुलाच लावतों. लल्ला नुसताच निष्पाप. निष्पापतेला सत्यसंकल्पाची जोड तूं दे बेटा. जमल्यास आज, उद्यां, परवां केव्हां तरी येऊन जाईन. कामेंच कामें आहेत.

सर्वोदयाचा माणूस आला आहे. शिक्षक समिती आहे. पार्टी, मीटिंग आहे. होय आहे. नाहीं आहे!

कठोर जि. सुरत — तुझा
दि. २–३–१९५१ — दादा

---

# तुझें भाकित खरें ठरलें : १५

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद,

काल स्टेशनावरून परतल्यावर भाषण केलें, तुझ्या अपेक्षेप्रमाणेंच झालें विचार, भाषा, मांडणी सारें कांहीं साधलें. रात्रीं त्याच घरांत आणि त्याच ठिकाणीं झोपलों. अधिक न लिहिण्यांतच सारें आलें.

हरिशनें बेगमपेठपर्यंत मुद्दाम विश्वनाथरावांना जागा धरून ठेवायला पाठविलें होतें. पण तूं दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत जाण्याचें नाकारिलेंस म्हणून त्यांनीं सांगितलें. सुखापेक्षां सोबतीचें महत्त्व अधिक वाटलें. कित्येकदां माणूस रामाकरितां आरामाचा त्याग करतें तें असें 'काळजी करूं नका' हा तुझा निरोप पोंचला. त्या निरोपांतच माझें उत्तरहि अन्तर्भूत आहे.

सकाळीं हरिश व देशमुख यांच्याबरोबर शिवरामपल्लीला पू. विनोबांकडे जाऊन आलों. दामाजीहि भेटला. विनोबांच्या तुकडींत सामील

होण्याचा मनोदय निवेदन केला. दोघांनीं बरोबर राहण्यापेक्षां तुम्हीं हिंडतां तसेंच हिंडत रहाण्यांत अधिक लाभ आहे. विनोबा, दामाजी व हरिश यांनीं निर्णय दिला. तुझें दुसरें भाकितहि खरें ठरलें ! विनोबा आज तुरुंगांत कम्युनिस्टांना भेटतील. ते पायीं हिंडणार, मी विमानापर्यंन्त सर्व प्रकारच्या वाहनांतून. विनोबा म्हणाले, दोन टोकें फार जवळ असतात तसें आपलें आहे ! तुझें भाकित खरें ठरलें याचा आनंद आहेच. पण त्या निमित्तानें विनोबांचें दर्शन झालें.

अनूला काल आपण बरोबर नेली नाहीं म्हणून तिनें ठपका दिला. पण आपल्याला कल्पना तरी होती का ? तो ठपका तिच्या स्नेहाचाच निदर्शक आहे.

सकाळीं १० ला विमानांत बसलों. अस्मानाचा आजचा थाट वेगळाच आहे. अस्मानाच्या रागरंगाचा परिणाम जमिनीवर होतोच. आज पांढरे व करडे ढग टोळकीं करून सहल करायला निघालेले आहेत. त्यांच्या सांवल्या जमिनीवर निळ्या काळ्या शाईनें काढलेल्या असंशोधित देशांच्या व बेटांच्या नकाशासारख्या दिसतात. पण त्यामुळें जमिनीला टीपकागदाचें स्वरूप आलें आहे. जमिनीला असमानाचें दिव्यत्व यावें असें मला वाटतें पण जमिनीवर असमानाची छाया पडावी किंवा तिला असमानाच्या ब्लॉटिंग पेपरची भूमिका प्राप्त व्हावी असें कोणाला वाटेल ? म्हणून विमानाला ढगांचा फडशा पाडतांना पाहून माझ्या पृथ्विनिष्ठ मनाला फार समाधान वाटतें.

दृश्य तेंच आहे. तीच गोदामाई, तेंच हिंगणघाट, सारें तेंच तें. पण या 'तेच-ते-पणांत'हि शिळेपणा नाहीं. ढग तुडवितांना विमान बोगद्यांतून जाणाऱ्या आगगाडीसारखें मुसंडी मारीत जातें, झोंपाळ्यासारखे झोंकेहि बसतात. मौज आहे, झालें.

सुमारें ११-४० ला नागपुरला पोंचेन. तुझ्या खुशालीच्या तारेची वाट पाहीन, मीं शिबिरांत जावें असें विनोबांना वाटतें. बहुतेक पाचोऱ्याला रात्रीच्या एक्स्प्रेसनें जाईन.

आज विमानाच्या गतींत संथपणा नाहीं. मधूनमधून अगदीं होडी-सारखें हेलकावे खातें ! उगीचच !

नागपूर एक्स्प्रेस,

रात्रीं ८-३० : १२ ला नागपुरला पोंचलों. चि. लल्ला शहरांत आजोळीं आहे. तेथें गेलों. गुप्त-गांवडे यांस भेटलों. सोनारांकडे जाऊन आलों. इतर कामें केलीं. दिवस निघून गेला. आपला लल्ला रोड झाला आहे ?

डॉ. खऱ्यांशीं बोललों. त्यांचें म्हणणें औषधाची अशी प्रतिक्रिया सुरुवातीला होतेच. आणखी एक आठवडा औषध घ्यावें असें त्यांचें मत. ते म्हणतात हटकून गुण येईल. उजव्या पायाविषयींहि त्यांना विशेष काळजी वाटत नाहीं. त्यालाहि गुण येईल असें त्यांस वाटतें.

मी ता. १९ ला मेलनें किंवा एक्स्प्रेसनें नक्की येतों. तिकिटें काढून ठेवायला हरकत नाहीं. ज्ञानकुमारीप्रमाणेंच तात्याजी वझलवारहि तुझ्या भजनाची वाखाणणी करीत होते. कोल्हापूर, बिहार, वर्धा, गुलबर्गा, बेंगलूर, लातूर असा कार्यक्रम येत्या दोन महिन्याचा ठरला आहे. तो सम्मतिकरितां तुझ्याकडे पाठविण्याची गरज नाहीं. कारण तुझ्याच समोर व सम्मतीनें ठरलेला आहे.

पाचोरें : दि. १४-४-५१

पहांटे ५-१५ ला येथें आलों. येथून पिंपळगांवला आतां सकाळीं जात आहे. काल सबंध दिवस नागपुरला तुझ्या तारेची उत्कंठेनें वाट पाहिली. पण व्यर्थ हें असें कां झालें ?

उद्यां सकाळीं मेलनें नागपुरला पोंचेन. तेथून पुन्हां तुला लिहिनच. तुझ्या पत्राची वाट मात्र आहे. ता. १९ ला भेट होईल.

कळावें हे आ.

विमान, नागपुरच्या वाटेवर — तुझा

दि. १३-४-५१ — दादा

## जय–प्रभा ! : १६

चि. विमलला अनेक उत्तम आ.

तुमचा निरोप घेऊन निघालों. निद्रादेवीनें कृपा केली. सारी तळमळ तिनें आपल्या पोटांत घातली. अगदीं मोटारींत बसतांना देखलि तुला सामान घ्यायला सांगितलें नाहीं. हा माझा सामान्य मनोनिग्रह नव्हे ! या विहारचें नशीबच खडतर ! तूं तेथें जावें हें त्या करंट्यांच्या नशिबीं नाहीं.

गाडी दीड तास उशीर करून आली. मोरे, जामोदे, स्टेशनवर वाट बघत होते. मार्गे तुझी त्यांची चुकामूक झाली. तसें होऊं नये म्हणून या पाळीला प्लॅटफार्मवरच जेठा मारून बसले होते. त्यांची व त्यांच्या घरच्या मंडळींची तूं न आल्यामुळें खूपच निराशा झाली ! अगदीं मुलांची देखील. पण सौजन्य सोडणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं माझें स्वागत केलें. बिहारला तूं येत नाहींस याबद्दल मात्र त्यांना आनंद वाटला. कारण, त्यामुळें तुझें महाबळेश्वरचें निश्चित झालें. तूं पुण्याला येऊन त्यांच्या बरोबरच येथून जाणें सोयीचें होईल असें त्यांचें म्हणणें. तूं ता. ५ च्या ऐवजीं ४ लाच यावेंस असा त्यांच्या मुलीचा आग्रह आहे.

श्री. नानासा० गुप्ते स्टेशनवर आले होते. परवां व काल म्हणे माझे कार्यक्रम येथें जाहीरहि झाले होते. आपल्याला त्याची गंधवार्ताहि नाहीं. आज मात्र कार्यक्रम ठेवतां आला नाहीं. नानासा० गुप्ते, भाऊ महाजन, बोरकर वैद्य, अनुताई ( लिकमभाई ) व माणिक यांच्याकडे जाऊन आलों. भाईनें धांवत येऊन घट्ट मिठी मारली. त्याच्या ओठांना शाळेंत लोखंडी सळ्या लागल्यामुळें ओठ शिंप्यासारखे सुजले आहेत. तरी तो अनुताईकडे माझ्याबरोबर आलाच होता. जामोदे सर्वत्र बरोबर होता.

या पाळीला भालजीबाबांना जवळून पहाण्याची संधि मिळाली. संकटांमुळें ज्यांच्या वृत्तीची रग कमी न होतां, ' ज्वाला तरी ती वरती उफाळे ' असा पुरुष पाहिला ! खुल्या दिलाचा, निधड्या छातीचा, शाबूत दानतीचा, उदार बुद्धीचा, पराक्रमी व निग्रही पुरुष ! त्यांचा स्टूडियो

एकाद्या आश्रमापेक्षांहि स्वच्छ व शुद्ध वाटतो. इतकी स्वच्छता, शिष्टता व शिस्त क्वचितच आढळून येते. त्यांच्या कौटुंबिक व व्यावसायिक जीवनावर त्यांच्या निष्ठेची व वृत्तीची छाप स्पष्ट दिसते. माई, सरलाताई व बकुळाताई या 'सहपत्नी' नसून सख्या आहेत. त्यांच्यांत बहिणींचा जिव्हाळाच नव्हे तर मैत्रिणींचा लळा आहे. वातावरण एकंदरींत गुण्यागोविंदाचेंच नव्हे तर खेळीमेळीचें आहे. मुलांमध्येंहि विलक्षण एकोपा व आत्मीयता दिसली. संकटांचे प्रत्यक्ष डोंगर कोसळले तरी या माणसांची वृत्ति पिचली नाहीं. त्यांची निष्ठा चिरडली गेली नाहीं. विनोदांत कटुता नाहीं, वैताग नाहीं, औदार्याला व दिलदारीला सीमा नाहीं, सर्वत्र त्यांच्या पुरुषार्थसंपन्न व्यक्तित्वाचा ठसा उमटलेला आढळतो. आपण लीहंटबरोबर गाऊं या 'May their tribe increase.'

घरांतील वातावरणहि गोड वाटलें. माई व सरलाताई यांची पैज आणि नंतर दहा रुपये कोणी द्यावे याबद्दलचा दोघींमधला मधुर वाद हीं दृश्यें माझ्या चित्तावर कोरलीं गेलीं आहेत. 'जय-प्रभा' या सामासिक जोड नांवांत तेथील जीवनाचें मर्म सांठवलेलें आहे. सदा कसा आहे ! 'जो सर्वांत जास्त गरजवंत तो सर्वांत मोठा अधिकारी' हा तेथील वातावरणांतील अलिखित नियम दिसतो. माणसाला व्यवसायाकरितां वृत्तीची पायमल्ली करतांना आपण पहातों. या माणसानें व्यवसायांतहि वृत्ति शाबूत ठेवली आहे. हा कांहीं थोडा पराक्रम नव्हे ! भक्कम निष्ठेच्या खडकावर व्यक्तित्वाची उभारणी झाली तरच माणूस अशा रीतीनें टिकतो.

तूं नाना व श्रीपाद यांच्याबरोबर अप्पांकडे जरूर जाऊन ये. माईनाहि नेतां आलें तर अवश्य ने. अप्पांना भेटून त्यांना फार बरें वाटेल. निपाणीला तूं जाऊन आलीस म्हणजे माझ्या जाण्याची गरज उरणार नाहीं. प्रकृति संभाळून काम कर. इतकेंच.

या पाळीला प्रभाकर, जयसिंग, सदा, सरोज, सुलोचना सर्वांचीच विशेष ओळख झाली. आपल्या स्नेहसंपत्तींत चांगलीच भर पडली.

आतां तीन वाजतां स्टेशनवर जाईन. चि. मधुकर कांहीं आले नाहींत. त्यांना सवड झाली नसेल. आजपासून प्रवासाला सुरुवात झाली.

तुझ्यावांचून हा प्रवास करावा लागणार. यापेक्षां अधिक काय लिहूं? कशाला लिहूं?

चि. सदा, जयसिंग, प्रभाकर, सुलोचना, सरोज, बाळासा०, सुरेश व श्रीपाद यांस आ. सौ. माई, सरलाबाई व बकुळाताई यांस प्रेमपूर्वक न.

कळावें हे आ.,

खडकी पुणें — तुझा

२७–४–५१ — दादा

ता. क. कोल्हापूर, पुणें व महाबळेश्वर या भागाच्या बाहेर जाऊं नकोस. मी तुला स्वतां घेऊन जाईन किंवा पत्र पाठवीन त्याप्रमाणें ये.

दादा.

---

## केवढा भयंकर अपघात टळला ? : १७

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद,

तुला लिहिलेलीं पत्रें म्हणजे डायरीवजाच असतात. त्यांत माझ्या वेळाचा ढोबळमानानें हिशेब सादर केलेला असतो. म्हणून मघां पाठविलेल्या पत्रानंतरची दिनचर्या लिहित आहें.

भागलपुरला गाडी सुमारें ९ ला पोंचली. मध्यें जमालपुरला खोळंबा झाला. एंजिन पाण्याकरितां व कोळश्याकरितां खेपा घालीत असतांना एक म्हातारी चिरडली गेली. तिच्या शरीराची अगदीं दुर्दशा झाली. जमालपुरला कैरवबाबू म्हणून या भागांतील एम. एल. ए. आमचे सहप्रवासी झाले.

भागलपुरला वैद्यनाथबाबू सकाळीं येऊन माझी प्रतीक्षा करीत होते. आगगाडींत प्रातर्विधि आटपण्याची सोय समाधानकारक नव्हती. म्हणून प्रातर्विधि येथें आटोपला. नंतर चहा आणि न्याहारी. सुपारी ही माझी खूणच झाली होती. कांहीं जणांनीं, त्यांत मदन आलाच, सुपारीची चव–

कशी मोठ्या आस्थेनें केली. म्हणाले, ' मोठी रुचकर रहात असे तुमची सुपारी ! ' मदन व पंत म्हणाले, ' सुपारीनें जीभ चरचरली नांहीं तर ती आतां चुरचुरणार कशी ? तुमची आई सुपारीला माझी ' सहचारिणी ' म्हणत असे तें उगीच नव्हे. ती म्हणे, ' धर्मशास्त्रांत बायकोच्या अभावीं कडोसीला सुपारी लावण्याची आज्ञा आहे. तुम्ही मांझ्या जिवंतपणींच तिला अखंड जवळ बाळगतां ? सभेंत बसलों कीं लोक हात पुढें करीत. अर्थात मी तिचा त्याग किंवा अव्हेर केलेला नाहीं. वियोगानें आणखी गोडी वाढते म्हणतात ! असो. ही सुपारीची चंपटपंजरी पुरे.

भागलपुराहून दीन दयालला विडी कामगारांबद्दल तार केली. प्रां. काँ. कामिटीला विचारल्यावांचून कांहीं करण्याची दानत नाहीं. कारण, यावेळीं संस्थेची अशा रीतीनें उपेक्षा करणें इष्ट होणार नाहीं. माझें चित्त मोठ विलक्षण आहे. कोणाचेंहि संकट–मग तें स्वार्जित असलें तरी पाहून तटस्थ राहवतच नाहीं. जीव तळमळतो !

भागलपुराहून सुमारें १० ला मोटारनें निघून सुमारें तीस मैल प्रवास केल्यावर ११-१५ ला मंदार विद्यापीठांत आलों. एका प्रचंड पालथ्या नगाऱ्याच्या आकाराचा काळ्या खडकाचा डोंगर आहे. हलवायाच्या बासुंदी घोटण्याच्या पालथ्या कढईसारखा दिसतो. त्याच्या टोंकावर एक जैनमंदिर आहे. पायथ्याशीं हें विद्यापीठ आहे. अद्वैताच्या पायावर तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण देणें हा उद्देश आहे. प्राचीन गुरुकुलाच्या आदर्शांत सहशिक्षणाची भर घातली आहे. आदर्शानुरूप विद्यार्थी मिळाले तर तें बिनसरकारी विद्यापीठ कसलें ? आदर्शांची उच्चता व विद्यार्थ्यांची योग्यता यांचें व्यस्त प्रमाण हटकून असायचेंच.

डोंगर बघितला कीं माझें पाय वळवळलेच । मी म्हटलें ' वर जाऊन येतों ' एक म्हणाला, ' भर मध्यान्हीं ? भाजून निघाल ' दुसरा परिचित कैवार घेऊन म्हणाला, ' भर उन्हांत गंगा–कोसी संगमावर स्नानाला जाणारा, ऐन दुपारीं डोंगर चढणारा हा मरतुकडा माणूस कांहींहि करील' पण मला राबवून घ्यायचेंस टेहून डोंगरावर चढण्याची चैन कोण करूं देणार ?

डोंगर अगदीं निर्वृक्ष आहे. खालींहि झाडें ताडाचीं आहेत. बाकी झाडें-झुडपें जवळ जवळ नसल्यासारखींच ! डोंगरावर सुन्दर पाण्याचें कुंड आहे म्हणे ! पण वर जायला वेळ व परवानगी नसल्यामुळें तें आम्हांला अमृत कुंभाइतकेंच दुर्मिळ. तख्त पोशावर बादल्यांच्या गर्दींत जाहीर स्नान झालें आणि विद्यापीठांत उत्तम भोजन झालें. या पर्वताची अशी आख्यायिका सांगतात कीं, समुद्र मंथनाच्या वेळीं याचीच रवी केली होती पण आकार मात्र रवीसारखा नाहीं. उलट एखाद्या ग्रीक दैत्याच्या शिर-स्त्राणासारखा दिसतो. एखाद्या पाश्चात्य असुरानें आपली हॅट पालथी ठेवल्याचा भास होतो.

२-३० ला पुन्हां मोटारनें निघून सुमारें १५ मैलांवर असलेल्या वांका नांवाच्या गांवीं आलों. हें सबडिव्हिजनचें ठिकाण आहे. ४ ते ४-३० सार्वजनिक भाषण केलें. मंदार विद्यापीठांतील प्रवचन भरीव, उद्बोधक आणि विचारप्रवर्तक झालें. पुष्कळ शिक्षण विषयक नवीन कल्पना व सूचना सांगितल्या. प्राचीन ग्रंथांतून मार्मिक उल्लेख व आख्यायिका सांगितल्या. पण वांका येथील भाषण वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमूना म्हणून मांडतां येईल. मोठेंच ओजस्वी, रोचक आणि विचारयुक्त झालें ! मंदारचें प्रवचन व वांकाचें भाषण ऐकायला मन्या हवा होता ! प्रवचन दुपारीं १-१५ ते २-३० झालें.

पुन्हां ४-४५ ला मोटारनें निघून बाराहाटला जीपमध्यें बसलों. गुड्डा येथें जीप बदलली आणि कच्च्या रस्त्यानें एकंदर ३४ मैलांचा प्रवास करून ७ ला रात्रीं संथाल परगण्यांत वसन्तरायला आलों. संथाल लोकांचीं घरें बाहेरून मोठी कलापूर्ण व ढबदार दिसतात. छपरें मोठीं टापटिपीचीं, भिंती पांढऱ्या व लाल मातीनें जणूं आजच रंगविलेल्या. कपडे स्वच्छ.

वसन्तरायला सभा मैदानांत ठेवली होती. पण सभेच्या वेळींच वादळ व पाऊस सुरू झाला. नऊ महिन्यांनीं पाऊस आला. सभा दुसरीकडे नेली. पण पावसानें मधून मधून अडथळा केलाच ! मोठाच बेरंग झाला. भाषण अगदीं पडलें ! रात्रीं १० ला कार्यक्रम संपला. आज मुक्काम येथेंच आहे. येथील भाषण म्हणजे रटाळ भाषणाचा नमुना म्हणून सांगतां येईल.

गुड्डाः १–५–५१

रात्रीं पावसानंतर हवेंत गारठा आला. आमचें सामान मागील जीपमध्यें येणार होतें. ती येऊं शकली नाहीं. मला थंडी वाजूं लागली. अंथरूण–पांघरूण मिळायला सुमारें १ वाजला. वाटलें पोर आली नाहीं बरें झालें.

सकाळीं ६ ला पुन्हां जीपमध्यें बसलों. इकडील नद्यांच्या उथळपणाला व थिल्लरपणाला सीमा नाहीं. इकडून जातांना जीं वाळूचीं मैदानें होतीं, तींच आतां थेट आधुनिक विद्वानांप्रमाणें पाण्यानें भरून गेलीं होतीं. बसन्तराय आणि गुड्डा या रस्त्यावर चिखल झाला होता आणि आमची जीप अगदीं वर्तमानपत्राच्या बेगुमानपणानें तो आमच्यावर उडवीत होती.

हैदराबाद, जबलपूर, डोंगरगड येथील प्रचण्ड काळ्या गोटयांचे डोंगर तूं पाहिलेले आहेस. त्यांच्यापैकीं कांहीं प्रवास करीत करीत गुड्डा व बसंतराय यांच्यामध्यें राजमहाल पर्वतांत येऊन बसलेले आहेत.

संथालांचीं गांवें, वनश्री, डोंगर वगैरे पाहिले म्हणजे वाटतें विमल असती तर! सारखा जीपचा प्रवास, उन्ह, पाऊस इ. गैरसोयी पाहिल्या म्हणजे वाटतें पोरीचे हाल झाले असते! माझ्या बाबतींत मात्र आदळ-आपटीनें धक्क्या चपेटयांनीं वगैरे सोयींनें मला टवटवी येते असेंच धरून चालण्याचा संकल्प लोकांनीं केलेला आहे. आणि तोच बरोबरहि आहे. वेगानें मेंदूला तरतरी येते आणि धक्क्यांनीं चेव येतो.

गुड्डयाला कार्यक्रम ठेवण्यांत आला नव्हता! पण वसन्तरायच्या लोकांनीं म्हटलें, ' कालचें भाषण आम्ही जमेस धरत नाहीं, आमचा विरस झाला ! म्हणुन गुड्डयाला मुद्दाम सकाळीं भाषण ठेवलें. विद्यार्थी व शिकलेले श्रोते होते. भाषण रंगलें. त्यांत ओज होतें, अप्रतिहत आवेश होता, अकुंठित वेगहि होता. कालचा वचपा निघाला. ८–३० ते ९–२५ भाषण करून निघालों.

निघतांनाच वैद्यनाथबाबू म्हणाले, "एका गाडीवर माझा भरंवसा नाहीं. तिचें केव्हां काय बिघडेल, देव जाणे ! पुण्याला कोल्हापुरच्या गाडी-

करितां जातांना तसा प्रसंग आपल्यावर आलाच होता. पुन्हां परवां कोल्हापुराहून परत आलों तेव्हां गांवांत जातांना मोटारनें संप पुकारला होता. मजुरांनंतर यंत्र व उपकरणें यांचीच संपाची पाळी आहे !

तीस मैल आल्यावर आमच्या गाडीनें पुढें जाण्याचें नाकारिलें ! तीस मैल मात्र खूप वेगांत आली. सृष्टिसौंदर्याचें अवलोकन व चिन्तन वेगांत खूप चांगलें होतें. गुड्डयापासूनच्या रस्त्यावर दोन्हींकडे काळ्या खडकांचे निरनिराळ्या आकारांचे डोंगर उभे आहेत. कांहीं डोंगर बसलेल्या हत्तीच्या आकाराचे आहेत. मागले पाय, मधली पाठ, गंडस्थळ आणि पुढले पाय यांचा आकार दिसतो. कांहीं डोंगर बसलेला नंदी, बसलेला वराह, कासव इ० च्या आकारांचे आहेत. त्यांचें सौंदर्य पहात पहात मजेंत तीस मैल आलों. कांहीं डोंगर मध्यम वर्गीय बुद्धिजीवी व्यक्तीच्या व्यक्तित्वाप्रमाणें ढांसळून बारगळलेलेहि आहेत.

तीस मैलांनंतर एक तास दुसऱ्या जीपच्या प्रतीक्षेत व्यर्थ घालविल्यानंतर एका 'बस' मध्यें बसून पुढें निघालों. माणसाच्या पाठीचा कणा ताठ रहावा अशी काळजी मोठ्या दक्षतेनें माझ्या 'सीट' पुरती घेण्यांत आली होती. माझ्या 'सीट'ला 'तक्क्या' नव्हता. म्हणून अगदीं सामुदायिक प्रार्थनेंत बसल्याप्रमाणें ताठ बसून आलों. ११ ते १-१० बसावें लागलें. आम्हांला १२-३० ची गाडी सहज गांठतां आली असती. पण बसच्या सत्यवादी ड्रायव्हरनें गाडी मिळणें शक्य नाहीं म्हणून आम्हांला बजावलें होतें ! म्हणून त्यानें अगदीं हरिश्चन्द्राच्या ऐटीनें आपलें वचन पाळलें आणि आम्हांला १-१० ला देवघर वैद्यनाथधाम, येथें पोचविलें. आगगाडी निघून गेलेली होती. म्हणून आम्हीं दुसऱ्या जीपच्या शोधांत लागलों दरम्यानचा वेळ श्री वैद्यनाथाच्या दर्शनांत व दही चिवडा आणि सत्तू खाण्यांत घालविला ! उरलेला वेळ पुन्हां झोंपेंत गेला.

मोठ्या मुश्किलीनें सुमारें ४–३० ला जीप मिळाली. ४–४० ला निघालों. मोटार उत्तम होती. पण रस्ता कच्चा व वळणाचा. संथालांचीं गांवें, फणसांचीं झाडें, आणि डोंगर व वाळूच्या शुष्क नद्या यांची शोभा पहात

पहात चार तासांच्या प्रवासानंतर कर्माटांडकला पोंचलों. तेथून सुमारें८-५० ला करी येथें पोंचलों. प्रचण्ड सभा जमली होती, शिबिरांत कार्यकर्ते पुष्कळ होते, लोक निराश होऊन निघून गेलेले होते आणि कार्यकर्तेहि पुष्कळसे निघून गेले होते. एका मित्रांनीं 'शतं विहाय भोक्तव्यं'चा आग्रह केला. जेवण उरकलें. रात्रीं १० ते ११ पर्यंत भाषण केलें. फार छान! ओजस्वी व विचारयुक्त.

आजचा योग विघ्नयोग होता. दिवसभर विघ्नें सामान्य स्वरूपाचीं आलीं. रात्रीं कां व कसे पार पडलों हेंच कळत नाहीं. जीप नवीन व चांगली होती. पण एका उतारावर एक ओढा व पूल होता. पुलावर फळ्या किंवा माती नव्हती. एका कडेला माती होती आणि बाकी सगळें भगदाडच होतें. त्या भगदाडावरून वेगांत आमची गाडी चालली! आम्हांला वाटलें एका क्षणांत आम्हीं परलोकवासी होणार! पण देवाशा नव्हती. म्हणून त्याच क्षणीं अकल्पित चमत्कारानें मोटारी सकट सही सलामत पार पडलों! एका निमिषांत सारें झालें. घाबरायलाहि अवकाश मिळाला नाहीं. एका क्षणांत हंसायलाच लावलें! अपघात झाला नाहीं याबद्दल धन्यता वाटत होती. पण केवढा भयंकर अपघात होतां होतां टळला याचा अभिमानहि वाटत होता. जो झाला नाहीं त्या अपघाताची भीषणता आम्हांला भूषणभूत झालेली होती. आहे कीं नाहीं माणसाच्या मनाची गम्मत ?

भागलपूर : २-५-५१

रात्रीं ११-१५ ला पुन्हां मोटारनें कर्माटांडकला यायला निघालों. रात्रीं १२ ची गाडी गांठली. वैद्यनाथबाबूबरोबर आहेतच. स्वस्थ झोंपलों. पहांटे ४ ला क्यूलाला पुन्हां गाडी बदलली. सकाळीं ८-१५ ला येथें येऊन पोंचलों. दुपारीं ३ ला कार्यकर्त्यांचीं सभा आहे. सायंकाळीं सार्वजानिक भाषण. रात्रीं पुन्हां ९ च्या स्टीमरनें गंगापार जाऊन उत्तर बिहारमध्यें पूर्णिया जिल्ह्यांत जायचें आहे. वैद्यनाथबाबूंची सोबत आहेच. पण रात्रींतून स्टीमर व गाड्या मिळून चार ठिकाणीं बदला-बदल आहे.

आज आल्याबरोबर तुझीं दोन्ही पत्रें मिळालीं. 'त्या सुखा पार नाहीं!' बेटा! त्या आनंदाचें वर्णन कोण करूं शकणार? तूं असतीस तर घट्ट पोटाशीं धरली असती तुला! तुझ्या व्याख्यानांचे व दौऱ्यांचे कार्यक्रम वाचून फार फार बरें वाटलें. प्रकृति व काम हीं दोन्हीं तंत्रें संभाळ! तुझें पाऊल निश्चितपणें पुढेंच पडेल! रत्नागिरीला माझे सहकारी मामा(माधव) सावंत आहेत. कदाचित त्यांची तुझी गांठ पडणार नाहीं. कारण एकमेकांची माहिती नाहीं.

नागपूरच्या पत्राची व तारेची वाट पाहिली. अजून कांहींच आलेलें नाहीं. म्हणून पूर्णिया जिल्ह्याचा दौरा आटपूनच घेतों. ता. ६पर्यंत वर्ध्याला पोंचेन. १५ पर्यंत राहीन. नंतर तुला घेऊन गंपूकाकांकडे व बेंगलूरला जाईन. मला कांहीं तुझ्या भेटीची कमी उत्कंठा नाहीं. माझीं ता. ३० पर्यंतची पत्रें पोंचलीं असतील?

आज बाबांचा वाढदिवस! माझें पत्र पोंचलें? श्रीपाद गेले का!

श्री. बाबांना आदरपूर्वक न. सौ. माई, सरलाबाई व बकुळाताई यांस स. न. चि. सदा, सरोज, प्रभाकर, सुलोचना, बाळासा०, सुरेश या सर्वांस आ. तुझा महाबळेश्वरचा पत्ता मला नागपूरला कळवून ठेव.

कळावें हें आ.

तुझा

दादा

मंदार विद्यापीठ,
भागलपुरपासून ३० मैल
दि. ३०-४-५१

# विनोबांचें जीवनसंगीत : १८

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद,

माझ्या अपेक्षेप्रमाणें आज वर्ध्याला तुझें पत्र आलें. किती किती समाधान वाटलें ! मी आत्तांच एक्सप्रेसनें वर्ध्याहून परत आलों.

काल संध्याकाळीं वेणू मुद्दाम येऊन तुझे कपडे व १०० रु. देऊन गेली. तूं केलेल्या प्रेमसंग्रहांत प्रभाताई व वेणू यांचें स्थान ' अद्वितीय ' आहे. ' अतृतीय ' नव्हे. कारण त्या फक्त आकृतींत दोन आहेत. काल एका परिचित घरांतील बाई आपल्या कौटुंबिक अपेक्षांची कहाणी सांगून गेल्या ! म्हणाल्या, ' संकटाच्या वेळीं परिचय नसतांनाहि तुमचीच आठवण झाली ! स्त्रियांच्या या विश्वासाला मीं पात्र रहावें अशी प्रार्थना, माझे मुली, तूं करशील ना ?

काल रात्रीं वर्ध्याला गेलों. आज पहांटे लॉरीनें व बैलगाडीनें दिघीला गेलों. तेथें एका अटीतटीच्या विवाहाला हजर राहून आशीर्वादाचें भाषण केलें. सुमारें ११-३० ला घोडागाडीनें निघून देवळीला आलों. तेथून १२-३० ला बसनें निघून १ ला वर्ध्याला आलों आणि २ च्या एक्सप्रेसनें निघून येथें आलों.

वर्ध्याला तुझें पत्र मिळालें. शीण हरपला ! मायबाई, कलेंत अद्‌भुत सामर्थ्य आहे. ज्यांच्याजवळ हृदयाची शुद्धता नाहीं, चारित्र्याची शक्ति नाहीं. निष्ठेचें तेज नाहीं, त्या कलावंत आणि ' कलावंतिणी ' देखील कलेमुळें लोकांना जर भारून टाकूं शकतात, तर ज्यांनीं कला हें भगवत्पूजेचें उपकरण मानलें, मानव सेवेचें साधन मानलें, ज्यांच्या कलेला भावनेचा ओलावा, चारित्र्याचें तेज आणि निष्ठेचें अधिष्ठान आहे, त्यांची कला सांस्कृतिक क्रान्तीची अग्रदूती कां होऊं नये ? तुमच्या कलेंत तलवार व लेखणी यांच्यापेक्षां अनंतपटीनें अधिक चमत्काराचें सामर्थ्य आहे ! तिची जोपासना व उपासना मोठ्या दक्षतेनें व पूज्य बुद्धीनें कर. तुझीं भजनें व भाषणें या दृष्टीनें चमत्कार करतील. माझ्याजवळ जिव्हाळा आहे, विचार-

शक्तीहि आहे, पण नैसर्गिक किंवा कमावलेली कला नाहीं. त्यामुळें माझीं भाषणें नेहमीं साधतातच असें नाहीं. माझीं कांहीं भाषणें अगदींच पडतात म्हणून ज्यांच्याजवळ सिद्ध कला आहे त्यांच्यावर माझा मोठा भरंवसा आहे.

काल गंपूकाकांची तार आली आणि आज पत्र आलें. तो चांदूरला लग्नाला येत नाहीं. त्यानें तेथें बोलावलेंच आहे. औसा येथें ता. २९ ला पोंचावयाचें आहे. त्यापूर्वी अडोणीला जाऊन येऊं. ता. २९, ३०, ३१ औसा येथें राहूं. मोझरीचे मास्तरसा० भेटले होते. ता. ३१ पासून तुला कांहीं काम नाहीं असे ते बोलले. तुझा पत्ताहि लिहून घेतला. पुढले कार्यक्रम मला विचारूनच ठरव. कारण जूनमध्यें बेंगलूर–म्हैसूरचा प्रवास करावयाचा आहे.

प्रभाला तुझा लळा लागला यांत कांहीं नवल का आहे? ××××चें हृदय तूं काबीज केल्यावर आतां तुला पृथ्वी–दिग्विजयाचा 'तुरा' मिळायला हरकत नाहीं. तूं शंकररावाच्या भेटीला सासवडला जाऊन यावेंस असें मला वाटतें.

'सर्वोदया' चें काम अजून संपलें नाहीं. ता. २२ पर्यन्त लांबेल, पू. बाबूकाकांनाहि कांहीं प्रश्नाच्या बाबतींत भेटायचें आहे. जेथें निष्ठा व आदर्श यांचें ऐक्य असतें तेथें ज्येष्ठांवर निर्णय सोपविल्यानें विचारशक्तीचा विकासच होतो. निर्णयशक्तीहि अशा रीतीनें विकास पावूं लागते. आपल्या निर्णयाला अनुकूल असाच निर्णय ज्येष्ठ व्यक्तीहि देतात असा पुढें पुढें अनुभव येतो आणि आपला आत्मविश्वास वाढीस लागतो.

ता. १९–५–५१

आवसा (उसमानाबाद) येथील शिबिराच्या बाबतींत दोन पत्रें आलीं. त्यांनीं ता. २९ ला दुपारीं तेथें पोंचावें असें लिहिलें आहे. म्हणजे अडोणीहून ता. २८ ला रात्रीं निघावें लागेल. ता. २२ ते २८ पांच दिवस अडोणीला कां राहावें हा प्रश्न आहे. त्या अवधींत शक्य झाल्यास बेंगलूर किंवा कोडायकॅनालला जाऊन यावें असा विचार मनांत डोकावतो. पाहूं

जसें जमेल तसें करूं. आठ दहा दिवस पुन्हां माझ्या मुलीच्या सहवासांत रहायला मिळेल, एवढें मला पुरे आहे. ज्या आनंदांत निरपेक्ष स्नेहाखेरीज दुसरा कांहींहि प्रेरक हेतु नाहीं तो आनंद जीवनाचें अंतिम मूल्य आहे. 'अन्नं ब्रह्मेति व्यजानात' पासून 'तपोब्रह्मति' आणि 'विज्ञानं ब्रह्मेति' या ब्रम्ह परंपरेंत शेवटला टप्पा 'आनंदब्रम्हेति' आहे! म्हणून इतर तेवढे कार्यक्रम आणि विमलकडे जाणें ही फक्त वैयक्तिक बाब, असा अवास्तव व अप्रशस्त भेद माझ्या मनानें कधीं केला नाहीं. जें करायचें तें मनःपूर्वक करायचें असें वळण लागल्यानंतर त्यांत भावनेचें पावित्र्य व हेतूची शुद्धता कशी बरें असणार नाहीं? त्यामुळें इतर कार्यक्रम जरी रद्द झाले असले तरी तुझ्याबरोबर रहातां यावें म्हणून येण्याचें ठरविलें! तुझ्या करतां नव्हे, माझ्याच करितां. मी कोणाकरितांच कांहीं करीत नसतों हें तुला माहितच आहे!

आज मोठी गम्मत झाली! मेलनें जाणें सोयीचें आहे म्हणून मेलवर गेलों. आधीं इंटरचें तिकीट काढलें. पण इंटरक्लासमध्यें तिळ ठेवायला जागा नाहीं. म्हणून थर्डक्लासचें तिकीट काढून थर्डमध्यें अवघडून बसण्या-पुरती जागा मिळविली. पण तुझा भाऊ बाळू यास तें खपलें नाहीं. तो म्हणाला फर्स्ट क्लासमध्यें जा! शेवटीं रात्रींच्या गाडीनें निघायचें ठरवून घरीं परत आलों.

शनिवार होता. म्हणून सरस्वती सोनार यांच्या बरोबर तेलंगखेडी नजीकच्या टेकडीवरील मारुतीला गेलों. पुंडलीक भाऊंची 'भेटण्याजोगती व्यक्ति' येथेंच कोठेंतरी रहाते. मन्दिर, भोंवतालची डोंगरीबाग, चौथरे, तख्तपोशावरील कॅबिनवजा बैठक, सारें कांहीं उत्तम आहे. नारळहि उत्तम निघाला. तो देवाला पावला नाहीं. एरव्हीं तो कसलेल्या व व्यवहारदक्ष मुत्सद्याच्या बुद्धीसारखा खवट नसता का निघाला? नारळ हा विश्वामित्राच्या सृष्टींतला आहे म्हणतात. पण विश्वामित्रहि तपःसामर्थ्यानें सत्ता मिळविणारांपैकीं होता. म्हणून त्यालादेखील युक्ति-प्रयुक्तीनें व कारस्थानांनीं सत्ता मिळवूं इच्छिणाऱ्या मुत्सद्यांचीं डोकीं नाहीं निर्माण करतां आलीं!

नंतर ताईकडे गेलों. ताई म्हणजे ताराची आई. तारा आतां बाबू लोकांच्या वसाहतींत रहायला गेली आहे. ताईची दाढ दुखत होती. मला पाहिल्याबरोबर मिठी मारली. तिला कुणीसें सांगितलें कीं बावनाव्या वर्षीं जरा जपूनच जगा. म्हणून अगदीं माझ्या पोटाशीं बसून राहिली ! मलाहि बावनवर्षें पुढल्या महिन्यांत पूर्ण होतील. पण बावनाव्या वर्षी आम्हांला आम्हीं सात वर्षांचीं आहोंत असेंच वाटलें ! पोरी, 'ताई' ही एक संस्था आहे. तो एक सांस्कृतिक संकेत आहे, तें एक भावनेचें आधार-भूत प्रतीक आहे. पण त्या संकेताचें, प्रतीकाचें, संस्थेचें आलंबन माझ्या शारदाताईसारख्या बहिणीच नाहींत का ?

निघतांना तुमच्या मातोश्रींनीं विचारलें, 'चाललांत कोठें ?' 'पुण्याला' याल केव्हां ? पंधरा दिवसांनीं !' 'तोपर्यंत माझी व्यवस्था करून जा. या आळींत मला भयंकर त्रास होतो. तुमची मिनिस्ट्री झाल्या-पासून एकहि कायदेशीर गोष्ट होत असेल तर शपथ ! व्याख्यानें कसलीं देतां वायफळ ! इतक्यांत नाटकांतलि प्रवेशाप्रमाणें कप्तान परांजपे आले आणि त्यांनीं तिची री ओढली ! Dada you ought to take it in earnest मी म्हणालों, 'आवारी, तुम्हीं, बाळू सावजी, सारेच Demo-cratic front मध्यें जाणार, तेव्हां तिलाच कां वगळतां ?'

नागपूर एक्सप्रेस २०–५–५१.

दुपारींच सेकंड क्लासमध्यें 'बर्थ'चें रिझर्वेशन केलें. रात्रीं गाडींत येऊन बसलों. गाडीनें शीळ दिली. बाळू, सोनार, यादव यांची पाठ फिरली इतक्यांत एक 'लगीन येऊन थडकलें ! जागा मिळेना. माझ्या डब्यांत वरचे दोन बांक होते. मीं म्हटलें 'या' बरें करतां 'ब्रह्महत्या' माझ्या डब्यांत सामान आणि माणसें यांची इतकी गर्दी झाली कीं मलाच जागा उरली नाहीं. तिकीट कुणाच जवळ नाहीं. कारण धांदल नि गैरशिस्तपणा-वांचून लग्नाला मौज नाहीं. शेवटीं मी सांखळी ओढली ! पण उपयोग काय ? गाडी थांबली ! कांहीं ठळक ठळक माणसें खालीं उतरलीं ! पण नवरी मुलगी, नवरदेव आणि किरकोळ स्वाऱ्या आणि २५।३० सामानाच्या 'डागा' आमच्या डब्यांत राहिल्या. घागरा घुंगुट यांनीं आपल्या कुलीनत्वाचें

साक्ष देणाऱ्या त्या कुलवधूला वर झोंप म्हणण्याची कोणा आर्यांची प्राज्ञा होती ? मीच मुकाट्यानें वर गेलों आणि माझें अंथरुण त्यांच्या हवालीं केलें ! मानवी योजना या अशा कधीं कधीं फिसकटतात ! यांत अपयश आहे, पण पराजय नाहीं ! मानला तर आनंदहि आहे !

घटना दुरुस्तीच्या बिलावर आंबेडकरांचें उत्तराचें भाषण संस्मरणीय झालें ! टाईम्स म्हणतो, " Dr. Ambedker's peroration for its incisiveness and lucidity of exposition concerning difficult and delicate constitutional and legal issues must rank as one of the most outstanding, debating performances witnessed in the Parliament.

जवाहरलालांनीं पू. विनोबांचा मोठ्या मोजक्या पण अर्थपूर्ण शब्दांत गौरव केला. "अशान्तता व अराजकता यांच्या आव्हानाला उत्तर देण्याची नवीन शान्तिमय व अहिंसात्मक प्रक्रिया तेलंगणांत एकाकी संचार करीत असलेली विनोबा भाव्यांची ती हाडकुळी आकृती आम्हांला प्रत्यक्ष दाखवीत आहे. आमच्या डोळ्यांदेखत हें घडत आहे. कुठल्याहि शस्त्र शक्तीनें जो परिणाम घडला नसता तो विलक्षण परिणाम विनोबाच्या शब्दांनीं व वृत्तीनें त्या भागांतील जनतेवर होत आहे!" अशा अर्थाचे त्यांनीं उद्‌गार काढले. नीतीच्या, अध्यात्माच्या किंवा समाज सुधारणेच्या क्षेत्रांत नव्हे तर प्रत्यक्ष राजकीय प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत आपल्या ईश्वरनिष्ठेचा प्रत्यक्ष प्रयोग करणाऱ्या या महाभागाच्या बुद्धींत, भावनेंत व पराक्रमांत जी एकतानता, जें संवादित्व आहे, त्यामुळें त्यांचें व्यक्तित्व एक मधुर संगीत बनलें आहे !

भुसावळ पासून एकटाच होतों. चाळीसगांवला एक सोबती आलें. एरव्ही माझी केव्हां कशी फजिती होईल याचा कांहीं एक नेम नाहीं. ता. ६ ला बिहारांतून परततांना भर दुपारीं गोंदियाला पाणी प्यायला उतरलों नंतर डबाच सांपडेना ! तुमसरलाहि सांपडला नाहीं. अखेरीस गोंदिया तें भंडारा तब्बल दीड तास सव्हेंटांच्या डब्यांत बसून आलों ! म्हणूनच तुझ्या बंधुवर्गाचें निक्षून सांगणें आहे. सोबत्या वाचून प्रवास करूं

नका! पण माझी पांगळ्याची काठी आहे माझी मनी! सोन्यापेक्षां बहुमोल, चंदनापेक्षां सुगंधी आणि हस्तीदंतापेक्षां धवल! तेव्हां प्रवास आणि निवास यांना सहवासावांचून अंगची अशी स्वतंत्र गोडी नाहीं! रामावांचून नुसताच आराम सुखकर होत नाहीं हें म्हणणें मान्य केलें तरी सहवास फक्त 'दुकटेपणा' नव्हे. या वयांत आणि या अवस्थेत अनुकूल वृत्तीचें अपत्यच सहवास सुख देऊं शकतें!

आतां याच डब्यांत बघ कीं सोबतीला कांहीं तोटा नाहीं. पण एकमेकाशीं एक अवाक्षरहि न बोलण्याचा सभ्य लोकांचा रिवाज आम्ही कसोशीनें पाळत आहोंत. त्यांत पुन्हां माझा डबा 'शुभमंगल' डबा आहे. रात्रींहि नूतन विवाहित मारवाडी वधुवरें माझ्या डब्यांत होतीं आणि आतां गुजराती नूतन परिणित जोडपें आहे. रात्रींच्या जोडप्याप्रमाणेंच यांच्याहि हातांना कंकणें आहेत. रात्रींच्या नवऱ्यामुलीनें आपलें तोंड जगाला दाखवा-यचेंच नाहीं असें ठरविलें होतें. या मुलीनें तसा निश्चय केलेला नाहीं. पण बाकावर कितीहि जागा असो, शिस्तीनें एकाच आसनावर अगदीं ताठ बसण्याचा नियम हिनेंहि पाळला आहे. फार तर डुलकी देते. पण नवऱ्या-मध्यें आणि आपल्यामध्यें निदान दोन माणसांचें अंतर रहावें इतकी काळजी घेते आणि एकमेकांना संभाळणाऱ्या योग्यतेचें दोघांपैकीं कोणीच मानीत नाहीं. या मंगलमय मौनांत मीहि सामील आहे.

पुण्याची गाडी (लोणावळें)

कसारा आणि खंडाळा या घाटांची शोभा पाहिली. खंडाळ्यांत जेव्हां गार वारा लागला, तेव्हां वाटलें मुलीला या हवेंतून दुसरीकडे नेणें इष्ट होईल का? बेटा, या पाळीला मी तुझ्याकरितां आलों नसलों, स्वतः-करितांच आलों असलों, तरी मुख्यतः तुझ्यामुळें आलों हें खरें आहे. पण तुला कुठल्याहि ऊष्ण हवेच्या भागांत नेण्याची मनाची तयारी फार कमी आहे. मला माझी इच्छा, माझी सोय किंवा माझा त्रास यांपेक्षां तुझ्या आरोग्याची व आरामाची कदर शतपटीनें ज्यास्त आहे. या थंड हवेंत ठिकठिकाणीं तुझी जी व्यवस्था होऊं शकली, तिच्या मानानें हे दहाबारा

दिवस दगदगीचे व गैरसोयींचेच जाणार! तरी पण तुझ्या बरोबर हे दिवस घालवितां यावेत म्हणून आलों आहे खरा! आणि तुला घेऊनहि जायचें ठरविलें आहे!

चि. प्रभाकर माझ्या करितां थांबला, पण मी उशीरा पोंचत आहे. माझा इलाज नव्हता! त्याचा सहवास लाभेल तेवढा खरा! इकडील हवा अनुभवून लल्लाची आठवण होते. अगदीं कोमेजून गेला आहे तो! 'मन्या सोन्या' हीं संबोधनें आणखी त्यालाच लावत असतों.

चांद्याच्या भाऊ सावलीकरांच्या भावाला त्यांच्या मागून क्षय झाला, आणि मी व्यवस्था करूं शकण्यापूर्वींच तो तरुण निवर्तला! काळीज चर्र झालें! दोघेहि भाऊ तरूण, होतकरू, सालस, सेवाभावी, भाऊंनाहि क्षय आहेच! हें पाहिलें म्हणजे जगणें अपराधासारखें वाटूं लागतें!

बस, आतां पुरे.

कळावें हे आ.

धनतोली तुझा
१८।५।५१ दादा

---

## विनोबांचें राष्ट्रीय ब्रह्मकर्म : १९

चि. विमलला अनेक उत्तम आ.

काल रात्रीं भीकुलालांनीं माझी चिठ्ठी दिलीच असेल. काल रात्रीं ९–९ ला वर्ध्याला पोंचलों. सुमारें १२ ला रात्रींपर्यंत गाडीची वाट बघत स्टेशनावर बसावें लागलें. पहांटे ३-३० ला बल्लारशाला पोंचलों.

आज सकाळीं ६ ला वर्धा नदींत पू. विनोबांचें दर्शन झालें. दामाजीला आनंदाचें भरतें आलें. दोघांनाहि सांगितलें 'विमल मनानें येथें आहे' विनोबांनीं विचारलें कां? कारण सांगितलें. वर आणखी म्हटलें, 'पुंडली-

काची पाठ देवाकडे होती, म्हणून तो सर्वांपेक्षां जास्त ईश्वराभिमुख नाहीं का ठरला?' विनोबा म्हणाले, 'खरे आहे.' नेहमींप्रमाणें विनोबांची थोडी गम्मत केली.

दामाजीला फार आठवण झाली. म्हणाला, 'दैवी सम्पत्तीच्या गुणांची आठवण झाली कीं माझ्या ताईची मूर्ति डोळ्यापुढें उभी रहाते!' माझें हृदय आनंदानें भरून आलें!

पू. विनोबांचें गांवांत आल्यावर उपनिषदाप्रमाणें सोपें, काव्यमय व श्रवण मनोहर प्रवचन झालें! आबालवृद्ध तल्लीन झाले. भूमिदानाची मागणी केली. मातीची भीक मागितली! मातीचा माहिमा सांगतांना साऱ्या जगाचें ज्ञान सांगितलें. माती खाणाऱ्या बालकृष्णानें 'आ' करतांच यशोदेला नव्हतें का विश्वरूप दिसलें?

कन्नमवारजी, अब्दुल्लाभाई, गावंडे, तुमपल्लिवार, मदनगोपाल यांच्या बरोबर मोटारनें निघालों. सिंदेवाडीला अंघोळ करून शिदोरी खाल्ली. आतां नागपुरला येऊन मेलनें वर्ध्याला जात आहे. तेथून सोनोर रात्रभर प्रवास करून कारंजें आणि सावंगें. उद्यांचें लग्न आटोपून ता. १७ ला नागपुरला पोंचेन. दामाजींचें पत्र सोबत आहे.

पू. विनोबांचीहि शान्तियात्रा एक उज्ज्वल ऐतिहासिक पर्व आहे. त्याचें महत्त्व या प्रान्तांतील लोकांनीं ओळखलेलें नाहीं. आपण त्यांच्या फार निकट आहोंत. जुन्या कर्मजड लोकांप्रमाणें आपल्याला आपल्या चिमुकल्या कर्म विधींतच अधिक गोडी वाटते. राष्ट्रीय ब्रह्मकर्माची महती आमच्या ध्यानांत येत नाहीं.

चांद्याला मी जाणार नाहीं. लक्ष्मीनारायणजी परवां नागपुरलाच येतील. वर्ध्याला तसा निरोप कळविला. सकाळीं ८-३० ला बल्लारशाहून निघालों. आतां १६-१० ला नागपुरला आलों. मध्यें पंक्चर झालें. पेट्रोल संपलें. तरी वेळेवर पोंचलों. अडचणींनीं जीवनाला विशेष रुचि येते नाहीं!

कळावें हे आ.

धंतोली नागपूर　　तुझा

दि. १५-६-५१　　दादा

# कम्युनिस्टांचे गणपति : २०

चि. विमलला अनेक उत्तम अशीर्वाद,

कालच्या पत्रांत तुला विघ्नांच्या चमचमीतपणाविषयीं लिहिलें. काल पू. विनोबांनीं सकाळच्या गोड प्रवचनांत सहज एक सूचक वाक्य--अनेक सूचक व सांकेतिक वाक्यांपैकीं--एक उच्चारलें. ते म्हणाले आधीं गणपति-पूजन करावें लागतें. गणपति म्हणजे पुढारी. हे विघ्नकर्तेहि असतात. आणि विघ्नहर्तेहि असतात. विघ्नकर्ता गणपति हा देखील मंगलमूर्तीच ! काल विघ्नांची चव भरपूर चाखायला मिळाली त्याच्या कृपेनें.

पहांटे ३-४५ ला बल्लारशाहला पोंचलों. आपल्या वर्तनांत मुहूर्ताला महत्त्व आहे. पण वक्तशीरपणाला नाहीं. पू. विनोबा वर्धा नदीवर केव्हां येतील याचा हिशेबे कुणीच केला नाहीं. सकाळीं ६ ला 'दिंडी' काढायची आणि ७ ला विनोबांचें स्वागत वर्धातीरी करायचें असा कार्यक्रम आपल्या मर्जीनें जाहीर केला. पण विनोबा पहांटे ५ ला ' प्रस्थान ' करतात हे सर्वांना माहित होतें. त्यांना तीनच मैल चालून यायचें आहे हेंही माहित होतें. ते फार वेगानें चालतात हेंहि माहित होतें. पण परिस्थितीचा विचार करून कार्यक्रम आंखला तर आम्हांला भारतीय कोण म्हणेल ?

मला ती कल्पना होती. भारतीय संस्कृतीचें बाळकडू मला मिळालेलें होतें. मी मदनला म्हणालों, विनोबा ५-४५ लाच वर्धा किनारीं पोंचतील, आपण लवकर उठून गेलें पाहिजे. ४-४५ ला उठलों. लगबगीनें निघालों. इतक्यांत खुशालचंदाची गाडी दिसली. कांहीं लांबपयत गाडीनें गेलों. पुन्हां पायीं. विनोबा वर्धा ओलांडून या तीरावर येतात तोंच पोंचलों ! आगगाडी साडेतीन तास उशीरां आली ! कार्यक्रम चुकीचा ठेवला गेला तरी वेळेवर स्वागताला पोंचलों.

पायीं गांवांत आलों. शाळेंत सभा झाली. कन्नमवारांनीं प्रास्तविक भाषण केलें. विनोबांचें सुबोध, सुरस आणि सारगर्भित प्रवचन झालें.

ता. १४ ला बल्लारशाहून वर्ध्याला जाणारी गाडी साडेचार तास उशीरां वर्ध्याला पोंचली. तसेंच कदाचित कालहि होईल या भीतीनें नागपूरला १४० मैल मोटारनें जाऊन मेल गाठायचें ठरविलें. निघायची घाई होती. पण एका गृहस्थानें चहाला बोलाविलें. दहा मिनिटांत होईल म्हणाला ! चाळीस मिनिटानंतर चहा मिळाला !

नंतर अबदुल्लाभाईंच्या मोटारनें कन्नमवार, मदन गोपाल, तुमपल्लीवार गावंडे, जगदीशराव साळवे यांच्या बरोबर ८–३० ला निघालों. ९ ला चांद्याला पोंचलों. जगदीशरावांकडे अर्धा तास थांबलों. ९-३० ला निघालों. १२५ मैल प्रवास करून मेल गांठायची होती. २० मैलांवर पंक्चर झालें. वीस मिनिटें गेलीं. तरी वेळ मुबलक होता. १२ ला सिंदेवाडच्या काव्यमय डाकबंगल्यांत अंघोळ व जेवण झालें. जगदीशरावांनीं झुणका व पोळ्या दिल्या होत्या. डाकबंगला रमणीय. पण पाण्याचें दुर्भिक्ष. विहिरीवर थेट भारतीय पद्धतीनें स्नान केलें. शिदोरीवर ताव मारला. १ ला रवाना झालों. भिवापूरला व उमरेडला फक्त दहापंधरा मिनिटें पाणी प्यायला थांबलों. २-३० वाजतां नागपूर अवघें सोळा मैल राहिलें. घरीं जाऊन स्टेशनावर जातां येईल अशी भाषा सुरू झाली. इतक्यांत पेट्रोल संपलें ! सगळे एक-मेकांना दोष देऊं लागले. मेल गांठायची आशा पार जिरली. पण विघ्नहर्ता गणराव कळवळला. एक लॉरी आली. तिनें पेट्रोल दिलें ! अगदीं रक्तदान देतात त्या पद्धतीनें. साडेतीन झाले. गाडी चालू लागली. आशेला पुन्हां अंकुर आला. वाटलें आतां ६-३० ला पुलगांव गांठलें म्हणून समजा. पण विघ्नकर्त्या गणरायाला खोडी करावीशी वाटली. मेलच्या एका फर्स्टक्लासच्या डब्याचें चाकच बिघडलें ! त्यांत दीडतास गेला. थोडा विरस झाला. आणखी विरजण पडावें म्हणून पाऊस सुरू झाला. ७–४० ला पुलगांवला पोंचलों. पावसाची वर्दी देण्याकरतां पुलगांवकरांनीं फोन देण्याचे अनेक प्रयत्न केले. पण 'लाइन'च बिघडली. सोनोरा सात मैलांवर होतें. पाऊस सारखा वाढतच होता. घोडागाडीनें किंवा बैलगाडीनें जाण्याचा मनोदय मी कळविला. पण पावसांत कसली सभा होणार असा पोक्त विचार मंडळीनीं सुचविला. सोनोऱ्याला जाण्याचा बेत रहित करावा लागला.

सारी धडपड वांया गेली ! विघ्नकर्त्यांची सरशी झाली. मला अपयश आलें. पण मी नामोहरम मात्र झालों नाहीं ! माझ्या जीवनांतील सुखखुशीत अपयशांत आणखी एकाची भर पडली.

मंडळींना म्हटलें मला कारंज्याला अगर नागपूरला पोंचवून द्या. पावसाचा जोर कमी होईना. आर्वीच्या रस्त्यावर बावीस मैलांत बावन्न नाले व ओघळ, रस्ता उपमेय होण्याइतका वाईट. पण मंडळी जितकी खटपटी तितकीच लटपटी ! वाटेल तें करून थापा मारून एक लँडओव्हर मिळविली. पण जेवल्यावांचून कोण निघूं देणार? ८ वाजतां एक प्रमुख कार्यकर्ते म्हणाले, एका तासांत जेवण तयार होईल. जेवल्यावांचून जाऊं नका. हा तासहि घड्याळाचा नव्हता. अघळपघळ होता. तो औट घंट्याचा तास निघाला. दरम्यान सोनोऱ्याहून माझ्याकरतां रेंग्या येऊन गेल्या. पण मला कोणी कळविलें देखील नाहीं. ११ नंतर जेवायला बसलों. जेवणाची गरज नव्हती. पण जेवल्यावांचून गत्यन्तर नव्हतें ! रात्रीं ११-३० नंतर लँड-ओव्हरनें निघालों. पुलगांव-आर्वीचा रस्ता अगदीं सर्कशीच्या व सिनेमाच्या लायकीचा होता. ओढ्यांना पूर मात्र नव्हता ! तो ओसरला होता.

उत्तर रात्रीं २ ला कारंज्याला पोंचलों. चिखल खूप होता. सावंग्याच्या रेंग्या निघून गेल्या होत्या. नारळ्यांकडे आणखी तीन पाहुणे होते. २-३० ला तेथें गेलों. २-४५ ला झोंपलों. ३-४५ ला उठलों. प्रातर्विधि, नारळ्यांच्या मुनीमानें एक रेंगी दिली. ती 'रेंगी'च होती. म्हणजे रांगत होती. चार माणसें एकमेकांवर आदळलीं असतीं. रस्ता दगडांचा व खांचखळग्यांचा ! एका तमंच्याला बरोबर घेऊन ४-४५ ला पायींचि निघालों. हवा मोठी तरतरी आणणारी व प्रसन्न होती. चिखल मात्र तुडवावा लागला. पांच वर्षें राजकारणांत काढल्यामुळें तें अंगवळणी पडलें होतें. दोन तास लागले सात मैल चालायला ! गांवाशेजारीं आलों. तो नदीला पाणी ! पण इतक्यांत माझ्याकरतां कारंज्याला जायला निघालेली रेंगी आली. गाडीवानानें हात धरून नदींतून आणलें. एका पाटलाची सजलेली घोडी आली. तमंच्यासह तिच्यावर बसून गांवांतून एक फर्लांग मिरवित मामांच्या वाड्यांत आलों. दादा आला, दादा आला ! आनंदाची आरोळी दुमदुमली.

पू. आई आली आहे. मुलेंमुली सुना मिळून आठदहा धर्माधिकारी आले आहेत. भाई बाबाहि आहेत. आजचा दिवस राहीन, शेवटीं मामांच्या उत्कट प्रेमाची फत्ते झाली. लग्नाला मी हजर राहूं शकलों!

तुझी इच्छा चांद्यापासून विनोबांच्या यात्रेंत सामील होण्याची होती म्हणून विनोबा, दामाजी व बिहारी यांस सांगितलें. पण पावसाळ्यांत तिला जोखीम घेऊं देण्याची माझी तयारी नाहीं असेंहि सांगितलें. सगळ्यांना पटलें! तूं खणखणीत बरी झालीस, तुझी प्रकृति निकोप राहूं लागली म्हणजे या अद्‌भुत शांति संगराची मंगल-मंजुळ तुतारी तूं व्हावीस असें मला वाटतें. विनोबांना मी म्हटलें 'तुम्हांला लोक वामनाची उपमा देतात. पण मला तुमच्या या प्रक्रियेंत वामन व दधीचि यांचें मिश्रण दिसतें! विनोब शब्दांच्या गमती खूप करतात हें तुला माहितच आहे. दही खात बसले होते. म्हणाले दही खात असतों तेव्हा 'दधीचि म्हणा."

प्रवचनांतहि असे गमतीचे अर्थगंभीर प्रयोग केलेच !

(१) कम्युनिस्टांच्या 'गणपतींना' (पुढाऱ्यांना) भेटलों आणि गणपति-पूजन केलें. त्यानें एकमेकांचा 'हृदय परिचय' झाला. 'हृदय परिवर्तन' होईल तेव्हां होवो !

(२) एक बिनवजनाच्या इसमांची समिति नेमली. तिचें नांव शून्य-समिति. तिच्या मागचे आकडे कोणीच बनले नाहीं तर तीं शून्यें शून्येंच राहतील.

(३) हें भूमिदान, या यज्ञाचा आरंभ आहे. किर्त्याला सुरवात करतांना पहिला धडा पंतोजी हात धरून गिरवायला शिकवितात. नंतर त्यानें पंतोजीवांचून लिहित जायचें असतें. तसें हें निरंतर दान आहे.

अशी कितीतरी बोधवचनें होतीं. तुझ्या प्रकृतिविषयीं ऐकून बिहारीच्या आनंदाला पार राहिला नाहीं. म्हणाला 'माझें इतकें धडधाकट शरीरहि बिनोबापुढें टिकत नाहीं.' ताईची प्रकृति निकोप राहो! कलमवार मुद्दींचे चालणारे. म्हणाले, विनोबांच्या गतीपुढें आमची तिरपीट उडते !

तुझे भजनांचे व भाषणांचे कार्यक्रम सुरू आहेत पण मला ऐकायला केव्हां मिळतील ते मिळोत !

वर्ध्याची मंडळी सोनाऱ्याला भेटली असती पण तेथें मी पोंचूंच शकलों नाहीं. त्यामुळें मीरा, रेहानाबेन व लक्ष्मीनारायण भट यांना निरोप पाठवावयाचें राहिलें. उद्यां तर मी रात्रीं नागपूरला पोंचणार. तुझी भेट ? तुला घेऊन येऊं घरीं ?

तीःस्व.बापू व अक्का यांची तुझ्यावर ममता या पाळीला व्यक्त झाली हें ऐकून फार फार समाधान वाटलें. तुझ्या शुचितेचा व निर्व्याजतेचा हा परिणाम आहे. सारेच ढग वितळून जातील, बेटा !

कळावे हें. आ.

लोहारें–सावंगें तुझा
१६–६–५१ दादा

---

## सुदाम्याच्या पोह्यांतील सामर्थ्य : २१

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद.

ता. २५ ला दिल्लीहून एक पत्र तुला पाठविलें. एक जबाबी केबल-ही कराविली. उत्तराची उत्कंठेनें प्रतीक्षा करीत आहे. ता. २७ ला अबोहरला आलों. एक दिवस उशीरां आल्यामुळें स्टेशनावरूनच मोटारनें वाळूचे ' टिब्बे ' तुडवीत, धुराच्या पडद्याप्रमाणें सर्वत्र पसरलेल्या धुळींतून, नाक, तोंड, डोळे, कान, या सर्व इंद्रियांनीं धुळीचें सेवन करीत प्रवासाला आरंभ केला. धूळ व तुफान यांच्या ऐन वेगांत एका खेडेगांवीं भाषण केलें. धुळीचेंच डबक्याचें पाणी अंघोळीला व प्यायला मिळालें. बिहारमध्यें मी गेलों असतां दहा महिन्यानंतर पाऊस पडला. ता. २७ ला रात्रीं दुसऱ्या गांवीं पोंचलों असतां व्याख्यानानंतर सडकून पाऊस झाला. हा सबंध प्रदेश शीतळ व संतुष्ट झाला.

आमची जुनीच फोर्डव्हिएट गाडी आणि तिचा कुशल सारथी सोहनलाल तैनातीला होते. माझ्या प्रवासांत जर अडचणी, अडथळे आणि अरिष्टें आलीं नाहीं तर त्याला चवच येत नाहीं. आमच्या गाडीला अक्षरशः सरकस करावी लागते. कालव्याच्या बांध्यांवरून उड्या मारणें, चिखल तुडविणें, पाण्यांतून धांवणें, रस्त्याला पडलेल्या भेगा, तडा, भगदाडें ओलांडणें हे सारे विक्रम आमची गाडी करते. परवां संध्याकाळीं मात्र चिखलांत रुचली ती रातभर जायबंदी झाली. पायीं चिखल तुडवीत, निसरड्यावरून व पाण्यांतून तोल संभाळीत नवीकमें गांव गांठलें. ओल्या कपड्यांनीं रात्र काढली. काल कालव्याच्या किनाऱ्याच्या वाटेनें निघालों तों एवढालीं भगदाडें आडवीं आलीं कीं शेवटीं अबोहरला कसेबसे परत आलों. रात्रीं येथें जाहीर भाषण केलें. आज सकाळीं येथील शाळेच्या विद्यार्थ्यांसमोर भाषण केलें. भाषा, मांडणी, ओज, सारें कांहीं औरच साधलें ! ता. २७ ला रात्रीं सितो या खेड्यांत केलेलें भाषण इतकें फक्कड झालें कीं तसें भाषण मुंबई–पुण्यांत झालें असतें ! पण माझी कलाच अशी ‘ लहरी ’ आहे ! भाषाहि इतकी बेमालूम उतरते कीं लोक मला उर्दू पण्डित मानूं लागले आहेत. अडचणींमुळें व अडथळ्यामुळें प्रवासाला खुमारी येत असली, तरी हें ‘ काव्य ’ तुला मात्र मानवलें नसतें ! तुझा प्रवास सुखकर व ज्ञानवर्धक होवो ! माझा प्रवास आधुनिक साधनांच्या व सोयींच्या अभावाला सरावलेल्या भागांतून चाललेला आहे. स्वच्छतेचें नांव नाहीं. तुझ्या अगदीं विरुद्ध परिस्थितींतून होत आहे. पण तुझी आठवण मात्र फार फार होते बेटा ! तूं असतीस तर या प्रवासाच्या उपयुक्ततेंत व गोडींत अनंत पटीनें भर पडली असती. अडचणींत, आपत्तींत, गैरसोयींत आपल्या वृत्तीचें माणूस, आणि तीहि पोटची पोर, असली तर त्या गैरसोयीच्या प्रवासालाहि कारल्याच्या खमंग भाजीची चव येते आणि तिचा तुरटपणाहि कुळूच्या सफरचंदाप्रमाणें रुचकर लागतो ! मुंबईला २३ तारखेला तूं म्हणाली होतीसना, कीं ‘ तुम्ही बरोबर येणार असतां तर मला याहि प्रवासांत गोडी वाटली असती ? ’

पोरी, आपला हा नैसर्गिक व मानवी वैभवानें आणि विविधतेनें

नटलेला देश विज्ञानाच्या चमत्कारांनीं मातबर झालेला नसला तरी प्राचीन अनुभवानें मुरलेला आहे. विज्ञानाच्या संहारात्मक शोधांनीं भयभीत झालेल्या मानवाला निर्भयतेनें व नम्रतेनें जगण्याचा, परमश्रेयकर मार्ग त्यानें दाखविलेला आहे. ही अनमोल दौलत त्याच्या जवळ आहे, या युगांतील वास्तविक मानवानें त्या मार्गांचें अनुसरण करून त्याची व्यवहार्यता आणि यशस्विता जगाच्या निदर्शनाला आणून दिली आहे ! जगाला आपली हीच ' देणगी ' आहे. या सुदामाच्या पोह्यांत अद्‌भुत सामर्थ्य आहे ! स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचें स्थान प्राप्त होण्याचा हाच एक मात्र मार्ग आहे. शरीरानें दुबळी मानली गेलेली स्त्री, मनोबलानें व आत्मबलानें सगळ्या जगासमोर आपलें ' सत्व ' राखूं शकेल. म्हणून आजच्या मुग्ध जर्जर आणि विज्ञानोमत्त जगाला हीच एक मात्र संजीवनी मात्रा घेतां येणें शक्य आहे. हा संदेश माझे मुली, कंठरवानें आत्मबलाच्या महिम्याचा डिंडिम वाजवून, तूं नव्या दुनियेला ऐकव, गांधींच्या यशाची द्वाही मिरव !

पाकिस्तानचे पंतप्रधान मोठ्या उन्मत्तपणानें ' वळलेली मूठ ' दाखवीत आहेत. मीं पाकिस्तानच्या सीमेवरील भागांत हिंडत आहे. लोकांमध्यें असन्तोष आहे, संताप आहे, पण भीति नाहीं. पाकिस्तानाची जरब कुणाला वाटत नाहीं. आपण आगळीक करावी अशी वृत्ति दिसून येत नाहीं. पण कोणी खोडी केली तर सहन करण्याची तयारी नाहीं. सौजन्य व शौर्य यांच्या धोरणांतहि उमटत आहे. काश्मीरमध्यें न्याय आमच्या पक्षांत आहे. जेथें न्याय व सत्य तेथेंच फत्ते राहील अशी निष्ठा आपण बाळगूं या.

इकडील प्रवास आटपून मी ता. ४।८ ला दिल्लीला पोंचेन. मागल्या पाळीला सन्तोष व टॉमस यांना भेटूं शकलों नाहीं. या पाळीला सन्तोषला भेटून तिच्या ' जिजी 'ची बातमी तिला अवश्य सांगेन. ती. स्व. बापूंना एक पत्र पाठविलें आहे.

श्री. कुलवंतराय, अन्सारी व इतर मित्र यांस ' जयहिंद ' ! त्यांचा सगळ्यांचा ' रवैय्या ' ठीक आहेना ?

तूं शुक्रवारीं ' न्यूयॉर्क 'ला खुशाल पोंचल्याची तार दादा पाटलांनीं ता. २८ ला केली, ती मला आज मिळाली. हृदय भरून आलें. पोरी, तुझ्यावर निर्व्याज अपत्य स्नेह करणाऱ्या तुझ्या पित्याच्या कळकळीच्या प्रार्थनेनें तुझा प्रवास यशस्वी, उपयुक्त व सुखकारकच होईल ! तो दयाघन तुझा पाठीराखा आहे !

कळावें हे आ.

अबोहर, पंजाब
दि. ३०।७।५१

तुझा
दादा

ता. क. :–गिरिधारी भय्याचें हृदय पिळवटून लिहिलेलें पत्र आलें. तुझी खूप आठवण केली आहे. तूं पोंचल्याचें त्यांना कळवीत आहे.

दादा

---

# अध्यात्माचें अमृत : २२

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद.

' माझीं पत्रें तुला मिळत राहिलीं पाहिजेत ' असें तूं मला निक्षून सांगून गेली होतीस. म्हणून मी दिल्लीला आल्याबरोबर तुला एक केबल व एक पत्र कॉर्नेल युनिव्हर्सिटीच्या पत्त्यावर पाठविलें. केबल जबाबी होतें. पण त्याचें उत्तर मात्र अजून आलें नाहीं. तूं ता. २३ ला गेलीस, ता. २६ ला मीं केबल व पत्र पाठविलें. श्री. दादा पाटील यांस तुझें उत्तर येतांच तें अबोहरला तारेनें कळविण्याविषयीं बजावून गेलों. ता. ३० ला मला अबोहरला पाटलांची तार मिळाली. तूं शुक्रवारीं ता. २७ ला खुशाल पोंचल्याची बातमी त्या तारेंत होती. मला वाटलें माझ्या केबलचें तें उत्तर असेल ! पण आज येथें आल्यानंतर दादा पाटलांकडून समजलें कीं ती. स्व. बापुसा० ची अकोल्याहून त्यांना तार आली होती म्हणून. म्हणजे माझ्या

केबलचें उत्तर नाहीं. उत्तराकरितां मुद्दाम पाठविलेला फार्म फुकट जाऊं नये हा एक मुद्दा आहेच. पण तुझें उत्तर न आल्यामुळें काळजी वाटली हा विशेष महत्त्वाचा मुद्दा आहे. पुन्हां ता. ३० ला अबोहरहून एक पत्र मीं तुला कॉर्नेल युनिव्हर्सिटीच्याच पत्त्यावर पाठविलें. हीं पत्रें तुला पोंचलीं किंवा नाहीं तें देव जाणे! पंजाबचा प्रवास संपून आज येथें आलों. यतिराज नागपुरला गेले होते, तेहि आजच आले. तुझें ता. २६।७ चें पत्र मला आज पोंचलें. त्यांत तूं नवीन पत्ता दिलेला आहेस. त्या पत्त्यावर पुन्हां हें पत्र पाठवीत आहे.

मी ता. ७ पर्यंत नागपुरला पोंचेन. तुझ्या पत्राची वाट पाहीन. काल रात्रीं भटिंड्याला ता. ३।८ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' मध्यें लॉर्ड मेयर ऑफ लंडन बरोबर तुमचा फोटो पाहिला. तुझा फोटो पाहून काय वाटलें असेल याची तूंच कल्पना कर.

खाण्यापिण्याच्या बाबतींत लंडनपेक्षां अमेरिकेंत थोडे जास्त जिन्नस मिळतील. फळें व भाज्याहि भरपूर मिळूं शकतील, शिवाय दूध मिळेल. यतिराजांचें पत्र व इतर कांहीं पत्रें मीं मागील दोन पत्रांबरोबर तुझ्याकडे पाठविलीं आहेत. आणखी पुन्हां पाठवीत आहे. बहुतेक परवां सगळीं पत्रें रवाना करीन. आज डॉ. श्रीधराणीनांहि भेटून त्यांच्या जवळून परिचय पत्रें घेतों.

आठ दिवस अबोहरच्या दशक्रोशींत प्रवास केला. रोज दोन खेडीं याप्रमाणें हिंडलों. शौच, लघवी व अंघोळ या शारीरिक विधींकरितां जागा लागते ही गोष्ट मान्य करायला प्राचीन परंपरेचे अभिमानी साफ तयार नाहींत. मी ज्या भागांत होतों त्या भागांत स्वच्छ पाणी प्यायलाहि मिळालें नाहीं, मग अंघोळीला मिळण्याची गोष्ट कशाला? वाळू, पाणी व चिखल यांच्याशींच गांठ. दगड किंवा खडक शोधून देखील सांपडणें अशक्य. कपडे धुणें देखील लांकडावर करावें लागलें. प्रवास मोटार, आगगाडी, उंट, ट्रॅक्टर इ. सर्वच प्रकारचीं वाहनें वापरलीं! तिकडे तुला चहा प्यावा लागतो. मी चहा पिणारा असून सुद्धां मला वेळेवर चहा मिळेना, आणि जो मिळे त्याला 'चहा' फक्त सौजन्यादाखल म्हणायचें.

इकडे मी या जराजर्जर परंपरेच्या चाकोरींत रुतलेल्या भागांत हिंडत होतों, तिकडे तूं भौतिक वैभवालाच जीवनाचा प्रसाद मानणाऱ्या देशांत प्रवास करीत आहेस. ' द रोड टू सरव्हायव्हल ' तुझ्याजवळ आहे. त्यांत अमेरिकन राहणीच्या ऐश्वर्याचीं तीन उपकरणें सांगितलीं आहेत. द ऑटोमोबाइल, द रेडिओ अँड द बाथरूम. भौतिक सुख प्रत्यक्ष असल्यामुळें जीवनांत एक प्रकारची वास्तविकता व गंभीरता येते. या एकनिष्ठतेमधून सार्वजनिक चारित्र्य उत्पन्न होतें. हें सुख व्यापक व सार्वत्रिक करण्याची हातोटी व पद्धति अजून इंग्लंड--अमेरिका यांना अवगत झालेली नसल्यामुळें त्याची सभ्यता कोलमडण्याच्या बेतांत आलेली आहे. तेव्हां हे देश अस्तंगत होणाऱ्या सभ्यतेचे प्रातिनिधि आहेत हें खरें आहे. पण याला खरा उपाय हाच आहे कीं विज्ञानानें आस्तिक्याची कांस धरून पृथ्वीवर जीवनांचें मूल्य व प्रतिष्ठा वाढविण्याकारितां आपलें सामर्थ्य वेचलें पाहिजे. विज्ञानाच्या रसायनाला स्नेहाच्या अमृताचें अनुपान मिळालें तरच त्याची संजीवनी मात्रा होईल, फक्त विज्ञानानें ही पृथ्वी उपकरणांनीं सम्पन्न ' वितस्थपूर्णा ' होईल. पण ' अमृतास्यतु नाशास्ति वित्तेन ' पृथ्वी, तिच्यावरील सारे जीव व मनुष्य एकमेकांना जेव्हां ' जीवनदान ' देतील, म्हणजे स्नेहाचें अमृत जेव्हां, तिघांनाहि ' जीवदाना 'चें सामर्थ्य देईल, तेव्हांच अमृतत्व प्राप्त होईल, एरव्ही नाहीं. हें अध्यात्माचें अमृत सामाजिक जीवनांत ओतप्रोत भरलें तरच या मृत्युलोकांमध्येंहि अमरत्वाची कळा मानवी जीवनाला येईल. डॉलर माइंडेड अमेरिकेमध्येंहि आज सोन्यापेक्षां मातीचें महत्त्व वाढत आहे, हें मोठें शुभ चिन्ह आहे.

ती. स्व. बापूंना तूं पाठविलेल्या पत्राची नक्कल त्यांनीं येथें पाठविली. ती आज मिळाली. यतिराजांना तुझें पत्र ता. ३० ला पोहचलें, बापूसाहेबांनाहि त्याच सुमाराला पोंचलें असावें. बापुसा॰ना लिहिलेलें तुझें पत्र वाचून फार बरें वाटलें. जगामध्यें निग्रह व स्वाभिमान यांचीच कदर होत असते. आपलें स्वत्व व सत्व दोन्हीं राखण्यासाठीं प्रतिकूल परिस्थितींत जो ताण पडतो त्यानें जीवनाचा कस वाढतो. बेटा, तो भगवंत नेहमींच तुझ्या पाठीशीं आहे व रहाणार. तो तुझी उपेक्षा कसा बरें करील ? पू॰ बापू

( गांधी ) विलायतेला जायला निघाले तेव्हां त्यांच्या मातोश्रींनीं त्यांना तीन प्रतिज्ञा घ्यायला लावल्या आणि त्यांनीं त्या त्याहि काळांत अक्षरशः पाळल्या ! त्यानंतर तर अनेकांनीं त्या मर्यादा पाळून दाखविल्या. व्रतपालन अवघड आहे, पण देवाचें साहाय्य असल्यावर अवघड कांहींच नाहीं. मद्य–मांस वर्जन व ब्रह्मचर्य या तुझ्या व्यक्तित्वाच्या मर्यादा कसोशीनें संभाळ. तुझ्या स्वधर्माचे हे तीन पाद आहेत.

तुझी आठवण सतत असतेच. तिच्याबरोबर निरंतर प्रार्थनाहि चालू असते. ती. स्व. बापू व सौ. अक्का यांचा आशीर्वाद आणि तुझी ईश्वरनिष्ठा तुला सर्व संकटांतून व दिव्यांतून पार पाडील यांत शंका नाहीं. ती. स्व. बापूंकडे सविस्तर पत्रें पाठवीत जा. त्यांनीं तुझ्या खुशालीचें वर्तमान मला कळविलें तरी चालेल.

कळावें हे आ.

१२, तुगलकरोड नवी दिल्ली — तुझा
दि. ४।८।५१ — दादा

---

## दिवस उजळून गेले म्हण ! : २३

चि. विमलला अनेक उत्तम आशीर्वाद.

आज सकाळीं मनमाडला येतांच तुझ्या पत्राची चवकशी केली. आलेलें नव्हतें, पण सुमारें तासानंतर आलें. हकीकत वांचून स्नेहभरानें अंतःकरण ओसंडून आलें. तूं कोठें तरी मला भेटण्याचा प्रयत्न करशीलच अशी साक्ष मनोदेवता देत होती. सबंध आठवड्यांत चांगली झोंप मिळाली नव्हती. तरी काल रात्रीं अकोल्याला झोंप उघडली, भुसावळला जाग आली. जळगांवला डोळ्यांनीं सगळीकडे तुझा शोध केला. मनू, माझ्या पोटची पोर असलीस तरी माझ्या विस्मरणशीलतेप्रमाणेंच माझ्या अजागळ-

पणाचा वारसा तूं काय म्हणून उचलून घ्यावास बरें! तूं गुणाच्या व सामर्थ्याच्या बाबतींत माझ्यापेक्षां सरस ठरावीस, अशी प्रार्थना मी करतों. पण दोषांच्या गाठोड्याला हात लावूं नकोस. मग तें तुझ्या बापाचें गाठोडें कां असेना!

तुझ्या अपेक्षेप्रमाणें रोज एक पत्र पाठविलें होतें. एरंडोलचें पत्र तुझ्याकडे रवाना करायला आजच श्री. सीतारामभाऊ काबरा यांस कार्ड लिहित आहे. जळगांवचें पत्र पंढरपुरला रवाना केलें असल्याचें कार्ड राजा मंत्री यांच्याकडून आजच आलें आहे. जळगांवनंतर तुला पत्र पोंचेल कीं नाहीं या शंकेमुळें ता. १६ व १७ ला पत्रें पाठविलीं नाहींत. माझ्या शंकेप्रमाणें तुझ्या कार्यक्रमांत फेरफार झालाच. मनमाडच्या बाबतींत मात्र व्यर्थ घोटाळा होऊन तुला दगदग झाली.

मी आज येथें अध्यापक विद्यालयांत व वाचनालयातर्फे भाषणें करून रात्रींचे गाडीनें रवाना होईन. पहांटे नांदेड. दिवसभर मुक्काम. ता. २० ला परत जातांना कुठल्या मार्गानें जायचें तें नांदेडला ठरवीन. तूं या भागांत कोठें असशील या कल्पनेनें मनमाड-भुसावळ मार्गानें जाण्याचा विचार ठरविला होता. आतां कदाचित हैदराबादकडून जाईन.

ता. २२ जबलपूर व ता. ३० नगरे, असे दोन कार्यक्रम ठरले आहेत. पुढील अजून स्वीकारिले नाहींत.

गुरुजींच्या पावन कर्मभूमींत तुला नवीन चैतन्य व स्फूर्ति यांचा लाभ झाला हें वाचून अतिशय धन्यता वाटली. सन्ताच्या जीवनांतील खरा चमत्कार हाच मानला पाहिजे. त्यांच्या स्पर्शानें व संचारानें माती भारली जाते, अभिमंत्रण होतें तिचें. तेथील वातावरणांत परिमल दरवळतो. गुरुजींचें जीवन 'विद्युत श्लाके' प्रमाणें होतें. त्याची आभा सर्वत्र फांकत असे. त्यांचे शब्द विजेच्या ठिणगीसारखे असत. प्रकाश, स्फूर्ति व संजीवन देणारे! अशा थोर पुरुषांची लीलाभूमि हेंच खरें तीर्थक्षेत्र. कोणाला भुतें झपाटतात, कुणाच्या अंगांत देव देवता येतात, कोणाला प्रेतांशीं सन्धान बांधतां येतें. पण थोर साधुसंत पवित्र स्फूर्ति आणि प्रेरणा यांच्या रूपानें

वातावरणांत व मातींत मिसळून जाऊन अधिकारी व्यक्तीच्या हृदयांत आभिव्यक्त होतात. तुला तो अनुभव आला. भाषणें ऐकायला मी असतों, तर मनाचे पांग फिटले असते ! पण बापाचें कोड मुलें नेहमींच कशीं पुरवूं शकतील ? पण बापाचें हृदय नित्य उत्कंठित मात्र रहातें.

दिवस 'कापरासारखे उडून गेले म्हणून तूं लिहित्येस 'उडून' नाहीं. उजळून गेले म्हण. क्रियाशील माणसाकरितां 'वेळ' हें आयुष्याचें अपहरण करणारें 'तत्त्व' नव्हे. ती जीवनांची सामग्रीच आहे. उपासनेच्या द्रव्यांपैकीं एक द्रव्य आहे. कापरासारखा वेळहि देवाच्या आरतीकरितां उजळला गेला म्हणजे त्याचा सुवास दरवळतो आणि त्याची प्रभा फांकते !

भालबांनीं मला 'प्रणाम' लिहूं नयेत. वय, कर्तबगारी, गुण, यांपैकीं मी कुठल्या बाबतींत 'मानानें' मोठा आहे ? त्यांच्या सारख्यांसमोर मला माझ्या अल्पतेची प्रतीति होते ! त्यांना म्हणावें 'प्रणाम' नकोत.

कळावें हे आ.

धंतोली, नागपूर तुझा
दि. १८-१२-५१ दादा

---

# देवाला माहीत आहे : २४

चि. विमलला अनेक उत्तम आ.

काल नांदेडहून निघाल्यानंतर तुला एक पत्र पाठविलें. लेट फी लावली. पण एक्स्प्रेस 'डिलिव्हरी' चीं तिकिटें लावायला विसरलों.

मनमाडला सुमारें रात्रीं १ ला पोंहोचलों १-३० ला कलकत्ता मेल आली. दुसऱ्या वर्गाचे डबे अगदीं कडेकोट बन्द ! गार्ड म्हणाला भरलेले आहेत. कसाबसा इंटरच्या डब्यांत शिरून भुसावळपर्यंतचे चार तास वळकटीवर बसून काढले. तिकीट दुसऱ्या वर्गाचें होतें. इंग्रजांच्या

अम्मलदारींत अशावेळीं खुशाल सावळी ओढीत असें. पण आतां ती वृत्तीच मावळली आहे.

भुसावळला मात्र दुसऱ्या वर्गांत वरच्या बर्थवर जागा मिळाली. काल नांदेडला थंडीच नव्हती. आज पुन्हां कडाडली आहे. आतां ऋतुमान चंचल झालें आहे. थंडीच्या व उष्णतेच्या लहरी येतात. भुसावळला जागा मिळाली नसती तर पंचाईतच झाली असती. पण देवाला माहीत आहे कीं माझें धारिष्ट 'अल्प' आहे. म्हणून तो माझी फजिती होऊं देत नाहीं. त्याच्या करुणेचा अनुभव आम्हां पामरांना व पाप्यांना जसा येतो तसा समर्थांना व पुण्यवन्तांना कधींच येणार नाहीं. म्हणून तर मी अगदीं बेलाशक ग्वाही देत असतों.

आज दुपारीं जबलपुरला पोंचेन. संध्याकाळीं भाषण करीन. उद्यां सकाळीं बसनें निघून दुपारीं नागपूर. ता. २९ ला रात्रीं एक्स्प्रेसनें निघून ता. ३० ला नगर, बहुतेक त्याच रात्रीं परत निघेन.

पंढरपुरला पुंडलिकापासून तो सानेगुरुजींपर्यंत अनेक सन्तानीं पुण्यदान केलेले आहे. तुझी जात तीच आहे. प्रमाणाचाच काय तो फरक असेल. तुला तेथें तुझें व्यक्तित्व सांवरता येईल. तसें झालें म्हणजे जेथें जाशील ती ती 'पंढरी' विठ्ठरायाची नगरीच होईल.

श्री महाराजांना सविनय प्रणाम.

कळावें हे आ.

कलकत्ता मेल
दि. २२–१२–५१

तुझा
दादा

# सब इन्तजाम पक्का है । : २५

चि. विमलला अनेक उत्तम आ.

मी ता. १७ ला येथून गेलों. तो काल रात्रीं १० लाच परत आलों. माझ्या अपेक्षेप्रमाणें तुझीं दोन पत्रें आलेलीं होतीं. एक दौंडाहून ता. १७ ला धाडलेलें आणि दुसरें ता. १९ चें मिरजेहून गाडी बदलल्यावर लिहिलेलें. आधाशीपणानें वाचलीं मी. एकापेक्षां एक सरस आणि सुरस! अजून मिटक्या मारीत आहें. त्या सुखावर कळस चढवायला आज तुझें ता. २१ चें कोल्हापुराहून लिहिलेलें पत्रहि आलें. आनंद अधिक वाटला कीं धन्यता तें कोणी सांगावें! मायबाई तूं मायेच्या आणि आनंदाच्या अमृतानें न्हाऊं घातलेस!

भालबांच्या व्यक्तित्वांत निश्चयाचें तेज आणि निष्ठेचा भक्कमपणा आहे. बुद्धि शाबूत असली म्हणजे बिकट समस्यांनीं तिची धार अधिकच तीक्ष्ण होते. ती कुंठित होत नाहीं. हृदयांत निष्ठा असली म्हणजे निराशा जवळ फिरकत नाहीं. निश्चयात्मक निष्ठा हा कणखर व्यक्तित्वाचा मेरुदंड आहे. भालबांविषयीं त्याचमुळें मला आपुलकी व आदर आहे. मी पडलों चारचौघांत रहाणारा लौकिक वृत्तीचा माणूस. देवाचें दर्शन मला चराचरांतील विभूमत्सत्वांच्या रूपानेंच व्हायचें. मला का त्याचा साक्षात्कार होणार आहे! तूं कोल्हापुरला जाऊन आलीस हें फार मोठें सत्कृत्य केलेंस. बेटा मला विलक्षण समाधान वाटलें.

येथून गेल्यापासून तुझ्या व्यक्तित्वाची एक एक पाकळी उमलतांना पाहून माझ्या धन्यतेला सीमा उरली नाहीं. त्या सुगंधानें माझें विश्व सुरभित झालें आहे!

‘ कन्याकुमारी ’ च्या तीन मूल सत्त्वांबद्दल तुला वारंवार लिहितों याला माझ्या जिव्हाळ्याखेरीज आणखी कांहीं कारणें आहेत. त्यापैकीं दोन कारणें सांगतों. एक, अनेक जन्माच्या तपानें लाभणारी ही सिद्धि तुला

जन्मसिद्ध आहे. या अलौकिकतेमुळेंच तो ठेवा मला इतका अनमोल वाटतो. आणि दुसरें असें कीं ज्याच्यापशीं जें नसतें त्याचें महत्व त्याला भलतेंच वाटत असतें. या तिन्ही गुणांचा माझ्या जवळील अभाव इतका प्रचण्ड आहे कीं तो तिन्ही लोकांना व्यापून उरेल. म्हणून तुझ्या आश्वासनानें मला आनंद झाला असला तरी मी पुन्हां लिहिणारच नाहीं अशी हमी देऊं शकत नाहीं. मी कांहीं तुझा 'पिता' नाहीं किंवा 'माता' नाहीं 'बाप' आहे. बाप हा 'बापडा' हि असतो आणि 'बाप्या' हि असतो. माझें लिहिणें मनावर घेऊं नकोस, मनू !

ती. स्व. बापूंचें पत्र आलें. चि. मधुकर अकोल्यालाच रजेवर आहे. मीं मुद्दाम सौ. कमलची गांठ घेतल्यामुळें बापूसाहेबांना समाधान वाटलें. तुझ्या पंढरपुरच्या मुक्कामाची कल्पना ती स्व. बापू सा० सौ. कमल यांना माझ्या आधींच होती असें दिसतें ! बापूसाहेबांना तुझ्या पत्राची अपेक्षा आहे. त्यांना पत्र पाठव.

मीं तुला चहार्डी, एरंडोल, जळगांव या ठिकाणच्या पत्त्यावर तीन आणि पंढरपुरच्या पत्त्यावर मनमाड, नांदेड येथून दोन आणि आगगाडींतून दोन अशीं सात पत्रें पाठविलीं आहेत. हें आठवें.

ता. २२ ला दुपारीं ३ ला जबलपुरला पोंचलों. सायंकाळीं स्नेह-संमेलनांत भाषण केलें. रात्रीं शब्द्यांकडे झोंपलों. माझ्या निमंत्रकांचा कारभार फारच भोंगळ्या भंपकबाजीचा ! मला सांगितलें. 'सब इन्तजाम पक्का है !' मी शब्दयांना घेऊन भयंकर थंडींत काल सकाळीं बस स्टँडवर पांच मैल गेलों. तिकीट नाहीं, व्यवस्था नाहीं, जागा नाहीं, दुपारच्या बसचें तिकीट काढून कसाबसा प्रस्थान ठेवून शब्दयांकडे परत गेलों. आमच्या निमंत्रकांनीं पुन्हां दर्शन म्हणून दिलें नाहीं किंवा विचारपूसहि केली नाहीं. ते निवडणुकीचे उमेदवार नसल्यामुळें मी त्यांच्या वचनांना भुललों ! कित्येक गोसाव्यांप्रमाणें मी आगगाडीवर धर्मशाळा, देवळें, रस्ते, घाट इ. च्या इतकाच आपला हक्क गाजवून फुकट प्रवास तरी करीत असलों पाहिजे किंवा सराकरनें मला एक कायमचा सदर परवाना तरी

दिला असला पाहिजे, असाहि माझ्या निमंत्रकांचा पक्का समज झालेला दिसला !

हें उदाहरण मासलेवाईक असलें तरी एकंदरींत असे नमुने विरळा आहेत एवढें बरीक खरें !

दुपारपर्यंत रहावेंच लागलें म्हणून नानासा० शब्दे, तारा, त्यांचे सुनील, रवि, इला व मीना याच्याबरोबर ‘ मदन महल ’ च्या डोंगरावर चढून आलों. पायांना थोडा चाळा मिळाला. एका खडकावर उभारलेली इमारत आहे ती. येशु म्हणाला होता, ‘खडकावरील घर टिकतें, वाळूवरील घर पडतें. माझें घरकुलहि टिको !

तारा म्हणाली, ‘ आम्ही आपल्या विमलला सिनेमांत पाहिली ! खूप खूप आनंद झाला ! ज्ञान कुमारी म्हणाली होती, ‘ दादा मैंने अपनी विमल ताई को सिनेमामें देखा ! मुझे खूब गुदगुदी हुई ! ’ ‘ आपली विमल ’ ! ‘ अपनी विमलताई ! ’

बेंगलूरच्या स्वामीनाथन्चें पुन्हां पत्र आलें. चुकलें ! स्वामीनाथन् नव्हे जंबुनाथन् ! आतां त्यांना ९ फेब्रु. ते १२ फेब्रु. असे चार दिवस हवे आहेत. उत्तर द्यायचें आहे. फारलिस गंज व आसाम येथील पत्रें पुन्हां आलीं नाहींत. सर्वोदय संमेलन एप्रिलमध्यें उत्तर प्रदेशांत होईल. तारखा व ठिकाण नंतर कळेल. नगरला माझा कार्यक्रम ता. ३० ला दुपारीं आहे. मी बहुतेक ता. ३० च्या मेलनें निघून सकाळीं ९ च्या सुमाराला नगरला पोंचेन. जमल्यास त्याच रात्रीं परत निघेन.

चहार्डींचें पत्र आलें. त्या दिवशीं तुला ताप होता म्हणे ! माय माझे ! !

तुझ्या पत्राच्या आनंदाच्या धुंदीत हें पत्र लांबलें.

श्री. महाराजांना सविनय प्रणाम.

कळावें हें आ.

धंतोली, नागपूर   तुझा

दि. २४-१२-५१   दादा

# शरीराचा ट्रस्ट : २६

माझे मनुताई,

काल रात्रीं सुमारें २ वाजतां परत आलों. आल्याबरोबर तुझें ता. १५ चें पत्र वाचलें. मायबाई, तूं वात्सल्यरसाचें पायस पाजल्येस. तुझ्या प्रकृतीबद्दल वाचून मनाची तळमळ किंचित शमली.

पोरी तूं आपल्या प्रकृतीविषयीं जर ताबडतोब कळवीत गेली नाहींस तर माझी कल्पनाशक्ति बेफाम धांवते आणि मग तिच्या ' चेष्टांना ' अन्त रहात नाहीं ! म्हणून मला न चुकतां लिहीत जा. त्यांत दोन गोष्टी साधतात. माझ्यावरील तुझ्या स्नेहाची उत्कटता व्यक्त होते आणि माझ्या कल्पनेला माझा छळ करायला वाव उरत नाहीं. मला अगदीं तपशीलवार माहिती मिळाली पाहिजे. तुझ्या बापाचा एवढा आळ तुला पुरवायलाच हवा, सोनू.

या जन्मीं तरी मी तुझ्यावर राग धरून बसेन हें शक्य नाहीं. मी तुझ्यावर चिडतों. नाहीं असें नाहीं. पण रागें भरणें म्हणजे राग धरणें नव्हे. माझ्याविषयींची तुझी माया आणि तुझ्याविषयींची माझी माया आटणें अशक्य आहे, हें देव बोलून चुकला ,आहे. देव फुकाचें बोल बोलत नसतो. आपण कांहीं केलें तरी आपल्याविषयींचा स्नेह कमी होण्याऐवजीं वाढतच जाईल हा भरंवसा तर जिवाचा आधारच आहे. तो मी कसा सुटूं देईन ?

मने, कसलीहि अडचण किंवा गरज भासली कीं मला अगदीं बिनदिक्कत कळवायला चुकूं नकोस. माझ्या ऐपतीचा किंवा सामर्थ्याचा विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं. प्रकृतीविषयीं कळवितांना आपण तसा विचार कोठें करतों. दुखलें–खुपलें कीं आपल्या प्रिय माणसाजवळ बोलून टाकतों. त्या बोलण्यानें देखील दुःख हलकें वाटतें. तसेंच इतर अडचणींचें व आपत्तींचेंहि आहे. तुझ्या बापाच्या स्नेहांत तुझ्यामुळेंच सामर्थ्यहि येईल.

तुला ता. १३ ला वर्ध्याहून व ता. १५ ला येथून अशीं दोन पत्रें पाठविलीं. ता. १५ ला मेलनें वर्ध्यापर्यंत जाऊन मोटारनें सोनेगांव स्टेशन व तेथून पायीं भांडखेडला गेलों. लग्नांत आशीर्वादात्मक रद्द भाषण केलें. रात्रीं १२ ला परत वर्धा. ता. १६ ला सकाळीं १० च्या गाडीनें निघून दुपारीं ३–३० ला बल्लारशाह. रात्रीं जाहीर भाषण वक्तृत्वपूर्ण आणि स्फूर्तिदायक आंबेडकरवादी अस्पृश्य मजुरांनीं चालविलेल्या वाचनालयाचा वार्षिकोत्सव होता. उतरण्याची व्यवस्था एका सुस्वभावी व आतिथ्यशील संघवाल्याकडे केली होती. अम्मळ अवघडल्यासारखें वाटलें. या मंडळींच्या गांधीद्वेषामुळें माझ्या मनांत त्यांच्याबद्दल विलक्षण अढी राहून गेली आहे. तिचें पर्यवसान व्यक्तिद्वेषांत होऊं नये म्हणून अशा प्रसंगाचा उपयोग आहे.

रात्रीं १२ ते १–३० एक तेलगू बोलपट पहात बसलों. रात्रीं २ ला गाडींत बसलों. इंटरच्या डब्यांत एकटाच होतों. इतरांची गैरसोय होऊं नये म्हणून दार मोकळें ठेवलें. दर स्टेशनवर कोणीतरी आंत येऊन दार मोकळें ठेऊन बाहेर निघून जात असे. हा क्रम रातभर अव्याहत चालू राहिला ! लग्नाचीं वऱ्हाडें होतीं. डोकावणारांपैकीं आंत येऊन बसलें मात्र कुणींच नाहीं.

ता. १७ ला सकाळीं वर्ध्याला आलों. तिसरे प्रहरीं आबासाहेबांच्या मोटारींतून वायफडला गेलों. लग्न म्हणजे एक राजकीय परिषदच समज. हें लग्न देशमुखांचें होतें. अगदीं भाटांपासून सगळा थाट होता ! लग्नाच्या विधीनें पावित्र्याचे व संयमाचे संस्कार सजवायचे असतात याचें भान कुणालाच नसतें ! खाणें–पिणें आणि कामवृत्तीचे देव्हारे माजविणें, हाच ठसा मनावर उमटतो.

मी अगदीं औपचारिक आशीर्वादाचें यांत्रिक भाषण केलें !

उत्तम जिन्नसांचीं अगदीं बेचव पक्वान्नें करण्यांत व चांगल्या अन्नाचें कदन्नांत रूपांतर करण्यांत भानखेडच्या मंडळीपेक्षां ही मंडळी कमी सराईत नव्हती.

रात्रीं १० नंतर आबासाहेबांच्या मोटारनें निघून रात्रीं २ ला येथें आलों. आल्याबरोबर तुझें पत्र वाचलें.

शरीर मात्र अगदीं उत्कृष्ट सहयोग देतें, त्याचे आभार मानावे तितके थोडेच ! त्याला मल-मूत्र, कफ-वात व पित्त, श्लेष्मा, घाण, यांचा कोथळा समजून मी त्याची निंदा व अनादर कधीं केला नाहीं. त्यांतून सुटण्याची फारशी उत्सुकताहि दाखविली नाहीं. त्यामुळें तें संप पुकारीत नाहीं किंवा सूडहि घेत नाहीं. मी त्याचें चोज नाहीं पुरवीत. त्याचे देव्हारेहि नाहीं माजवीत. पण इतरांचीं शरीरें मला सुन्दर, पवित्र व प्रिय वाटतात• म्हणून स्वतःच्या शरीराची ब्याद मला वाटत नाहीं. त्यामुळें तें माझ्याशीं सहकार्य करतें बिचारें. कित्येक व्यापारी इतरांपासून मुष्टिफंड, कटोरीफंड अगर चवलीफंड गोळा करून स्वतःच्या नांवानें धर्मादाय करतात. तसा मीं माझ्या शरीराचा ' ट्रस्ट 'हि केला नाहीं. माझी अशी वृत्ति असल्यामुळेंच तुझें शरीर तुझ्याशीं फितूरी करणार नाहीं असा भरवसा मला वाटतो.

पुण्याला व्यवस्था करणें कठीण नाहीं. शंकररावांजवळ बोललों नाहीं. स्वतः मीच व्यवस्था करीन म्हणतों. स्नेही व आतेष्ट देवाच्या कृपेनें सर्वत्र आहेत. पण त्यांच्याच कृपेमुळें एक निराळें वळण लावून गेलें. सगळ्यांनीं अगत्यानें व आग्रहानें अनेकदां बोलावलें. तरी प्रभुकृपेमुळें त्यांचीं आमंत्रणें स्वीकारण्याची गरज व बुद्धि कधीं उत्पन्न झाली नाहीं. त्यामुळें कोठेंहि जाऊन राहण्याचा प्रश्न आला म्हणजे किंचित घोंटाळतो. दुसरें कांहीं नाहीं. पण तुला जशी हवी असेल तशी व्यवस्था होईल. कशी पाहिजे तेवढें मात्र कळवून ठेव.

श्री. दादांची उम्मेदवार म्हणून Council साठीं निवड झाली. पहावें काय होतें तें. आण्णासाहेबांना कोणीच थारा दिला नाहीं. पण आकाशामध्यें अनंत आवकाश नसतो का ?

देवानें तुला निकोप वृत्ति दिली आहे. तशीच तो तुला निकोप प्रवृत्ति देवो. निदानपक्षीं प्रकृतीची जाणीव होणार नाहीं इतकी बिनतक्रारी तब्येत तरी देवो अशी प्रार्थना मी सतत करतों.

श्री. म्हैसूरकरांना प्रणाम. श्री. रामभाऊंना सप्रेम न०,

कळावें हे आ.

धनतोली, नागपूर
१८-३-१९५२

तुझा
दादा.

---

# माझा जीव कळवळला ! : २७

चि. सोनूताईला अनेक उत्तम आ०,

तुझें ता. १७ मार्चचें Express Delivery चें पत्र आज पोंचलें. मी परवांपासून वाट बघत होतों. तुला एक पत्र येथें आल्यानंतर लिहिलें आहे. तें पोंचेलच.

तुझ्या पत्रांतील शान्त ब्रह्मार्पण वृत्ति मला आवडली. वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ ! उद्वेग नको, निराशा नको. ईश्वर आशामय व आनंदमय आहे. तुझी ईश्वरनिष्ठा सार्थक व सफल होवो !

पुण्याविषयीं या पूर्वीच्या पत्रांत लिहिलेंच आहे. श्री. मोरेसाहेब व रामभाऊ यांनीं व्यवस्था केली तर आणखी काय हवें ? त्यांची कळकळ व कर्तबगारी या कामीं सार्थकी लागेल. अजून मी प्रयत्नाला लागलों नव्हतों. पन्हाळ्याला रहावें हें माझें मत मात्र कायम आहे. अर्थात वैद्यांचें मत अन्तिम प्रमाण.

आज सकाळीं बाबा गांधी यांचें लग्न झालें. 'औरसांपैकीं' आहे. आनंदराव आज अगदीं धोतर, कोशाचा कोट, काळी टोपी, अशा नवीन वेशांत होते. लग्नविधींत तीच जुन्या वळणाचीं मंगलाष्टकें होतीं. मुद्दाम तयार केलेलीं छापून वाटलीं होतीं. 'चंद्र चंद्रिका' 'तारका' प्रकाश व सूर्य, अशीं जुनीं उदाहरणें, उपमा व दाखले होते. नवीन आदर्श, नवीत संकेत आणि नवीन भावना यांचे ठसे पाडण्याचा कोठेंच प्रयत्न दिसून

आला नाहीं. संयम, पावित्र्य, आणि नवीन सामाजिक आदर्श यांचे संस्कार सजविण्याकरितां या मुलांनींहि अशा विधींचा व समारंभाचा उपयोग केला नाहींतर संपलेंच म्हणायचें !

हेमचंद्रराव खांडेकर दवाखान्यांत आहे. त्यांना अर्धांगवायूचा झटका येऊन गेला. माझी आठवण केली. काल जाऊन आलों. त्यांच्या जिवलग मित्रांनीं व हितचिंतकांनीं त्यापूर्वी येऊन त्यांच्या दुष्कृत्यांचा व फसवेगिरीचा पाढा वाचला. पण संकटामुळें दीन झालेल्या माणसाच्या पापांचा का कोठें विचार करायचा असतो ? खांडेकरांनीं विनाकारण माझें वैर आरंभिलें. सर्वांचाच विश्वास गमावून बसले. पण संकटापन्न माणसांच्या दोषांकडे पाहाणें अमानुषपणांचें वाटतें. तरी करूं काय ? मी पडलों कांचनहीन. आतां एक पै भत्तादेखील नाहीं. संकटग्रस्त माणसाचें फक्त संकट तेवढें मला दिसतें. धनुर्धराला फक्त त्याचें लक्ष्यतेवढें दिसतें. माझा जीव कळवळला माझ्या सामर्थ्य शून्यतेबद्दल वाईट वाटलें.

कोठेंहि थारा नसणारी माणसेंच आतां माझ्याकडे येतात. मला 'दरबार' गेल्यामुळें भकासवाणें वाटत नाहीं. 'दरबार'ची ब्यादहि वाटत नव्हती. आतां रिकामेंपणामुळें रितेपणाहि वाटत नाहीं. शून्यांत वेदनाच असतात असें नाहीं शून्यांत भावरूप निर्वाणहि असतें. पण अनन्यगतिक होऊन माणसे जेव्हां येतात, तेव्हां मात्र त्यांच्या विश्वासाची कदर वाटली तरी त्यांच्या नाइलाजाबद्दल खेद होतो.

सध्या ता. २६ पर्यंत येथेंच आहें. नंतर ता. २७ ते ३ वर्धा. सर्वोदयाच्या पुढील अंकाची तयारी करायची आहे. त्यानंतर हरद्वार कन्यागुरुकुलाच्या दीक्षान्त भाषणाचें आमंत्रण आहे. काशीच्या (सेवापुरीच्या) तारखांचा विरोध न आला तर हरिद्वारच्या गंगेत अंघोळ करून नंतर त्रिवेणीचें व भागिरथीचें स्नान करीन. तुला तसें कळवीन.

आणखी काय लिहूं ? सोने, तूं भगवत्पदीं लीन आहेस. तो तुझा रक्षक व पालक आहे. तुझा बाप आपली सगळी भावना एक करून नित्य त्याची विनवणी करीत असतो.

चन्दूराजांची आजपासून परीक्षा आहे. तिच्या नांवानें त्यांच्या कपाळाला आंढ्या आणि डोक्याला ठणका आहे. बबनराव गोरेगोमटे, गरगरीत वकील शोभतात. बाळु तेजी–मंदीच्या चक्रांत गरगरा फिरत आहे. बेबी सूतिकागृहाकडे डोळे लावून बसली आहे. लल्ला तिला छळत आहे.

श्री. म्हैसूरकरांना प्रणाम. श्री. रामभाऊंना सप्रेम न०.

कळावें हे आ.

धनतोली, नागपूर.
दि. २०–३–५२

तुझा
दादा

---

# तुझा आजार असाध्य नाहीं. : २८

चि. मनूला अनेक उत्तम आ०.

काल प्रयागाहून एक कार्ड तुला लिहिलें आहे. धर्म हा अर्थाचा दास आहे. झोळी ही पिशवीची वटीक आहे, याची साक्ष तीर्थक्षेत्रासारखी कोठेंच पटत नाहीं. पिशवी आणि बडगा यांची जोडगोळीहि अभेद्य आहे. आर्थिक उन्मादाची भांग त्रिवेणीच्या पाण्यांतहि मिसळलेली आहे ! कोण म्हणतो प्रयागला फक्त गंगा, यमुना व सरस्वती यांचाच संगम आहे म्हणून ? सरस्वती गुप्ततरी आहे. पण अर्थोन्मादाचीहि 'उन्मादिनी' अगदीं प्रकट आहे.

माझ्यावर निरपेक्ष उपकार करणारांमध्यें प्रयागचे एक ॲडव्होकेट श्री. विष्णुदत्त भार्गव यांची गणना होते. अतिथ्य आणि आत्य यांची साक्षात् प्रतिमा आहेत. तुमची आई व चि. प्रभा यांना तीन–तीनदां प्रयागाला न्यावें लागलें. त्यावेळीं प्रत्यक्ष परिचय नसतांना विष्णुदत्तांनीं कृपेचा वर्षाव केला. काल आपली मोटार बळजबरीनें दिली आणि गाडींत

रात्रीं करितां शिदोरी जातीनें आणून दिली. आबासाहेब म्हणाले, "तुमच्यावर ज्या माणसांचें प्रेम जडतें, तें एकदम उत्कट व निःसीमच जडतें !" सोनू, हा गुण त्या माणसांचा नाहीं का ? तो मला चिकटविणें गैर नाहीं कां ?

सुधा ( सुभद्राची मुलगी, सुप्रसिद्ध साहित्यिक प्रेमचंद यांची सून ) रॅाय हिच्याकडे अक्षरशः उभ्या उभ्या जाऊन आलों. धांवत येऊन कमरेला बिलगली. माझ्या छातीवर डोकें ठेवून लाडली. हें सारें अर्ध्या मिनिटांत झालें ! मी म्हटलें, जाऊं मी ? तोंड फुगवून म्हणाली, 'मला तुमच्याशीं बोलायचेंच नाहीं जा !' हे तिचे निरोपाचे शब्द ! पण त्यांत आशीर्वाद नाहीं का ?

काल संध्याकाळीं पॅसेंजरनें निघालों. श्रीपाद मुद्दाम बरोबर आला. गाडींत विनोबांचें महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांसमोरील अपूर्व मार्मिक भाषण तयार केलें महाराष्ट्रीय स्वभावाची विनोबांची मीमांसा नवीन आणि उद्बोधक असते.

बिहार, पंजाब, कलकत्ता व सांगली येथील निमंत्रणें आलीं. सगळीं शंकररावांकडे निवेदन केलीं. कारण, आतां भूदान–यज्ञाच्या कार्यक्रमांना पहिलें स्थान द्यावयाचें आहे. मी विनोबांचा कर्णा वाजवावा असें विनोबांचें म्हणणें. माझ्यावर त्यांचा विश्वास निदान माझ्या स्वतःवरील विश्वासापेक्षां तरी खात्रीनें जास्त आहे ! कृपा प्रभूची.

संमेलनांत भाषण करण्याचा आग्रह अध्यक्ष जाजूजी, चिटणिस शंकरराव, वल्लभस्वामी व कार्यकर्ते यांनीं केला. मीं मौन पाळलें. वाचाळाला आठवड्यांतून एक दिवस मौनव्रत पाळणें सोपें जातें. पण सभा पाहून त्याची जीभ खाजते. अशा वेळीं विवेकपूर्वक मौन राखणें हा वाक्संयम आहे. ईश्वरकृपेनें या पाळीला मला तो साधला.

कार्तिकी पर्यन्त तुला एकाच ठिकाणीं राहून उपचार करवून घेतले पाहिजेत असें म्हैसूरकरांचें म्हणणें असल्याचें महाराजांनीं सांगितलें, तूं तें

अमलांत आणावेंस असा माझा आग्रह आहे. मी शक्य तितका तुझ्या जवळ राहीन. अर्थात् भूदान यज्ञाचें काम संभाळून. मुली, शरीराचा मोह नको, मरणाचें भय नको हें मला कळतें आणि वळतेंहि. पण परवां पू. विनोबांनीं सांगितल्याप्रमाणें व्याधीवर उपचार करायचा तो प्रामाणिकपणाचा असावा लागतो. 'हा व्याधि बरा होणारच नाहीं, रोगी मरणार हें निश्चित' अशी ज्या वैद्याची प्रामाणिक समजूत असेल त्याच्या उपचारांत निष्ठेचें सामर्थ्य येत नाहीं. वैद्याचा विश्वास रोग्यावर नसला तरी औषधावर असावा लागतो. उपचाराबरोबरच कोणी मरणाची तयारी करीत नसतें ! म्हणून उपचार निष्ठापूर्वकच केला पाहिजे आणि ती निष्ठा वास्तविक असावी लागते. तशा निष्ठेनें मी तुला अनेकदां सांगितलें आहे कीं तुझा आजार असाध्य नाहीं. पू. विनोबांच्या वचनाचा आधार मिळाला आहे.

मला ३०।४ ला मुंबईला अमरहिंद मंडळांत भाषण करायचें आहे. त्यापूर्वी २५ नसीराबाद आणि २६ भुसावळ, ता. ५ किंवा ७ पर्यंत संमेलनाचा अहवाल श्रीपाद बरोबर राहून तयार करायचा आहे. श्रीपाद त्यावेळीं कोल्हापुरला राहिला. तूंहि जर तेथें असलीस तर तेथें राहूं नाहीं तर तूं जेथें असशील तेथें. नंतर सर्वोदय, भूदानयज्ञ आणि अवांतर कार्यक्रम अशीं तीन तंत्रें संभाळून मनूजवळ राहण्याची माझी स्वतःची तीव्र इच्छा मला भागवायची आहे. मने, भेटीला फार दिवस झाले आतां.

सुमारें दुपारीं १-३० ला इटारसीला पोंचूं. तेथून सायंकाळीं ६ ला निघून उद्यां पहांटें नागपुर, आबासाहेब व मी नागपुरला जाऊं,' श्रीपाद इटारसीहूनच पुण्याला जाईल. मंजुनाथम् भेटले होते. त्यावेळीं महाराज माझ्याकडेच बसले होते. मंजुनाथम्नीं तुझी चवकशी केली. निर्मल देशपांडे हिनेंहि केली, प्रेमाबाईनीं तर अगदीं तक्रार केली. जीव त्यांचा तुझ्यांत होता. आणखी–आणखी बाबा, मामा क्षीरसागर, भाऊ धर्माधिकारी, ध्वजाबाबू– कोणी विचारलें नाहीं तुझ्याबद्दल ?

श्री. म्हैसूरकरांना प्रणाम. चि. रामभाऊ व त्यांच्या पत्नी यांस आ

कळावें हे आ.

आगगाडी, तुझा

१८–४–५२ दादा

---

# विनोबांनी स्फूर्ति ओतली : २९

चि. मनूला अनेक उत्तम आ.

काल तिसरे प्रहरीं ४ ते ६ स्थानिक कार्यकर्त्यांशीं चर्चा झाली. नंतर शाळेंत अल्पोपहाराचा प्रसंग गुदरला. त्यांतहि उपहारापेक्षां चर्चेवर निर्वाह अधिक केला. रात्रीं ९-१५ ते १०-३० जाहिर भाषण झालें. जवळपासच्या खेड्यांतून वरीच मंडळीं आली होती. नशिराबाद जळगांव व भुसावळ या दोन मोठ्या गांवांमध्यें 'सँडविच' झालेलें आहे. तूं ज्या धाकट्या जळगांवांला गेलीं होतीस, तेथील लोकहि होते. अशीं भाषणें नेहमीं झालीं तर मतपरिवर्तन खात्रीनें होईल. भाषणानंतर अनेक उद्गारले. या उद्गारांचें महत्त्व आतां मला कळूं लागलें आहे त्यांची किंमत बेताचीच.

रात्रीं ११-३० तें १२-१५ बक्षिस समारंभ आणि माझें समारोपाचें भाषण. भाषण मीं ५।७ मिनिटेंच केलें. खेळ, संवाद, लेख, नाटकें, नृत्य, गायन इ० सांस्कृतिक कार्यक्रमांना एक विशिष्ट वळण व धोरण असलें पाहिजे आणि त्यांचा एक विशिष्ट होड असला पाहिजे, तरच त्यांना शिक्षणांत स्थान मिळूं शकेल हा मुद्दा सांगितला. रात्रीं २ पर्यंत शाळेचें नाटक बघण्याची शिक्षा भोगली. ही जर करमणूक असेल तर वेळ कशाला म्हणायचें हा प्रश्नच आहे. ही जर सदाभिरुची आणि संस्कृति असेल तर संपलेंच म्हणायचें ! हौशी व सुशिक्षित माणसांना धंदेवाईकांपेक्षां कला व संस्कृति यांचा उच्चांक गांठणें सुलभ वाटूं नये का ?

परवां आगगाडींत इंटर क्लासांत वाजवीपेक्षां व गरजेपेक्षां जास्त जागा मिळाली. थर्डक्लास पुष्कळ बरा. अशावेळीं थर्डक्लासचाच प्रवास अधिक सुखकर वाटतो. पण, परवां इंटरमध्यें फाजील जागा असूनहि झोंप बरी लागली. त्यामुळें कालचें जागरण फार जाणवलें नाहीं.

आज सकाळीं राष्ट्रभाषा समितीचा प्रमाणपत्र वितरण–विधि आहे. दुपारीं चर्चा आहे. रात्रीं भुसावळला भाषण आहे. आज रात्रीं जळगांवला भाषण करावें म्हणून काल देवकीनंदन (दोस्त) यांनीं मुद्दाम माणूस पाठविला होता. पण भुसावळचा कार्यक्रम पूर्वी ठरलेला होता. शिवरायांच्या पराक्रमाचें व गौरवाचें वर्णन करायला मी भाषाकौशल्य कोठून आणूं ? थोरांचें महात्म्य थोरांनींच वर्णावें ? मी तत्वनिरूपण करतों. पण विभूतींचें आख्यान मला नाहीं रंगवितां येत. तरी काळच्या संदेशांत प्रा. बाबूराव (व. र.) फाटकांनीं माझी आवस्तव स्तुति करूनच टाकली आहे. त्या स्तुतीचा शतांश तरी खरा करून दाखविण्याची जबाबदारी आतां माझ्या-वर आली आहे.

आजच रात्रीच्या मेलनें वर्ध्याला जाण्याचा इरादा आहे. काल चि. श्रीपादला पत्र लिहिलें. नानबांना परवां लिहीन. आतां सारें लक्ष मनूकडे लागलें आहे.

श्री. म्हैसूरकरांना प्रणाम. चि. रामभाऊ व त्यांच्या पत्नी यांस आ.

कळावें हे आ.

नसिराबाद, (पू. खा.) तुझा
दि. २६–४–५२ दादा

ता. क. आज सकाळीं नसिराबाद येथील राष्ट्रभाषा प्रचार समितीचें प्रमाणपत्र वितरण झालें. माझें हिन्दींत भाषण झालें. भाषा सोपी, रसाळ व समृद्ध साधली. पण वाणी व विचार यांचा नेहमींप्रमाणें प्रसन्न अस्खलित ओघ नव्हता. कालच्या जागरणाच्या परिणामामुळें जीभ व विचार अडखळत अडखळत, थबकत थबकत चालत होते. एकंदरींत विवेचन मुल-गामी पण सुबोध झालें.

सुमारें पंधरा–सोळा वर्षांपूर्वी जळगांवला मी हिन्दीची मौखिक परीक्षा घ्यायला गेलों असतां इंदिराबाई बापट यांनींहि माझ्यापुढें परीक्षा दिली होती. त्या प्रसंगाचा उल्लेख करून त्यांनीं मोठा हृदयंगम संदेश पाठविला. माझ्या लिखाणांत माझ्या व्यक्तित्वाचें जें अविष्करण होत तें त्यांना फार आवडलें असें त्यांचें म्हणणें. मला अल्पपरिचित आणि जगाला अल्पज्ञान व्यक्तींच्या अशा आशीर्वादरूप समर्थनानें माझ्या व्यक्तित्वाला मूठभर मांस येतें.

या सांस्कृतिक चळवळीचा व भाषणांचा पुष्कळ उपयोग आहे. पण परवां सेवापुरीला विनोबांनीं वातावरणांत नवीनच स्फूर्ति ओतली. स्वराज्याच्या चळवळीचे दिवस पुन्हां आठवले. या वयांतहि तें वारें कानांत शिरलें. पुन्हां रान उठविण्याची करामत माझ्या मुर्दाड वाणींत उत्पन्न होईल का मुली ? अशावेळीं बेटा, तूं दीप शिखेप्रमाणें सर्वत्र संचार करायला हवी होतीस ! माझी मिणमिण पणती कितीशी तेवणार ?

आतां तर जागरणाचा घशावर व आवाजावर आणि विचारांच्या गतीवरहि किंचित् परिणाम होतो. एकदां पुन्हां भरमसाट गतीनें कामाला लागलों म्हणजे बुरशी निघून जाईल. म्हैसूरकरांना म्हणावें माझ्या मनूला पुन्हां तुतारी फुंकायला लवकर तयार करून द्या. तुमचे अलम दुनियेवर अनंत उपकार होतील.

जेवण झाल्यानंतर थोडीशी डुलकी घेतल्यावर पुन्हां चर्चा ठेवली आहे. आणि नंतर ४ वाजतांच्या बसनें निघून भुसावळला जायचें आहे. अर्ध्याच तासाची अदल आहे. तेथें बेहरांकडे तुझ्यावांचून जाणार आहें. भगवंताची मर्जी !

भुसावळ : दुपारीं दोस्त देवकीनंदन, लेले, लेलेबाई, दुसऱ्या एक बाई, मुद्दाम जळगांवाहून गप्पाष्टकें करायला येऊन गेलीं. चांगल्या गंमतीच्या गप्पा झाल्या. ती मंडळी परत गेल्यावर राष्ट्रभाषा समितीच्या कार्यकर्त्यांशीं चर्चा झाली. ती आटपल्यावर बसनें ५-५ ला निघून सुमारें ५-३० ला भुसावळला आलों. तेथून हें पत्र टपालांत टाकत आहें.

दि. २६–४–५२ दादा

# मातृत्व चवताळलें ! : ३०

चि. मनूला अनेक उत्तम आ.

कालचें पत्र पोंचेलच. रामभाऊंच्या कृपेनें काल पुण्याहून नागपूरच्या डब्यांत वरच्या बाकांवर झोपण्यापुरती जागा मिळाली. प्रवास अगदीं सुखाचा झाला. जळगांवपासून अकोल्यापर्यंत जागाच जागा मिळाली. पैसे कमी पडले आणि त्रास मुळींच झाला नाहीं. याचें सगळें श्रेय राम-भाऊंनाच आहे !

आज १०-३० ला सकाळीं अकोला. ती. स्व. बापू स्वतः स्टेशनवर आले होते. श्री भाऊसा. देशमुख यांचा मुलगा व भाचाहि आला होता. देशमुखांकडे सामान टाकलें. बापूंची व विशेष करून सौ. अक्कांची इच्छा मीं घरींच उतरावें अशी होती. पण बापूंनीं देशमुखांच्या आग्रहाला मान दिला. तेहि देशमुखाकडे माझ्याबरोबर म्हणून जेवायला आले. सौ. अक्का मात्र म्हणाल्या, दादा मीं तुमच्यावर रागावल्यें आहे. घरीं कां हो नाहीं आलां तुम्हीं ? मीं म्हणालों तुमचा राग मला शिरोधार्य आहे. मी तो पदरांत बांधून घेतों ! मनांत म्हटलें, हा राग आशीर्वादात्मक आहे ! त्या रागांत केवढें अगत्य आहे.

तुझें पत्र बापूंना स्टेशनवरच दिलें होतें. जेवण आटपतांच आक्का कडे गेलों. फार प्रेमानें बोलल्या. माझ्या भेटीमुळें त्यांना व मला दोघां-नाहि आनंद झाला. मीं संध्याकाळपर्यंत रहावें म्हणून अक्कांनीं आग्रह केला. मी राहूं शकलों नाहीं. पण तो आग्रह मला मोठा गौरवात्मक वाटला.

तुला तुझ्या मर्जीविरुद्ध ठेवून घेण्यांत येत असून, प्रकृति जास्त बिघ-डण्याच्या भितीमुळें तूं हा सासूरवास सहन करीत आहेस असा अक्कांचा गैरसमज झाला होता. त्यांचें मातृत्व यामुळें चवताळलें होतें. ‘ माझ्या मुलीला धाक दाखवून बळजबरीनें जरबेंत ठेवण्याची कुणाची प्राज्ञा आहे. ’ अशा वृत्तींत त्या होत्या. मला म्हणाल्या, ‘ दादा, तुम्हीं गेलांत म्हणून माझा

जीव भांड्यांत पडला. एरव्हीं मी स्वतः जाऊन मुलीला सोडवून आणणार होतें. तुम्हीं गेल्यामुळें मी निर्धास्त झालें! माझ्या मुलीवर कुणी अम्मल गाजवूं लागलें तर मला खपणार नाहीं!

मातेचें तें प्रखर वात्सल्य पाहून हृदय भरून आलें. तुझ्या पत्रानें अर्धें अधिक काम झालेंच होतें. मीं तुझ्या पुरतें आश्वासन दिलें. विमल मनाच्या कमकुवतपणामुळें कुणाच्याहि भीतीला भीक घालील हें शक्य नाहीं. आजहि तिच्या इच्छेविरुद्ध तिला ठेवून घेण्याची शक्ति कुणाचीहि नाहीं. तुम्ही किंवा बापू यांच्यापैकीं कुणीहि त्रास, करून घेण्याचें कारण नाहीं. विमलला ती जेथें असेल तेथून घेऊन यायला मीं तयार आहें. तिचें किंवा तुमचें एक कार्ड आलें म्हणजे पुरे. तूं उन्हाळ्यांत आली नाहींस हें ठीक झालें असें त्यांसहि वाटतें. जूनमध्यें तुझ्या येण्याची वाट बघत आहेत. अक्कांचा सत्यनारायण सारखा लांबणीवर पडत आहे. माझ्या भेटीनें जर इतका आनंद वाटला, तर तुझ्या भेटीनें किती वाटेल! मी त्यांना सारी हकीकत सांगितली. अक्का तुझ्यावर प्रसन्न आहेत.

बोलणें संपतांच मी आणलेल्या आंब्याच्या फोडी मी बापूंबरोबर खाल्ल्या. आंबे खातांना पोरीला तुमची भारी आठवण होते म्हणून बापूंना मी सांगितलें. त्यांचे डोळे डबडबले! नंतर गोड लस्सी प्यालों.

दुपारीं १-३० च्या पॅसेंजरनें निघालों. तिकिटाच्या खिडकीपुढें लांबच लांब ओळ लागली होती. तिकीट शेवटपर्यंत आलें नाहीं. तसाच बसलों. गार्डला कळविलें.

आज संध्याकाळीं वर्ध्याला पोंचेन. तेथें नागपुरचा निरोप येईल. त्याप्रमाणें उद्यां अगोदर माधान–चिखलदरा कीं आधीं नागपूर याचा निर्णय करीन. चिखलदऱ्याला जरूर जाईन. तुकडोजी महाराजांची प्रकृति बिघडल्याचा परिणाम अक्का–बापूंच्या मनावरहि प्रतिकूल झाला.

पुण्याला स्टेशनवर अगदीं अचानकपणें कन्हैयालाल बेहरा भेटले.

श्री. नानासा० बरव्यांच्या पत्रांचें उत्तर धाडलें? आतां वर्तमानपत्राकडे पाठवून शिळ्या कढीला ऊत आणण्यांत स्वास्थ्य नाहीं.

श्री. म्हैसूरकर महाराजांना प्रणाम. चि. रामभाऊ, सौ. शांता व प्रभाकर यांस आ. श्री. बाबांना प्रेमपूर्वक न.

कळावें हे आ.

नागपूर पॅसेंजर
दि. २२-५-५२

तुझा
दादा

---

# दुधापेक्षां चहांत माणुसकी ! : ३१

माझे मनू,

परवां सकाळीं ९ च्या पॅसेंजरनें वर्ध्याहून निघून दुपारीं १ ला अमरावतीला पोंचलों. माधान करितां सायंकाळीं ५ पर्यंत बस नव्हती. म्हणून माधान ऐवजीं अचलपुरला गेलों. अगदीं अचानक बापूसा. देशमुखांकडे जाऊन पोंचलों. बापूसा. व त्यांच्या पत्नी गंगूबाई मला फार 'मानतात.' माझ्यावर प्रेमहि फार करतात. त्यांचा आनंद काय विचारतां ?

श्री. तुकडोजी महाराज कुठल्याशा लग्नाकरिता अमरावतीला गेले होते. तेथून बोके यांच्या इस्टेटीचें व्यवस्थित वांटप करून देण्याकरितां दोन दिवस वरखेडला गेले होते. ते ता. २२ लाच रात्रीं अमरावतीहून अचलपूरला गेले असल्याचें मला अमरावतीला समजलें. ता. २३ ला सकाळीं ते चिखलदऱ्याला गेल्याचें अचलपुरला समजलें. तेव्हां आधीं चिखलदरा उरकून नंतर माधानला जावें असें ठरविलें.

माझ्या योजनेप्रमाणें मी बसनें चिखलदऱ्याला जाऊन महाराजांना भेटून बसनेंच परत येणार होतों. पण बापूसा०च्या मनांत माझ्या थोरपणाविषयीं कांहीं अवास्तव कल्पना आहेत. माझें शरीर साध्या रोजच्या वापराच्या कपड्यासारखें नसून मुकट्यासारखें आहे असा त्यांनीं स्वतःचा समज करून घेतला आहे. त्यामुळें मला बसनें जाऊं देणें त्यांना मोठें अवघड वाटलें. पुष्कळ धडपड करून त्यांनीं एक टूरर गाडी मिळविली. काल ऐन दुपारीं

१२–३० ला निघून आम्हीं करजगांवला गेलों. माध्यान्हाचे वेळीं अवचित आलेले पाहुणे पाहून सरस्वतीला आश्चर्ययुक्त आनंद झाला. सोनारांना बरोबर घेऊन आम्हीं परत परतवाड्याला आलों आणि सुमारें ३ ला चिखलदऱ्याला पोंचलों. महाराज वाटच बघत होते. तुझें पत्र त्यांना पोंचलें होतें. तुझा बोल अशारीतीनें माझ्याकडून खरा ठरावा ही ईश्वरी योजनाच दिसते.

महाराजांची तब्येत बिघडलेली किंवा खालावलेली नाहीं. सेवापुरी पेक्षां ते पुष्कळ बरे दिसले. मध्यें त्या चुर्णामुळें त्यांना पोटदुखीचा भयंकर त्रास झाला. म्हणून त्यांनीं काताबून पत्र लिहिलें. त्यानंतर ते अमरावती वरखेडची खेप करून आले. कांहीं एक त्रास झाला नाहीं.पोटांत दुखत नाहीं, खुपत नाहीं, तरतरीहि वाटते. त्यांच्या प्रकृतींत काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं. त्यांनीं या उन्हाळ्यांत खालीं मुळींच जातां कामा नये असें मीं बजावलें. त्यांनीं कबूल केलें. फक्त ३० ला माधानला येऊन जातील. येथेंहि नुसतें भाषणच करून परत जातील. इतर कोठें कार्यक्रम घेणार नाहींत. चिखलदऱ्याला रोज फिरायला जातात. पथ्य अगदीं व्यवस्थित-पणें चालू आहे. तेव्हां श्री. म्हैसूरकर महाराजांनीं किंवा तूं चिंता करण्याचें कारण नाहीं. श्री. तुकडोजी महाराजांची प्रकृति सुधारणेच्या मार्गावरच आहे.

इकडे आल्यापासून दोनदां अंघोळ करावी लागली तें पथ्यावर पडलें पण दोनदांचें जेवण मात्र नडलें. त्यामुळें काल दुपारचें जेवण बाद करून शिदोरी घेऊनच चिखलदऱ्याला गेलों. तेथें महाराजांच्या बिऱ्हाडा आम्हीं शिदोरी खाल्ली! मांडवगणे व कोडापे स्वयंपाक तयार करविण्याच्या पक्षाचे होते. पण त्यांनीं कृपावंत होऊन आमचें म्हणणें ऐकलें. महाराजांच्या गाडींतून चिखलदऱ्यांत अर्धातास फेरफटकाहि केला. संध्याकाळीं ६ ला निघून ७-३० ला परत अचलपुरला आलों.

महाराजांनीं व इतरांनीं थांबण्याचा आग्रह केला. महाराज म्हणाले, 'पन्हाळ्याला १८ दिवस राहिला, येथें १८ तास तर खरे! मीं म्हटलें तेथें पोटची पोरे होती! त्यावर म्हणाले, मी पोटचा पोरगा नाहीं कां!– मी

काय उत्तर देणार? देवानें इतकें 'अमितोदर' मला कोठें दिलें आहे? मी माझी पायरी ओळखतों. बेडकासारखा फुगून फुटूं इच्छित नाहीं. गेल्याबरोबर व निरोप घेतांना नम्रपणें त्यांच्या पाया पडून मोकळा झालों! देवाजवळ रक्षण मागितलें.

बापू सा॰नीं गाडी मिळविली म्हणून काल मनाप्रमाणें कार्यक्रम साधला. पण माझ्यासाठीं इतकी व्यवस्था कोणी केली म्हणजे ती माझ्या शरिरापेक्षां जास्त किंमतीची झाली असें मला मला वाटत रहातें. माझें शरीर मला प्रिय आहे. मी त्याची मिजासहि सांभाळतों. पण माझी व माझ्या शरिराची वस्तुनिष्ठ किंमतहि मला कळते. त्यामुळें कुणी जास्त व्यवस्था केली म्हणजे आपण आपल्या योग्यतेपेक्षां जास्त घेतों अशी टोंचणी मनाला लागून रहाते! म्हणून बसनेंच जाण्याचा बेत ठरविला होता. पण बापूसा॰, गंगूताई, यांचा माझ्यावर भलताच लोभ आहे.

आज पहांटे ३-३० ला उठलों. ४-३० ला बैलगाडीनें निघून सकाळीं ७-३० ला येथें पोंचलों. १४-१५ मैल यायला साडेतीन तास लागले. पण अगदीं आरामशिर आलों! गंगूताई व इंदु येणार होत्या. पण आयत्या-वेळीं त्यांचा बेत बदलला.

मी मुद्दाम महाराजांच्या भेटीसाठीं चिखलदऱ्याला जायला आलों याचें सगळ्यांना मोठें नवल वाटलें. जवळचीं माणसेंहि मला अन्याय कर-तात. माझ्या जीवनाचें स्थिरतत्व मैत्री आहे. अमैत्री किंवा अनास्था अगर उदासीनता हें कांहीं जीवनाचें शाश्वत तत्व असूं शकते का? मी राजकार-णांत देखील मित्रभावाच्या विकासाच्या दृष्टीनें नाहीं भांबावलों? बोवा, महाराज, महंत, यांच्यावर माझी श्रद्धा नाहीं हें अगदीं खरें आहे. पण मैत्रीला कधीं कशाचें वावडें असतें कां? मी मंडळींना तसें सांगितलें. त्यांना तसें सांगितलें. त्यांना वाटलें कीं मी आतां बोवांच्या नादीं लागलों म्हणून

एकंदरींत प्रवास सुखाचा होत आहे. उन्हाळ्याला इलाज नाहीं, परवां अचलपुरला येतांना बसमध्यें थोडें जपून बसावें लागलें. पण तूं शिक-

विलेला आसनांचा धडा मात्र कोठेंच गिरविण्याची पाळी आली नाहीं. उद्यां रात्रीं येथून अमरावतीला जाईन. तेथून रात्रीं १२च्या गाडीनें नागपूर. प्रभाताई मोझरी–वरखेडला गेली होती म्हणून महाराजांनीं सांगितलें. तिला कार्ड तर पाठविलें आहे. देव जाणें कशी काय भेट होते तें !

श्री. भाऊ महाजन पुण्याला म्हणाले, "तुम्ही तुमच्या पत्रांचें पुस्तक प्रकाशित करूं द्या" मीं कबूल केलें. तुलाहि तसें समक्ष सांगितलें होतेंच.

योगायोग असा कीं आज ताराबाईहि येथें आहे. पू० बाबू काकांनीं परवांच तिला मीं येथें येणार असल्याचें कळविलें. तिच्यावांचून मला येथें गोडी वाटली नसती. ती कालच येऊन दाखल झाली. सोनार–सरस्वतीहि आज संध्याकाळीं येतील. ताराबाईंनीं पहिलाच प्रश्न केला, 'विमलताई कशा आहेत?'

मनू, तुझी अगदीं अक्षरशः सत्त्वपरीक्षा होत आहे. मी तर खात्रीनें टिकलों नसतों. आतां एवढें तरी कर. कुठलाहि ताण पडूं देऊं नकोस. बेटा, तुझें शरीर त्रिभुवनाच्या मोलाचें आहे. पण तुझें व्यक्तित्व–म्हणजेच तुझें सत्त्व–तुझ्याहि शरीरापेक्षां अनंतपटीनें मोलाचें आहे. तें जतन करणें आमचें काम आहे. कसलेंहि दडपण किंवा ताण वाटूं लागला कीं एका ओळीचें चिठोरें लिहून पाठव. तेवढें पुरें. एरव्हीं मी अल्पशक्ति असलों, तरी तुझा बाप या नात्यानें देव माझ्याहि ठिकाणीं सामर्थ्य निर्माण करील.

येथें ताराबाई, शान्ताबाई, अत्रेकाका व गुरुदेव म्हणजे दादासाहेब पंडित आहेत. दादासाहेबांना मी 'सत्पुरुष' मानतों. अशीं माणसें विरळा. प्रातर्वन्दनीय ! आचार, उच्चार, विचार, सारेंच शुद्ध ! प्रांजळता व सोज्वळता यांची प्रत्यक्ष मूर्तीच. अत्रेकाका, व शान्ताबाई यांचा तर कायाकल्पच झाला आहे. अशा माणसांच्या जिवाचें समाजाला खत मिळत असतें, तेव्हां त्याचा कस वाढतो.

येथें चहाला मज्जाव असला तरी मला मिळतो. काल महाराजांनीं डाळिंबें, मोसंबी दिलीं. मी वर्षांतून फार तर दोन चारदां खात असेन. वर दूध देऊं लागले. मीं म्हटलें, या वस्तु माणसाच्या खाण्याच्या नाहींत. माणूस

प्राकृत नाहीं. तो वस्तूवर संस्कार करून खातो. आम्हीं पडलों माणसें. आम्हाला तयार केलेलें अन्न चालतें ! म्हणून दुधापेक्षां चहांत माणुसका ! तोंडें नकोस वांकडी करूं !

श्री. रामभाऊंचें ठीक चाललें आहेना ? श्री. म्हैसूरकर महाराजांचा कार्यक्रम यथापूर्व चालू असेल ? शान्ताबाई खूष ? आणि प्रभाकर ? माझी मैत्री मानवली त्याला ?

श्री. महाराजांना प्रणाम. चि. प्रभाकर व रामभाऊ,शान्ताबाई यांस आ.

कळावें हे आ.

माधान तुझा
२५–५–५२ दादा

ता. क. आज सायंकाळीं ४–१५ ते ५–१५ भाषण केलें. रात्रीं ९–३० नंतर पुन्हां. उद्यां आणखी. येथें कोणालाहि माझें म्हणणें विचित्र वाटलें नाहीं.

---

# आमचे अकलेचे थेर ! : ३२

चि. मनूला अनेक उत्तम आ.

काल तुला एक पत्र पाठविलें. सोलडपुरला पाऊणशें वर्षांचा जो व्यक्तित्ववान् म्हातारा पाटील भेटला, तो म्हणजे एक मनोरंजक वल्ली किंवा नुसतेंच एक गबर धेंड नव्हतें. त्यानें आमच्या कामांत बरेंच लक्ष घालून पुढाकारहि घेतला. त्याच्यामुळेंच तेथें थोडेसें काम झालें.

तेथून तिसरें प्रहरीं, पण भर उन्हांतच पुन्हां रवाना झालों. दादाभाईंना थकवा म्हणून माहित नाहीं. महेशबाबूंना आपली अब्रू संभाळायची होती. मगनबाबू कोठारी व गोपीकिसन जोशी मागें राहूं शकत नव्हते. म्हणून आमचें संपूर्ण टोळकें निघालें. पाऊल वाटेनेंच चालत होतों. त्यामुळें धुळीचा त्रास झाला नाहीं.

सुमारें दोन सव्वादोन तासानंतर रन्हाईला पोंचलों. श्री. ठाकुरलाल पटेल यांच्या भव्य वाड्यांत उतरलों. अनेक वर्षांनंतर दहा दहा घोडे बाळगणारा–आणि तेहि चांगल्यापैकीं व चांगल्या स्थितींत–हौशी माणूस पाहिला. इतके घोडे पाहून बाबांची (भालबांची) आठवण आल्याचांचून कशी राहील ?

पोंचल्याबरोबर सभा केली. महेशबाबू, दादाभाई व मी बोललों. रात्रीं हरद्याला जाऊन भाषण करायचें होतें. तेथून पुन्हां रात्रीं रन्हाईला परत यायचें होतें. म्हणून हरद्याला मोटारनेंच जाणें–येणें करायचें ठरलें. पण हरद्याची मोटार आली ती सुमारें ९–४५ ला रात्रीं आली. एक मोठी जीपवजा लष्करी अवजारें वाहून नेण्याची गाडी होती. टांग्याची घोड्याप्रमाणें आडत–आडत, थबकत–थबकत, हबकत–हबकत चालण्याची तिला खोड जडलेली होती. त्यामुळें ९ ची सभा जाहीर झालेली असूनहि मोटार भवानीला माझ्यापर्यंत पोंचायला ९–४५ झाले. १० ला रवाना झालों. मोटारभवानीनें पुन्हां आपले तेच रंगढंग सुरू केले. सभेच्या ठिकाणापासून एका फर्लांगावर तर तिनें बैठकच मारली ! आम्हीं सभास्थानीं पोंचलों तेव्हां दहा मिनिटांपूर्वीच लोक कंटाळून घरोघर निघून गेलेले होते. रात्रीं ११ ला सभा रीतसर बरखास्त करून भाषण न करतांच परतलों. रागावलेल्या दाईप्रमाणें मोटारनें आमची बेसुमार आदळआपट केली ! उचलबांगडी करून शाळेंत नेतांना उनाड मुलाचीहि कोणी इतकी बेगुमानपणानें आदळआपट केली नसेल कधीं ! दमलों–भागलों होतों. तशाहि स्थितींत डुलकी घेण्याचा स्थितप्रज्ञाप्रमाणें आव आणला. इतक्यांत भुंवईच्यावर कपाळांत धाडकन् झाडाच्या फांदीचा एक भक्कम सोटा जोरानें बसला ! लाठीमाराचा अनुभव मला आला नव्हता. ती उणीव भरून निघाली. तरी पण मी आपल्या चित्ताची साम्यावस्था ढळूं दिली नाहीं !

अगदीं टेकीला आलों होतों. रात्रीं १२ ला परत पोंचलों. तो पाटलांच्या वाड्यांत ' रामायण ' चाललें होतें. शिष्टाचाराची चाड दाखविण्याकरितां म्हणून बसलों. आज पहांटे ४ ला निघायचें होतें. काल रात्रीं अंथरुणावर हाडें टाकायला १ वाजला.

पूर्व योजनेप्रमाणें पहांटे उठलों. प्रार्थनादि आटपायला ५-२० झाले. मी चांगला पट्टीचा चालणारा आहे. पण कालपासून पावलें, कंबरडें, पाय, सारेंच आंबलें होतें. चालणें जिवावर आलें होतें. पण मन शरीराची कुरकूर चालू द्यायला तयार नव्हतें. निघालों. आम्ही कांहीं ज्ञानदेवासारखे नम्र नाहीं. ज्ञानदेवांना ' आचार्यांसी वाट पुसत ' पाऊल टाकण्यांत कमीपणा वाटला नाहीं. पण आम्हीं पडलों स्वयंप्रज्ञ, आम्हांला आपल्या मौलिकतेचा केवढा ताटा! आम्हांला 'वाट्याडया' कसा खपेल? नवीन वाटा पाडणें हें आमचें ब्रीद. म्हणून आम्हीं कजारद्याला जायला म्हणून निघालों आणि थेट विरुद्ध दिशेकडे वळलों! आम्हीं आपल्या प्रापंचिक व सार्वजनिक व्यवहारांत अनेकदां असे ' अकलेचे थेर ' केलेले आहेत!

माझ्या आणि विनोबांच्या भूदान यात्रेंत इतका फरक नसला तर विनोबा विनोबा कसले आणि मी मी कसला! दरिद्रनारायणाच्या अश्वमेधाचा घोडा आणि अश्वमेधांतील भारवाहू गाढवें व ' लदू तट्टें ' यांच्यांत कांहींच कां फरक नसेल? विनोबांच्या मानानें आमचे खूर आणि कान बरेच लांब पडतात.

उद्योगांतून फलनिष्पत्ति व्हायला हिरीरीचा त्वेष तरी हवा किंवा धर्माचरणाची सात्त्विक तेजस्वी तळमळ तरी हवी. एरव्हीं निष्काम कर्माचें पर्यवसान निष्फळ कष्टांत होण्याचा संभव फार. माझ्या अंगीं तपाचें तेजहि नाहीं आणि शर्यतीच्या घोड्याचा तावहि नाहीं. त्यामुळें माझ्या अहंकाराचा फुगा पार फुटला. कल्याणकामना आणि निःस्पृहता असली म्हणजे देव अंत पहात नाहीं हा अनुभव मात्र आला. तो धारिष्ट्य पहातो. त्याच्या कसोटींतहि कृपाच असते.

आज सकाळीं आम्हीं दादाभाईंच्या जन्मभूमीच्या परिसरांत प्रवेश केला. त्यांच्याविषयींची लोकांची ममता व श्रद्धा पाहून माझें हृदय भरून आलें. ' गांवचा योगी जोगडा, परगांवचा तो सिद्ध ' ही म्हण खोटी ठरली. अयोध्येला परत आलेल्या रामाप्रमाणें लोकांनीं त्यांचें स्वागत केलें. कणारधाला एक गरीब शेतकरी म्हणाला, ' आपण भिक्षापात्र घेऊन घेऊन आला आणि माझ्याजवळ त्यांत घालायला भरपूर मातीहि नसावीना?

त्यानें सद्‌गदित होऊन एक एकर जमीन आमच्या पदरांत टाकली. त्याच्या दानामागें भावनेचें वैभव होतें. त्या दानाची पुण्यकारकता व कल्याणकारिता शतपटीनें वाढली.

तो शुभशकुन ठरला ! कणारद्याहून ८–३० ला सकाळीं निघून १० ला गहाळला आलों. कणारद्याला दादाभाईंनीं जें भाषण केलें तें ऐकून हृदय भरून आलें. अंतःकरणाच्या गाभाऱ्यांतून निघालेले असले बोल ऐकले म्हणजे वक्तृत्वकला बेगडी व नकली वाटते. मुद्दे, दाखले, दृष्टान्त आणि अंतःकरणाला जाऊन भिडणारी भाषा हातांत हात घालून चालत होती. गहाळला ११ ते १२–३० सभा झाली. मुख्य भाषण मी केलें.

मोहनपूर : गहाळहून तिसरें प्रहरीं ४–१५ ला निघून येथें आलों. हा गांव म्हणजे दादाभाईंची जन्मभूमि. एकूण लोकसंख्या ३००. त्यापैकीं १५० स्त्री–पुरुष–मुलें अर्धा मैल सामोरीं आलीं. स्वागताला सगळा गांव गोळा झाला. दादाभाईंच्या ऋजुतेचा, त्यागाचा व तपाचा हा महिमा आहे. माझ्या लौकिकाच्या मानानें तप व त्याग कमी पडतो. त्यामुळें फल-निष्पत्ति बेताचीच होते. पण एका गोष्टीचा माल प्रत्यय येतो. कुठलाहि शुभारंभ फुकट जात नाहीं. ' नेहाभिक्रम नाशोऽस्ति ! ' आमच्या वाणींत पुण्यशक्ति असो वा नसो. पण श्रीमंतांच्या व मातबरांच्या हृदयांतील देव जागा न झाला तरी वरून ईश्वरी संकेताची मेघगर्जना आणि खालून भूमातेचा गगनभेदी हंबरडा हे दोन्ही कल्याणकारी ध्वनि एकवटून वाता-वरण दुमदुमून टाकतील !

रोलगांव : ३१–५–५२

मोहनपुरला सभा मोठी प्रचंड झाली. अक्षरशः सगळा गांव जमला होता. दादाभाई विषयींची माया व आदर पाहून मलाहि समाधान वाटलें. भाषण रंगलें. सकाळपासूनच दान मिळायला आरंभ झालेला होता.

झोंपायला १२–३० झाले. आज ४–३० ला पहांटे उठून ५–३० ला निघालों. वाटेंत महेंदगांवला तासभर थांबलों. दादाभाईंचें भाषण झालें. ९ वाजतां सिरालीला पोंचलों. ताबडतोब शाळेंत सभा झाली. दादाभाईंचें

व माझें भाषण झालें. सिराली हें जुन्या मकडाई संस्थानचें प्रमुख गांव, राजधानी नव्हे. लहानपणीं मी १५–१६ वर्षांचा असतांना मकडाईच्या दिवाणसाहेबांचीं मुलें, माझ्या जिवाभावाचे सवंगडी, मकडाईला व सिरालीला रहात. माचक नांवाची बरीच मोठी नदी सरहद्दीवर आहे. मी फारच क्वचित या भागांत आलों. पण आलों त्यावेळीं आपल्या जिगरवान दोस्तांबरोबर जंगलांतून घोड्यावरून रपेट करून मोरांचा नाच पाहिल्याचें आठवतें. स्पष्ट आठवण मात्र नाहीं. सिरालीहून तिसरे प्रहरीं ४–२० ला निघून ५–३५ ला डगांव मटजीला आलों. हा गांव म्हणजे पटवर्धन स्कूलचे माजी हे. मा रघुनाथराव डगांवकर व नागपुरचे सर्कल इन्स्पेक्टर पोलिस, सोनुभय्या डगांवकर, यांचा गांव सोनूभय्यांनीं जमीन दिली. गांवांत ब्राह्मणांचीं चार, हरिजनांचीं चार व मुसलमानांचीं दोनतीन इतकींच घरें आहेत. सारा गांव गोळा झाला. मीं सुटसुटीत पण परिणामकारक भाषण केलें.

डगांवहून ६-४५ ला निघून ७-३५ ला रोलगांवला आलों. आल्याबरोबर सभा व भाषण. काल सकाळपासून लोक गांवाच्या सीमेवर मोठ्या प्रमाणांत सामोरे येऊं लागले. विनोबांच्या पवित्र उद्घोषांनीं आतां वातावरण दुमदुमूं लागलें आहे ! हें काम निव्वळ रान उठविण्याचें नाहीं. पुण्य भावनेच्या सुवासानें सारें वातावरण सुगंधित करण्याचें आहे. तो परिमल आधीं स्वतांच्या वृत्तीत व व्यक्तित्वांत मुरला पाहिजे.

कमताढा : १-६-५२

नित्याप्रमाणें काल रात्रीं १२ च्या सुमाराला झोंपलों. दुपारीं सिरालीला कान गाद्यांच्या जोडीच्या पोळ्या खाल्ल्या. काल रात्रीं ११ ला हंसक्षीरन्यायाप्रमाणें डाळ व पाणी वगवगळें मिळालें. डाळ अगदींच शिजून जाऊं नये याचा काळजी घेण्यांत आली होती. पोळ्या मात्र उत्कृष्ट होत्या.

आज पहांटे ५-३० ला निघून ७-३० येथें आलों. हा दादाभाईच्या पुतण्याचा गांव आहे. दुपारीं येथें मुक्काम राहील. तिसरे प्रहरीं निघून मोहाळला मुक्काम करूं.

सोनू, तुला सोडून आतां १०।११ दिवस लोटले. तूं कशी आहेस आणि कोठें आहेस याबद्दल कांहींच समजलें नाहीं. हरद्याच्या पत्त्यावर एक चार ओळींचें कार्ड प्रभाकरकडून लिहवून पाठविलें असत्येंस तर ? पन्हाळ्याला पाऊस झाला असल्यास तूं कदाचित् खालीं आली असशील. मी तुझ्याकडून पत्र येण्याची मोठ्या उत्कंठेनें वाट बघत आहे.

श्री. म्हैसूरकर महाराजांना प्रणाम. चि. रामभाऊ, शान्ताबाई, प्रभाकर व दत्ता यांस आ.

गाहळ तुझा

दि. ३०-५-५२ दादा

ता. क. मी ता. ६ पर्यंत इकडे आहे. ता. ६ किंवा ८ ला नागपूर. त्यानंतर सर्वोदयाकरितां वर्धा.

---

# मी काय असा विनोबा लागून गेलों आहे? ३३

चि० मनूला अनेक उत्तम आ०

परवां राळेगांवला रात्रीं चांगली सभा झाली. चालतांना चिंतन व मनन चांगलें साधतें. त्यामुळें दरेक सभेंत एकादा तरी नवीन मुद्दा सुचतोच. विधायक कल्याण प्रवृत्तीचा सुवास चहूंकडे पसरतो.

काल पहांटे राळेगांवहून निघून कमताडयाला आलों. दादाभाईच्या पुतण्याचा गांव हा. आल्याबरोबर सभा झाली. नेहमींप्रमाणें दादाभाईचें सात्विक भावना प्रवर्तक भाषण झालें. माझें भाषण लोकांचीं मनें गदगदा हलविणारें झालें. कमतडयाहून तिसरे प्रहरीं ४-३० ला निघालों. आम्हीं आपल्या ब्रीदाप्रमाणें वाट चुकत व वाट काढीत सुमारें ६ ला मांदला येथें पोंचलों. फक्त २०-२५ मिनिटें थांबून निघालों. ७-३० ला मुहाळला पोंचलों. येथें सयानी नदी आहे. माचक व सयानी या दोन नद्या या भागांत आहेत. माचक तर आम्हीं चार पांचदां ओलांडली. तरी स्नानाचा योग आला नाहीं. पाण्याची टंचाईहि या भागांत फार जाणवली.

काल मात्र सयानी नदीवर अंघोळ केली. कपडे हसलेले होते. २७ ला नागपूरला होल्डऑल पासून हातरुमालापर्यंत सगळे कपडे धुतले. इतरांनीं मोठ्या आस्थेनें पन्हाळ्याला धुतले होते. पण माझ्या शरीरावर नित्य रहात असल्यामुळें त्यांना माझ्या हाताचा स्पर्श आवडतो. दुसरीकडे कितीहि पक्वान्नें खाल्लीं तरी मुलगा घरीं आला म्हणजे आई त्याला आपले हातचा स्वैपाक करून घालते. त्याच भावनेनें होल्डऑलपासून व पिशवीपासून घड्याळाच्या फीतेपर्यंत सारे कपडे हातानें धुतले म्हणजे बरें वाटतें.

रात्रीं मुहाळमध्यें जाहिर सभा झाली. दादाभाई नाईकांचें व माझें भाषण झालें. चांगला परिणाम झाला. रोजच्याप्रमाणें निजायला १२ वाजले.

रोजच्या जागरणामुळें आज उठायला उशीर झाला. पंधरा मिनिटें निघायलाहि उशीर झाला. सकाळीं ५-४५ ला निघून येथें आलों. मेचक नदीवर स्नान करून कपडे धुवून घेतले. आज दुपारपासून यात्रेचे टप्पे जरा वाढतील. यात्रा अगदींच फुकट जाणें शक्य नाहीं.

जमीन तर मिळतेच पण एका पुण्य भावनेनें आणि कल्याण कामनेनें वातावरण भारलें जातें.

ता. ५ पर्यंत चालू राहील. ता. ५ ला सायंकाळीं आणि ६ ला सायंकाळीं नर्मदा स्नानानें उपसंहार होईल. ता. ७ ला व ८ ला बेतूल–मूळ-तापीला थांबून ८ ला थोडा वेळ नागपुरला तुमच्या मातोश्रींच्या व ललु-आच्या भेटीकरतां राहीन. तुमच्या मातोश्री या वेडांतहि वटसावित्रीचें व्रत करतात. मीं म्हटलें, ‘ हा काय जुनाटपणा तुम्हांला आठवला ! ’ चटकन सूरदासाच्या शब्दांत तिनें उत्तर दिलें, “ अबलौं नसानीं, अब न नसैं हों ! ”

येथें आतांच सभा आटपली. एका जुन्या पिढीच्या ७८ वर्षांच्या घरंदाज ‘ रईसा ’कडे उतरलों आहोंत. सभा झाली. जमीनहि मिळालीच अर्थात. मध्यें निमसरा येथें पुरुषोत्तम राठी ( गाडरवाडा ) यांच्या बहिणी-कडे चहा घेतला. नीमसरा या गांवीं त्यांनींहि जमीन दिली.

पुढला टप्पा थोडा मोठा असल्यामुळें दुपारीं भर उन्हातच निघावें

लागणार. महेशबाबूंनीं आमची सोबत सोडली. मगनबाबू राठी आपल्या जनपदच्या जीपमधून येऊनजाऊन सोबत करतात. दादाभाई, रामचंद्र व्यास, जलखरे आणि मी ही 'चौकडी' कायमची आहे. जलखऱ्यांची पत्नी व मुलगी आमच्या सामानाच्या गाडींत येतात. माझ्या बरोबर तुझें Port folio आणि टावेल आहे.

तुझ्याकडील बातमीची रोज वाट पहात आहें. रोज टपालाचा तपास करतों. पण तेथून कुणीच कांहा लिहिलेलें दिसत नाहीं.

श्री. म्हैसूरकर महाराजांना प्रणाम. चि० रामभाऊ, शान्ताबाई प्रभाकर व दत्ता यांस आ०

कळावें, हे आ०

धनवाडा तुझा
२–६–५२ दादा

मसणगांव : ३-६-५२

काल धनवाड्याला आतिथ्याचा कहर झाला. भाज्याचे पांच द्रोण होते. 'मिरच' नको म्हणून सांगितल्यामुळें सगळ्या भाज्यामध्यें मोहऱ्यांची भुकटी घालून भाज्याचें लोणचे केलें होतें. तें चांगलेंच झोंबत होतें. याखेरीज आंब्याच्या पानांची भजीं, भज्यांची कढी, फोडणीचें वरण, शिरा, आमरस, दहीं इ. पदार्थ होतेच ! शरीर आपलें नव्हे अशा अनास्थेनें वागत असलों, तरी पोटाच्या बाबतात तसें करतां येईना.

ठरल्याप्रमाणें भर उन्हांत निघालों, सारंगपुरला सभा झाली. नांगरलेल्या शेतांतून चालावें लागल्यामुळें पायांना दुप्पट चालायचें श्रेय मिळे. आणि वहाण घालून चालत असल्यामुळें वहाण व तळवा यांच्यामध्यें माती शिरून तळवं हुळहुळे झाले, पिटकुळ्या आल्या आणि फुटूनहि गेल्या ! इतका सराईत चालणारा मी ! पण यावेळीं वहाणांनीं दावा साधण्याचें ठरविलें. तरी पण पायांच्या तक्रारीची दाद न घेण्याचें मीं ठरविलें. सारंगपूरनंतर चौकडीला येऊन सभा केली. सध्याकाळचे ७-३० झाले. खिडकिया व छीपावड येथें अजून सभा व्हावयाच्या होत्या. खिडकीयाला ८-४० ला

पोंचलों. गेल्याबरोबर भाषण केलें. पुन्हां पुढें चाललों ९-४० ला छीपावडला पोंचलों. भारतीय संस्कृतीप्रमाणें आधीं आतिथ्य मग काम ही परंपरा ठरलेली. त्याप्रमाणें १०-४० जेवण झालें. नंतर १२-१० पर्यंत सभा.

आम्ही पू. विनोबा व जवाहरलालजी यांचा कित्ता समोर ठेवून कार्यक्रम ठरवितों. पण त्यांचें तपहि नाहीं आणि व्यक्तिमत्वहि नाहीं ! त्यामुळेंच अंतराळीं लटकत रहातों. काल खिडकियाची सभा अर्धवटच झाली. छीपावडची बरी झाली. रात्रीं १२-३० नंतर•अंथरुणावर पडलों.

आज सकाळीं सुमारें ६॥ मैल चालून मांदल्याला आलों. आमराईत मुक्काम ठोकला. दुपारीं २-३० ते ३-४५ शाळेंत सभा झाली. दादाभाईंचे व माझें भाषण झालें. सकाळपासून महेशबाबूहि आमच्या पथकांत सामील झाले. त्याचेंहि भाषण झालें. पुन्हां ४–५ ला रवाना झालों. ६–६॥ मैल चालून मसणगांवला आलों. मांदल्यालाहि माचक नदी आहे. पण तिच्यांत पाण्यापेक्षां खडक व गोटेच जास्त ! तेथें अंघोळ जेमतेमच झाली. येथें मसणगांवला मात्र विहिरीवर मुबलक पाणी मिळालें.

आज पायाच्या पुळ्या फुटल्यामुळें बरीच तक्रार त्यानें केली. पण तेरा मैल चालून आलोंच. आतां उद्यांचा आणि परवांचा दिवस आहे. टप्पे जरा लांबचे असले तरी पाय दगा देणार नाहीं अशी आशा वाटते. शरीरावर मनाचा जोर चालायला मी काय असा विनोबा लागून गेलों आहे !

४–६–५२ : रात्रीं सभा झाली. काल दुपारच्या प्रमाणेंच काल रात्रींहि अगदीं वेठीला धरल्यासारखें भाषण केलें. आतां प्रातःप्रार्थनेनंतर पुन्हां यात्रेला आरंभ होत आहे. अश्वश्रेष्ठ उच्चैःश्रव्याप्रमाणें दादाभाई आमचे ' नायक ' आहेत आणि शर्यतीच्या आगाखानी घोड्याप्रमाणें महेशबाबू आहेत. मागें मागें मी रखडतों.

काल बरोबर दोन आठवडे झाले, तुझी बातमी नाहीं. हें तुला शोभतें का ! बोल ? नाहींतर कान कर इकडे.

कळावे हे आ.

धनवाडा<br>
दि. २–६–५२

तुझा<br>
दादा

# मातोश्रींची स्मृतिचित्रें ! : ३४

चि० मनूला अनेक उत्तम आ०

कालहि एक पत्र पाठविलें. आनंदराव त्याच वेळीं येथें होता. त्यानेंच तें पत्र मेलमध्यें नेऊन टाकलें. १ ऑगस्टला भूदान यज्ञाकरितां कार्यकर्त्यांची एक परिषद बोलावण्याचें ठरलें आहे. आनंदराव, अण्णा-बाणाईत यांच्याकडे जबाबदारी सोंपविली आहे.

काल शिवदत्त बाबूची फार त्रिसगंजाहून तार आली. ता. २१ जून त्याला सोईची नाहीं. पंधरा दिवसांची तरी पूर्वसूचना पाहिजे म्हणतो. माझा इलाज नाहीं. माझा नाद सोडून दे म्हणून त्याला आज लिहिलें आहे. नोव्हेंबरपर्यंत तूं मोकळी नाहींस हें कळविलें आहे. तेव्हां आतां फार विसगंजचा प्रश्नच नाहीं.

उद्या सकाळीं निघण्याचें त्यामुळें कारण नाहीं. उद्यां रात्रीं किंवा परवां सकाळीं निघून ता. १९ ला दिवसभर लखनदुलाला राहीन. ता. २० ला सकाळीं अगर दुपारीं गोरखपूरला पोंचून दिवसभर गिरिधारी भैय्यां-बरोबर राहीन. ता. २२ ला रात्रीं निघून ता. २३ ला संध्याकाळीं पूर्णि-याला पोंचेन. ती. मामा आले आहेत. त्यांचें थोडें महत्वाचें काम आहे. एरवीं उद्यांच सकाळीं गेलों असतों. दामोदरचें लालगंजहून पत्र आलें नुसताच मलिदा आहे. स्निग्ध आणि मधूर. विनोबा तुलसीदासाच्या गांवीं जाऊन आले. आधींच विनोबांच्या वाणींत काव्याची व संगिताची गोडी असते. त्यांत तुलसीदासांचें गांव !

तुमच्या मातोश्री अलिकडे स्मृतिचित्रें रेखाटण्यांत मोठ्या रंगतात. काल रैहानाबेनच्या भजनाचें वर्णन करूं लागल्या. म्हणाल्या त्यांच्या आवाजांत कंठ माधुरी बरोबर वाद्याच्या ध्वनीचीहि लकेर आहे. त्यामुळें त्यांत एक वैशिष्ठ्य आहे. सरोजबेन नानावटींची स्थूल शरीरयष्टि तुमच्या डोळ्यांत भरलेलीच असेल. त्या स्थूल शरीरानें त्या कमालीचें कोमल व भावपूर्ण नृत्य करतात ! कोण तरतरी ! कोण चपलता ! कोण तरलता !

'मालकिणीनें केलेलें वर्णन आहे हें !

कांहीं व्यक्तींवर अत्यंत प्रखर टीकास्त्रहि सोडते ती ! तिची प्रतिभा आतां अवखळ झालेली आहे. श्रोत्यांना आपल्या पहाडी आवाजानें व काव्यानें हलवून सोडणाऱ्या एका हिन्दीभाषी बोकेसंन्याशाचें वर्णन मोठें मार्मिक करते. त्या संन्याशाचे त्याच्या परिचयाच्या एका हिंदीभाषी स्त्री नेत्रीनें केलेलें कौतुकहि तिच्याच शब्दांत सांगते.| ' वे मेरे पैर छूते है ! मुझे माताजी कहते है ! ' इ. त्या बाईच्या तोंडचे शब्द मोठ्या ठसक्यानें उच्चारून दाखविते. ' उनके मनमें मेरे लिए आदरपूर्ण स्नेह है । मुझमें उनको श्रद्धा है ! ' त्या नेत्रीच्या वाक्यांची नक्कल करते. आणि सरतेशेवटीं तुमच्या मातोश्रींचा स्वतःचा शेरा, ' ढोंगी, दांभिक, सोंदे मेले ! '

तिची बुद्धि मोठी चिकित्सक खरी पण अलिकडे तिच्यांत वेडाचा किती भाग असेल याचा नेम नाहीं. म्हणून तिनें केलेलें गुणवर्णन तेवढें मी जमेस धरतों. त्यांत धोका कमी !

लालुआचा गोटा अगदीं नारळासारखा दिसतो. मुन्नीलाहि आतां दृष्टि येऊं लागली आहे. चि. लीलाचें एक पत्र नुकतेंच आलें. तुझी चव-कशी केली आहे. ती तेथील जीवनाशीं अगदीं समरस झालेली दिसते. तिला त्यां जीवनाचे चांगले पैलु तेवढे दिसले. फार चांगलें झालें.

बेटा, बिहारचा योग कांहीं तुझा दिसत नाहीं. आपण विनोबांकडे तरी गेलों असतों. तूं इतक्या जवळ आलेली असूनहि चार दिवस तुला बरोबर घेऊन राहीन म्हटलें तर तें साधू नये ना ? प्रवास रद्द झाला असता तर ?

कामांत काम तेवढें Road to Survival शोधून काढ. आतां आपली स्वतःची प्रत आपल्याजवळ आहे. तेव्हां तें दुसऱ्याचें पुस्तक परत करून टाकूं या.

प्रभा-वेणूच्या दुप्पट प्रेमाची दोहर आतां तुझ्या अंगावर आहे. अक्कांच्या हातचें पथ्य आहे, तेव्हां आतां अन्न अंगीं लागलें पाहिजे.

ती. स्व. बापू व सौ. अक्का यांस सा. न. इतर सर्व मंडळीस आ.

कळावे हे आ.

धनतोली, नागपूर तुझा

दि. १६–६–५२ दादा

ता. क. :–आज गिरिधारीजींना कार्ड लिहिलें. तूं दोन आठवडे अकोल्याला राहून परत पंढरपुरला जाशील असें त्यांस कळविलें आहे.